पुणे, शनिवार, ७ डिसेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 11 • वर्ष ४ थे, अंक ११ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
Beyond The News



अमली पदार्थ सापडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी विद्यापीठाकडून दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा नावलौकिक असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मुलांच्या वसतिगृहात अमली पदार्थ सापडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे

टीम इंडियाचा पहिला डाव १८० धावांवर आटोपला
पहिला दिवस ऑस्ट्रेलियाच्या नावावर

१२

# ज्ञानमंदिरात पुन्हा गांजाचा धूर!

## दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी विद्यापीठाकडून दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या वसतिगृह आणि सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

विद्यापीठाच्या वसतिगृह क्रमांक पाचमधील एका खोलीत विद्यार्थी गांजा ओढत असल्याची तक्रार एका विद्यार्थ्याने सुरक्षा विभागाकडे केली. त्यानुसार सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष जाऊन घटनेची पाहणी केली. विद्यार्थ्याने केलेल्या तक्रारीनुसार सुरक्षा विभागाने तक्रारदार विद्यार्थी आणि गांजा ओढत असलेल्या दोन विद्यार्थ्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाकडून चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात दोन विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे म्हणाल्या, की वसतिगृहाचे गृहपाल यांच्याकडून संबंधित प्रकरण पोलिसांकडे दाखल करण्यात आले. पुढील कार्यवाही पोलिसांकडून करण्यात येत आहे. संबंधित विद्यार्थी विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये प्रवेशित नाही.

» विळखा




### तीन महिन्यात दुसरी घटना

● विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडण्याची ही दुसरी वेळ आहे. तीन महिन्यांपूर्वीही असाच प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर विविध राजकीय पक्ष, संघटनांकडून विद्यापीठात आंदोलने करण्यात आली होती.

● काही दिवसांपूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृह क्रमांक ८ मध्ये सुमारे ७५० ग्रॅम गांजा (गांजा) सापडला होता. विद्यापीठ प्रशासनाने कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. मात्र, प्रशासन हे प्रकरण दडपत असल्याचा आरोप विद्यार्थी संघटनानी केला होता. राज्यात सध्या पुणे शहर अनेक घटनांनी हिटलिस्टवर असताना पुणे विद्यापीठाच्या परिसरात पुन्हा गांजा सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. यापुर्वी १८ मे रोजी गांजा सापडला होता. याप्रकरणी माजी आमदार रवींद्र धंगेकर व अंधारे यांनी प्रशासनाला धारेवर धरले होते.

“ याआधीही पुण्याचे ड्रग्स कनेक्शन अनेकवेळा उघडकीस आले होते विद्यापीठातील वस्तीगृहात पुन्हा गांजा सापडणे ही मात्र गंभीर बाब आहे. विद्यापीठांत वारंवार गांजा सापडण्याच्या घटना घडत आहेत. या सर्व गैरप्रकारांना कुठल्या दबवापोटी गुन्हेगारांना पाठीशी घातले जाते असा प्रश्न सर्वच स्तरातून विचारला जात आहे.

— **राहुल ससाणे, अध्यक्ष,**
**विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती**



# महामानवाला अभिवादन!



भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो भीम अनुयायी दादरच्या चैत्यभूमी येथे होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, नवनियुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी देखील आदरांजली वाहिली.



# राज्य सरकारला अल्टिमेटम् !

## मनोज जरांगे : मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावावा



मुद्दा सगे-सोयऱ्यांचा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या अनेक दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलन करत आहेत. यादरम्यान त्यांनी अनेकदा भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीकादेखील केली आहे. मागच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहिलेले देवेंद्र फडणवीस हे आता मुख्यमंत्री बनले आहेत. त्यामुळे मनोज जारांगे यांच्या आगामी काळातील आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरुद्ध मनोज जरांगे पाटील असा सामना पाहायला मिळू शकतो. राज्यात स्थापन झालेल्या महायुती सरकारबद्दल बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, “सरकार स्थापन झालं आहे, आता जनतेचे प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे. जी समाजातील खदखद त्यांना दिसत नसेल, पण ती इतकी भयंकर सूप्त लाट आहे की ते त्रासून जातील. ५ तारखेला त्यांचे सरकार स्थापन झाले आहे. त्यांना आम्ही शुभेच्छा दिल्या आहेत. तिघांचेही मनापासून अभिनंदन करतो. परंतू आता जनतेचे प्रश्न सोडविण्याकडे त्यांनी आता प्राधान्य द्यावे असे जरांगे म्हणाले.

### आठ ते नऊ मागण्या

● २००४ चा अध्यादेशात दुरूस्ती करावी, सगेसोयरेची अंमलबजावीणी करावी, हैदराबादसह सातारा संस्थान आणि बॉम्बे सरकारचे गॅझेट, या तीनही गॅझेट संबंधीच्या मागण्या, लाखो पोरांवरील दाखल झालेले गुन्हे मागे घेणे अशा आपल्या आठ ते नऊ मागण्या याच सरकारकडे केलेल्या आहेत त्या त्यांनी मार्गी काढाव्या, अन्यथा त्यांना पुन्हा मराठ्यांना सामोरे जावे लागेल”, असेही मनोज जरांगे यावेळी म्हणाले.

» पान ७ वर



## जावयाने सासरच्या घराला लावली आग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दोघा पतीपत्नीत भांडणे झाल्याने सासुने सुनेला माहेरी पाठविले. पत्नी माहेरी गेल्याचा राग आल्याने जावयाने पाच मिनिटामध्ये घरी नाही आलीस तर तुझ्या आईचे घर जाळून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर त्याने खरोखरच आपल्या सासरच्या घराला आग लावून दिली. त्यात घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले.

» पान ७ वर

# राज्यसभेत खासदाराच्या जागेवर सापडले नोटांचे बंडल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात पुन्हा गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी संसदेत ‘काँग्रेस का हाथ सोरस के साथ’ घोषणा दिल्याचा विरोधी पक्षांच्या खासदारांनी तीव्र निषेध नोंदवला. यानंतर लोकसभेचे सत्र दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. मात्र यापूर्वी राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या जागेवरून नोटांची बंडल सापडल्याची माहिती राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी दिली. या प्रकरणावरून देखील सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडल्याचे पाहायला मिळाले.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी काल नियमीत तपासणीदरम्यान सभागृहात चलनी नोटा सापडल्याचा आरोप केला. सुरक्षा अधिकाऱ्यांना राज्यसभा सभागृहातील आसन क्रमांक २२२ वर नोटांचे बंडल सापडले असल्याचे धनखड यांनी सांगितले. चलनी नोटा सापडलेली ही जागा सध्या काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांना नेमून देण्यात आलेली आहे. दरम्यान या प्रकरणाची सध्या चौकशी सुरू असल्याचेही धनखड यांनी सांगितले.



राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड म्हणाले की, “मी सदस्यांना सूचित करत आहे की, काल सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी सुरू होती. सध्या अभिषेक मनू सिंघवी यांना देण्यात आलेल्या जागेवर चलनी नोटांचा गठ्ठा सुरक्षा अधिकाऱ्यांनी जप्त केला आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात आल्यानंतर मी चौकशीचे आदेश दिले आहेत आणि सध्या या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# टिंगरेंवर हल्ला करणाऱ्या दोन आरोपींना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

» गुन्हेगारी

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या प्रचार कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करणारे माजी नगरसेवक चंद्रकांत टिंगरे यांच्यावर हल्ला करणाऱ्या दोन आरोपींना विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून (अजित पवार गट) शरद पवार पक्षात प्रवेश केल्याने आरोपींनी दगडफेक केल्याचे कारण पुढे आले आहे. याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी रेवण तानाजी लगस (वय २०, रा.गोकुळ नगर, कात्रज) आणि प्राणजीत अच्युत शिंदे (वय २४, रा. हांडेवाडी) यांना अटक केली आहे. चंद्रकांत टिंगरे यांच्या पत्नी माजी नगरसेविका रेखा टिंगरे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली होती. धानोरी प्रभागाच्या माजी नगरसेविका रेखा टिंगरे आणि त्यांचे पती चंद्रकांत टिंगरे यांनी भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला

» पान ७ वर

## चार दिवसात ११ कोटी वसूल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याची मुख्य जबाबदारी मिळकतकर विभागाची आहे. महापालिकेचा खर्च वाढत असताना हा डोलारा सांभाळण्यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये मिळकतकर वसुलीचे लक्ष्यही वाढवले जात आहे. मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिकेने चार दिवसांपासून थकबाकीदाराच्या मिळकतीपुढे बँड वाजविण्यास सुरुवात केली आहे. त्यामधून दीडशे मिळकतींपुढे बँड वाजवून ११ कोटी १९ लाख ११ हजार

» पान ७ वर

# जुन्नरच्या हापूसला वेगळी ओळख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नरमधील हापूस आंब्याला अखेर “शिवनेरी हापूस मँगो” या नावाने नवी ओळख मिळाली असून, त्याला जीआय (जिऑग्राफिकल इंडिकेशन) मानांकन प्रदान करण्यात आलं आहे. या ऐतिहासिक यशासाठी गेल्या दहा वर्षांपासून नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राने अथक प्रयत्न केले. या मानांकनासाठी ११५ वर्षांपूर्वीच्या हापूस आंब्याच्या झाडांची नोंद घेण्यात आली. शास्त्रीय पद्धतीने तपासणी करून या आंब्याच्या वैशिष्ट्यांची सिद्धता करण्यात आली. कोकणात देखील हापूस आंब्याचं मोठ्या प्रमाणावर उत्पादन होतं. त्यामुळे जुन्नरमधील हापूसला वेगळी ओळख मिळवून देण्याचा संघर्ष सुरू होता. “हापूस” या नावावरून वाद असल्याने जुन्नरमधील हापूस आंबा विशेषत्वाने ओळखला जात नव्हता.

साडेतीनशे वर्षांचा उल्लेखनीय इतिहास असलेल्या जुन्नरच्या वैशिष्ट्यपूर्ण शिवनेरी हापूसला केंद्र सरकारने भौगोलिक मानांकन म्हणजेच 'जिओग्राफिकल इंडिकेशन'चा (जीआय टॅग) मान दिला आहे. रत्नागिरी हापूसप्रमाणेच आता आंतराराष्ट्रीय स्तरावर जुन्नरचा हापूस शिवनेरी हापूस या नव्या नावाने ओळखला जाणार आहे. विशेष म्हणजे, देशातील कृषी क्षेत्रात सर्वाधिक 'जीआय टॅग' असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र आता पहिल्या क्रमांकावर पोहोचले आहे.

### “शिवनेरी हापूस मँगो”ची ओळख:

● जुन्नर परिसरातील हवामान, माती आणि विशिष्ट पद्धतीने घेतलेली काळजी या आंब्याला वेगळं स्थान देतात. “शिवनेरी हापूस मँगो” नावाने जुन्नरच्या हापूस आंब्याला आता आंतरराष्ट्रीय ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या यशामुळे जुन्नरमधील शेतकरी आणि आंबा उत्पादकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. यामुळे हापूस आंब्याच्या स्थानिक बाजारपेठेला तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी संधी मिळणार आहे. जुन्नरच्या आंब्याला “शिवनेरी हापूस मँगो” या नव्या ओळखीमुळे आता संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात प्रतिष्ठा मिळेल.





### नितीन गडकरी यांची शिष्टाई फळाला

# कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचा 'मार्ग' मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरिक आणि वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत असलेला कात्रज ते कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचा 'मार्ग' मोकळा होण्याची शक्यता आहे, गल्ली ते दिल्लीपर्यंत या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी सात जागा मालकांनी जागा देण्यास मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे खुद्द केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी त्यासाठी महापालिका प्रशासनाला आश्वासन दिले आहे, त्यामुळे या मार्गावरील वाहतूककोंडी सुटण्यास मदत होणार आहे.

या रस्त्यावरील काही भागात समतल विलगकाचे (ग्रेड सेपरेटर), तसेच रस्ता रुंदीकरणाचे काम टप्प्याटप्प्यात केले जात आहे. रस्ता तयार करण्यासाठी सात जागा मालकांनी तयारी दाखविली असून त्याचे प्रस्ताव पालिकेकडे देण्यात आले आहेत. तसेच रस्त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी एक खिडकी योजना सुरू केली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिली.



**भूसंपादनामुळे रखडले काम**

- या रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा देण्याची तयारी जागामालकांनी दाखविल्यानंतर त्यावर कार्यवाही करत तातडीने जागा ताब्यात घेण्याचे नियोजन पालिकेने केले आहे. कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ मध्ये मान्यता मिळाली आहे. मात्र, भूसंपादनाअभावी या रस्त्याचे काम रखडले आहे. राजस सोसायटी ते कोंढव्यातील खडी मशिन चौकादरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण गेल्या वर्षीपासून सुरू आहे.

वाहतुकीच्या समस्येमुळे चर्चेत असलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या रस्त्याचे रुंदीकरण केले जात आहे. या कामाला अधिक वेगाने गती देण्यासाठी पालिका प्रशासनाने जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. रस्त्याच्या कामासाठी सात जागामालकांनी आपले प्रस्ताव पालिकेकडे सादर केले आहे.

या रस्त्यावर पालिकेच्या वतीने उड्डाणपूल बांधला जात आहे. यासाठी आवश्यक असलेल्या २८० मीटर रस्त्याचे तातडीने भूसंपादन करण्यासाठी पालिकेने प्राधान्य दिले आहे. या पुलासाठी आवश्यक ती भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून पालिकेने प्रस्ताव सादर केल्यास रस्ता तयार करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांनी महापालिकेला दिले आहे. काही दिवसांपूर्वी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट घेत चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी पालिकेला मदत करण्याचा शब्द दिला आहे.

# ११ तारखेला साजरा होणार पादचारी दिन

### करमणुकीचे कार्यक्रम; हॅप्पी स्ट्रीटचे खेळ अन् रस्ता सुरक्षेची कार्यशाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाहतूक व्यवस्थेमध्ये सर्वांत दुर्लक्षित ठरलेल्या पादचाऱ्याला महत्त्व मिळवून देण्यासाठी पुणे महापालिकेने गेल्या चार वर्षांपासून ११ डिसेंबर हा दिवस पादचारी दिन म्हणून साजरा करण्यास सुरूवात केली आहे. महापालिकेकडून यंदाही ११ डिसेंबर रोजी पादचारी दिन साजरा केला जाणार आहे. त्यादिवशी लक्ष्मी रस्ता सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत वाहनांसाठी बंद राहणार आहे. लक्ष्मी रस्त्यावर नागरिकांच्या करमणुकीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच हॅप्पी स्ट्रीटचे खेळ आणि रस्ता सुरक्षाबाबत कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत.

लक्ष्मी रस्त्यावरील कुंटे चौक ते गरुड गणपती चौक हा भाग या दिवशी वाहनांसाठी बंद असणार आहे. हा रस्ता आकर्षक पद्धतीने सजविण्यात येणार आहे. वाहनविरहित करून तो आकर्षक पद्धतीने सजवण्याचे काम पथ विभागातर्फे होणार आहे. ११ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत हा रस्ता वाहनांना वापरता येणार नाही. या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी लक्ष्मी रस्त्यावर यावे, यासाठी महा मेट्रोमार्फत कसबा आणि मंडई मेट्रो स्थानकापासून, पुणे मनपा मेट्रो स्थानकापासून खास सायकलीचे आयोजन करण्यात येत आहे.



"रंग कला अकादमीतर्फे पादचारी दिनानिमित्त भव्य रांगोळी काढण्यात येणार आहे. पुणे महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत हवेच्या गुणवत्तेची चाचणी व स्वच्छ संस्थेमार्फत प्रदर्शन आयोजित केले आहे."
— अनिरुद्ध पावसकर, पथ विभाग प्रमुख, महापालिका

## पुण्यात काय घडतंय...

**कलाछाया कल्चरल सेंटरतर्फे 'श्याम ए कथक'**



- **सादरकर्ते :** रश्मी जंगम, डॉ. विदुला कुडेकर, दीपा बक्षी
- **नृत्य प्रस्तुती:** अलकनंदा कथक, सुश्मिता घोष, पल्लवी श्योम, जयश्री जंगम
- **प्रमुख उपस्थिती:** शमा भाटे, राजश्री शिर्के
- **कुठे :** कलाछाया कल्चरल सेंटर, पत्रकारनगर
- **कधी :** ७ डिसेंबर, सायंकाळी: ६.१५
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य

**आनंद योग केंद्र आणि करियर सिध्दी यांच्या वतीने व्याख्यान**



- **व्याख्यात्या :** सुमेधा चिथडे
- **विषय:** राष्ट्राय स्वाहा इदं नं मम
- **कुठे:** एमसीसीआयए सभागृह, हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट, हडपसर
- **कधी :** ७ डिसेंबर, सकाळी : ६.१५
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य

**व्याख्यान**



- **कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमाला:** कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमाला
- **व्याख्यान विषय:** भारत तोडो षडयंत्र
- **वक्ते:** अविनाश धर्माधिकारी
- **प्रमुख पाहुणे:** - डॉ. नितीन करमळकर
- **कुठे :** न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता
- **कधी :** शनिवार, ७ डिसेंबर, सायंकाळी ७ वा.

**व्याख्यान**



- **कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमाला:** कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने कै. बाबासाहेब पुरंदरे स्मृती व्याख्यानमाला
- **व्याख्यान विषय:** भारताच्या वैभवाचा आधार - माझं घर माझा परिवा
- **वक्ते:** विवेक घळसासी
- **प्रमुख उपस्थिती:** - मृणाल कुलकर्णी, ॲड. डी. डी. शहा
- **कुठे :** न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता,
- **कधी :** रविवार, ८ डिसेंबर, सायंकाळी ७

**प्रकाशन**

- **शून्य फुलीचा डाव या कविता संग्रहाचे प्रकाशन :**
- **लेखिका:** श्रीमती रॉय
- **हस्ते:** प्रसिध्द साहित्यिक श्रीमती सुलभा तेरणीकर
- **प्रमुख उपस्थिती:** मकरंद गोडबोले, प्रिया साठे, पराग लोणकर
- **कुठे :** ब्लुम- हॉटेल सेंट्रो, शिरोळे रस्ता, आपटे रस्त्याच्या लगत, शिवाजीनगरकार्यक्रम निमंत्रितासाठी
- **कधी :** रविवार ८ डिसेंबर दुपारी ४ वा.

मधुश्री प्रकाशन

**प्रकाशन**



- **शतपैलू सावरकर या पुस्तकाचे प्रकाशन**
- **लेखक:** ह. त्र्यं. देसाई
- **हस्ते:** विंग कमांडर विनायक डावरे
- **कार्यक्रमाचे अध्यक्ष:** सूर्यकांत पाठक
- **आयोजक:** सुरेश आबादे, विद्याधर नारगोलकर
- **कुठे :** वेदशास्रोत्तेजक सभागृह,सारसबागेच्या जवळ, हॉटेल विश्वच्या समोर
- **कधी :** रविवार दि. ८ डिसेंबर, सांयकाळी ५.५० वा.

### किलोला तीनशे ते साडेतीनशेचा भाव

# हुरडा खातोय यंदा 'चवदार भाव...!'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दरवर्षी डिसेंबर महिन्यात हुरड्याचा हंगाम सुरू होतो. त्याची आवक मार्चपर्यंत सुरू असते. फळबाजारात रोज १०० ते २०० किलोची आवक होत आहे. मात्र मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने दर अधिक आहेत. घाऊक बाजारात प्रतिकिलोला ३०० ते ३५० रुपये दर मिळत असल्याचेही मार्केट यार्डातील व्यापारी पांडुरंग सुपेकर यांनी नमूद केले.

मार्केट यार्डात मोठ्या प्रमाणावर हुरडा दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. खवय्यांकडून हुरड्याला चांगली मागणी आहे.घाऊक बाजारात एक किलो हुरड्याची विक्री ३०० ते ३५० रुपये दराने केली जात आहे. मागील वर्षीच्या तुलनेत हुरड्याच्या दरात यंदा वाढ झालेली आहे. हॉटेल चालक तसेच हुरडापार्टी आयोजकांसह घरगुती ग्राहकांकडून हुरड्याला मागणी वाढली आहे. नुकताच हंगाम सुरू झाला असल्याने दर अधिक आहेत. मात्र येत्या पंधरा दिवसांत आवकेत मोठी वाढ होईल. बाजारात छत्रपती संभाजीनगर येथून हुरड्याची आवक होत आहे. येत्या पंधरा दिवसांत पुणे, नगर आणि लातूर जिल्ह्यातून आवक सुरू होईल. त्यानंतर बाजारात रोज ४०० ते ५०० किलोपर्यंत आवक होईल. गुळभेंडी आणि गावरान असे हुरड्याचे दोन प्रकार आहेत. या दोन्ही प्रकारच्या हुरड्याला मागणी असते.

» शेती

"मार्केट यार्डबाजारात आवक कमी असल्याने अनेक पर्यटन ठिकाणांचे हॉटेल चालक हुरड्याची आगाऊ नोंदणी करत आहेत. त्यामुळे बाजारात हुरडा शिल्लक राहत नाही. हिवाळ्यात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडत असतात. पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटक हुरड्याचा आस्वाद घेत असतात. सध्या चांगला दर मिळत असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहेत."
— पांडुरंग सुपेकर, व्यापारी

# सगुणातूनच निर्गुणाकडे जाण्याचा मार्ग

### डेक्कन महाविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. गो.बं. देगलूरकर यांचे मत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मूर्ती पूजन न करणारा कोणताही धर्म नाही. निर्गुण निराकाराची पूजा करणे हे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. सामान्य माणूस देवाच्या मूर्तीचे दर्शन घेतो, त्याच्याकडे मागणे मागतो, परंतु त्या मूर्तीचे रूप पाहत नाही. निर्गुणाकडे जायचे असेल तर सगुणाच्या मार्गातून जावे लागते, असे मत ज्येष्ठ मूर्ती शास्त्र अभ्यासकडॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

पुणे प्रार्थना समाजाच्या १५४ व्या वार्षिकोत्सवानिमित्त विविध पुरस्कार देगलूरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. लॉ कॉलेज रस्त्यावरील भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या नवलमल फिरोदिया सभागृहात पुरस्कार प्रदान सोहळा झाला. यावेळी सचिव डॉ. दिलीप जोग, डॉ.सुषमा जोग, खजिनदार प्रशांत पाडवे उपस्थित होते.



निसर्ग वेध संस्थेचे संस्थापक किरण पुरंदरे यांना रामकृष्ण गोपाळ भांडारकर पुरस्काराने, ज्येष्ठ उद्योगपती प्रतापराव पवार यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्काराने तर 'आपलं घर, पुणे' या संस्थेला डेव्हिडा रॉबर्टस पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रुपये २५ हजाराचा धनादेश व मानचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप होते.



"नास्तिक माणसे बुद्धिमान असतात, असे समजले जाते परंतु हा गैरसमज आहे. कारण त्यांना आस्तिक म्हणजे काय हे माहित नसते. आस्तिक होऊन नास्तिकते पर्यंत जाता येते. प्रार्थना समाज सारख्या संस्थांना सक्रिय उत्तेजन देणे गरजेचे आहे.
— डॉ. गो. ब. देगलूरकर, माजी कुलगुरु, डेक्कन महाविद्यालय

## अशोक गोपाल यांच्या ग्रंथाला पुरस्कार



**पुणे :** ज्येष्ठ पत्रकार आणि स्वयंसेवी संस्थांचे सल्लागार अशोक गोपाल यांना त्यांनी लिहिलेल्या डॉ. आंबेडकरांवरील ' ए पार्ट अपार्ट: लाईफ अँड थॉट ऑफ बी. आर.आंबेडकर ' या इंग्रजी ग्रंथाला बंगलोर येथील बंगळुरू येथील न्यू इंडिया फाउंडेशनने डॉ. कमलादेवी चट्टोपाध्याय पुरस्कार जाहीर केला आहे. रोख १५ लाख रुपये आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ते लेखन आणि विविध संस्थांच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या सल्लागार पदी काम करत आहेत. १४ डिसेंबर रोजी बंगळुरू येथे गोपाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# गाववाल्यांचा 'कारभार' होणार आता 'स्मार्ट'; कामकाज पेपरलेस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गाववाल्यांना आणि गाव कारभार्यांना आता चांगले दिवस येणार आहेत, त्यासाठी सर्व सरकारी कार्य़ालयांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यासाठी २०२२ मध्येच निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारच्या धर्तीवर सरकारी कामकाजाच्या फाइलचा प्रवास चार स्तरांपर्यंत करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याचे आदेश राज्य शासनाने जिल्हा परिषदा आणि जिल्हा प्रशासनाला दिले आहेत, त्यातूनच ' गावकारभारी' आता आणखी 'स्मार्ट' होणार असून गावच्या विकासकामांना आता अधिक ' गती' मिळणार आहे.

**पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण**

- त्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल, कुळकायदा, सर्वसाधारण, निवडणूक, गौण खनिज, पुनर्वसन, भूसंपादन, राजशिष्टाचार, नियोजन समिती, लेखा, राजशिष्टाचार, गृह, संजय गांधी निराधार योजना, नगर परिषद, रोजगार हमी योजना, पुरवठा विभाग, नगर रचना आदी शाखांमधील अधिकाऱ्यांना ई-प्रणालीचा अवलंब करण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीला ५० टक्क्यांपेक्षा अधिक काम झाले आहेत.

प्रशासकीय कामकाज गतिमान आणि कागदविरहित (पेपरलेस) करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. नवीन वर्षापासून कार्य़ालयातील सर्व शाखांची कामे कागदविरहित करण्यात येणार आहे.

# जाती धर्माच्या चांगुलपणाचा झेंडा खांद्यावर घ्यावा -डॉ. सबनीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आजच्या काळात एका जातीचा-धर्माचा झेंडा घेऊन राजकारण, समाजकारण होत असताना ॲड. प्रमोद आडकर यांनी सर्व धर्मांच्या चांगुलपणाचा झेंडा खांद्यावर घेऊन सत्याच्या बेरजेतून आयुष्य उभे केले आहे, असे गौरवोद्गार प्रसिद्ध विचारवंत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी काढले. ॲड. आडकर रमाई महोत्सवाच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून संविधानाच्या शिकवणुकीचा जागर करीत असल्याबद्दल त्यांचा रमाई रत्न पुरस्काराने करण्यात आलेला सन्मान अभिनंदनीय आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक समितीतर्फे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह, ज्येष्ठ संयोजक, लेखक, रंगत-संगत प्रतिष्ठान आणि रमाई महोत्सवाचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर यांच्या एकसष्टीनिमित्त कृतज्ञता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ॲड. आडकर यांचा सन्मान डॉ. सबनीस यांच्या हस्ते करण्यात आला.



**पुणे :** महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक समिती आयोजित कार्यक्रमात मैथिली आडकर, ॲड. प्रमोद आडकर, डॉ. श्रीपाल सबनीस, लता राजगुरू, विठ्ठल गायकवाड.



"आज राजकारण, समाजकारण आणि धर्मकारणात विषाची पेरणी वाढलेली असताना संस्कृती जगणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत साहित्य, संस्कृती आणि समाजकारण क्षेत्रात संजीवनी देणारे कार्य त्यांच्या हातून होत आहे." — डॉ. श्रीपाल सबनीस, माजी अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

रमाई महोत्सवाचे सलग बारा वर्षे अध्यक्षपद भूषवित असल्याबद्दल त्यांचा या वेळी रमाई रत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. विठ्ठल गायकवाड, लता राजगुरू, मैथिली आडकर, ॲड. अविनाश साळवे होते.

### पहाटेच्या वेळी शेकडो टन कचऱ्याला लागली आग

# उरुळी डेपोत कचरा पेटला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फुरसुंगी-उरुळी देवाची येथील कचरा डेपोतील कचऱ्याला मोठी आग लागल्याची घटना नुकतीच शुक्रवारी सकाळी सहाच्या सुमारास घडली. कचरा प्रक्रिया प्रकल्पातून नाकारलेला हा कचरा शास्त्रीय पद्धतीने व्हिल्हेवाट लावण्यासाठी पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जागेतील प्रकल्पावर नेला जाणार होता. पण त्याठिकाणी आज सकाळी आग लागल्याचा प्रकार समोर आला.

पुणे शहरात निर्माण होणारा ओला व सुका कचरा निर्माण होतो. हा कचरा महापालिकेच्या विविध प्रकल्पांवर प्रक्रियेसाठी नेला जातो. पण त्यातील चिंध्या, काचेचे तुकडे, प्लास्टकचे तुकडे, दगड, लोखंड यासह अन्य प्रकारचा प्रक्रिया न होणारा कचरा नाकारला जातो. हा कचरा कचरा डोपोमध्ये आणून टाकला आहे. कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या जागेवरील प्रकल्पामध्ये हा नाकारलेल्या कचऱ्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार आहे. यासाठी सुमारे ३०० टनापेक्षा जास्त कचरा पडून आहे. डेपोतील शेडमध्ये कचऱ्याचे डोंगर लागलेला आहे. या ठिकाणी पहाटे ऐन थंडीचे वातावरण असतानाही अचानक आग लागल्याने परिसरात धुराचे लोट निर्माण झाले. तसेच कचरा जळाल्याने त्याची दुर्गंधीही परिसरात पसरली.

» आग

### लाखो रुपयांचा चुराडा पण रस्ते ओले, झाडे वाळली

# महापालिकेची ठिबक योजना सपशेल 'फेल'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लाखो रुपयांचा चुराडा करुन रस्त्याच्या मध्यभागी तयार करण्यात आलेल्या गार्डनला पाणीच मिळत नसल्याने ही झाडे अक्षरश: वाळून गेली आहेत, धक्कादायक बाब म्हणजे त्यासाठी राबविण्यात आलेली ठिबक सिंचन योजना ' फेल' ठरली आहे. या पाईपमधील पाणी झाडांना न जाता ते रस्त्यावर जात असून त्यामुळे रस्ते ओले तर झाडे कोरडी अशी हास्यास्पद परिस्थिती निर्माण झाली आहे.

वारज्याकडून चांदणी चौकाकडे जाताना सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शोभेची झाडे व हिरवळ लावून यासाठी महापालिकेने ठिबक सिंचन प्रकल्पही तयार केला आहे. पण हे सिंचनाचे पाणी अनेकदा रस्त्यावर पडत असल्याने त्याचा फायदा झाडांना तुरळक प्रमाणात होतो. साहजिकच पुरेसे पाणी असतानाही पाण्याअभावी येथील झाडे वाळत आहेत.

"या परिसरातील झाडांची उद्यान विभाग योग्य देखरेख करत आहे. हरित लवादाच्या आदेशाचे पालन योग्य पद्धतीने होत आहे. झाडांची मुळे घुशींनी खाल्ली असल्याने झाडे सुकली आहे. लवकरच उपाययोजना करून झाडे जगविणार आहे."
— हरीश राऊत, कनिष्ठ अभियंता, उद्यान विभाग



वारजे-माळवाडीतील माई मंगेशकर रुग्णालयासमोरील पुलाच्या दोन्ही बाजूंना महापालिकेकडून झाडे लावून हिरवळ करण्यात आली आहे. यामुळे हा परिसराचे सौंदर्य वाढले होते, मात्र मागील काही दिवसांपासून व्यवस्थित निगा न राखल्याने ही झाडे व हिरवळ सुकली आहे.

प्रशासन एका बाजूला 'झाडे लावा, झाडे जगवा' असे म्हणत असताना वारज्यातील या झाडांकडे दुर्लक्ष करत आहे. तसेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात घुशी व उंदरांचा त्रास सुरू झाल्याने येथील जमीन पोकळ-भुसभुशीत झाली आहे. यामुळे या झाडांची मुळे कमकुवत झाल्याने ही झाडे धोकादायक झाली आहेत. यावर त्वरित उपाययोजना करण्याची गरज आहे.

या झाडांची व्यवस्थित निगा न राखल्याने पर्यावरण प्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच हरित लवादाचा आदेश असतानाही या भागातील झाडांची काळजी घेत जात नाही.

"उद्यान विभागाने दुर्लक्ष केल्याने झाडे सुकली आहेत. ठिबक सिचंनचे पाणी झाडांना कमी व रस्त्यावर जास्त येते. सिंचनाच्या पाइपची त्वरित दुरुस्ती करावी."
— किरण बारटक्के, स्थानिक रहिवासी

#रा

## At a Glance

### प्रवासी महिलेचे दागिने लांबविले

**पुणे :** पीएमपीएमएल बसमधील गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी बसमधून प्रवास करत असलेल्या ज्येष्ठ महिलेचे सोन्याचे दागिने लंपास केले, यासंदर्भात वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून वाघोली येथील पीएमपीएलच्या बसथांब्यावर अथवा बसमधून प्रवास करत असलेल्या महिलांचे दागिने आणि नागरिकांचे पैसे चोरीस जाण्याच्या प्रकारात मोठी वाढ झाली आहे.

### ईव्हीएम विरोधात मविआचे आंदोलन

**पुणे :** ईव्हीएममध्ये फेरफार आणि घोटाळा करुन राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आले आहे, हिम्मत असेल तर पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेऊन निवडून येऊन दाखवा असे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केले. ईव्हीएमच्या विरोधात आज महायुतीच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने आज आंदोलन करण्यात आले.

### मोफत नेत्र तपासणी, दंत तपासणी

**पुणे :** दगडुशेठ गणपती ट्रस्टच्या जय गणेश रुग्णसेवा अभियान अंतर्गत सत्य साई सेवा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दावडी गाव आळंदी जवळ येथे नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, दंत तपासणी आणि इतर वैद्यकीय सुविधा देऊन आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले.यास्तव लाभार्थींनी दगडूशेठ ट्रस्टचे आभार मानले. या रुग्णसेवेचा आळंदी परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

# पंचवीस हजार विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरवण्यासाठी अद्ययावत किचनचे भूमीपूजन

## डॉइश बँक आणि अक्षय पात्र फाऊंडेशनचा पुढाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉइश बँक आणि अक्षय पात्र फाउंडेशनने पुण्यातील शिवाजीनगर येथे विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरवित आरोग्य, शिक्षण व आर्थिक वाढीला हातभार लावण्यासाठी अद्ययावत किचनचे भूमिपूजन केले. या नाविन्यपूर्ण केंद्राच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम म्हणजे प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या माध्यमातून समाजाच्या वंचित गटातील मुलांच्या आयुष्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठीच्या या संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. अक्षय पात्र फाउंडेशन ही संस्था पीएम पोषण उपक्रमाच्या अंमलबजावणीतील भागीदार व एनजीओद्वारे चालविला जाणारा जगातील सर्वात मोठा शालेय भोजन उपक्रम आहे.

२०२६ च्या सुरुवातीस कार्यान्वित होणार असलेले हे बहुमजली किचन संपूर्ण पुण्यातील सरकारी आणि सरकारी अनुदानप्राप्त शाळांतील २५,००० विद्यार्थ्यांना दररोज गरम, पौष्टिक भोजन पुरविणार आहे. समाजाच्या दुर्लक्षित स्तरातील मुलांची शाळेतील उपस्थिती, त्यांची शैक्षणिक कामगिरी आणि एकूण आरोग्य व स्वास्थ्यामध्ये सुधारणा घडवून




आणणे हे या उपक्रमाचे लक्ष्य आहे. या केंद्रामध्ये स्वच्छता आणि सुरक्षेचा उच्चतम दर्जा राखला जाईल व ते अक्षय पात्रचे पुण्यातील मध्यवर्ती किचन म्हणून कार्यरत राहील. पोषण व शिक्षणाच्या समस्येवर उपाय शोधण्यापलीकडे जात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी व स्थानिक शेतीला पाठबळ पुरवित समाजाच्या आर्थिक विकासाला खतपाणी घालण्यासाठीही हा प्रकल्प सज्ज आहे.

> “भूक आणि शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याप्रती, विद्यार्थ्यांना त्यांच्या संपूर्ण क्षमतेचा वापर करण्यासाठी सक्षम बनविण्याप्रती आमची दृढ बांधिलकी पुण्याच्या या नव्या किचनमध्ये प्रतिबिंबित झाली आहे. पुण्यात आमचे पाय भक्कमपणे रोवलेले असल्याने आमच्या कर्मचाऱ्यांनाही या अर्थपूर्ण कार्याला पुढे नेण्याच्या व शाश्वत बदलांची जोपासना करण्याच्या कामात सहभागी करून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.”
>
> — **कौशिक शापारिया,** सीईओ डॉइश बँक ग्रुप, इंडिया

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

या कार्यक्रमा प्रसंगी डॉइश बँक ग्रुप, इंडियाचे सीईओ कौशिक शापारिया यांच्यासह अक्षय पात्र फाउंडेशनच्या पुण्याचे रिजनल प्रेसिडंट संपती दास, अक्षय पात्र फाउंडेशनचे सीईओ श्रीधर व्यंकट, प्रवीण एनआर (आयएफएस), पृथ्वीराज बीपी (आयएएस) व पुणे सरकारी विभागाचे तसेच अक्षय पात्र फाउंडेशन इतर वरीष्ठ प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

अक्षय पात्र फाउंडेशनचे सीईओ श्रीधर वेंकट म्हणाले, “आजचा भूमीपूजनाचा सोहळा म्हणजे वर्गखोल्यांतील भूकेचे निवारण करण्यासाठी आणि संपूर्ण पुण्यातील मुलांसाठी शैक्षणिक संधी निर्माण करण्यासाठी डॉइश बँकेच्या साथीने सुरू असलेल्या आमच्या प्रवासातील एक लक्षणीय टप्पा आहे. या ‘स्टेट-ऑफ आर्ट’ किचनच्या माध्यमातून आम्ही आमच्या कार्यान्वयन क्षमता लक्षणीयरित्या वाढविण्यास सज्ज आहोत. अधिक चांगल्या आरोग्याचा पुरस्कार करून व स्थानिक पातळीवर आर्थिक संधी निर्माण करून समाजाची वीण अधिक घट्ट करतो. डॉइश बँककडून गेल्या अनेक वर्षांपासून आम्हाला मिळत आलेल्या पाठबळासाठी आम्ही ऋणी आहोत.

डॉइश बँकेने जयपूर, बेंगळुरू आणि पुण्यातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह-भोजन पुरविण्याच्या प्रयत्नांना पाठबळ पुरविले आहे. गेल्या दशकभरातील कालावधीमध्ये या भागीदारीतून मुलांना ८ कोटींहून अधिक भोजन पुरविण्याचे कार्य उभे राहण्यास मदत झाली आहे.

### असे आहे अक्षय पात्र फाऊंडेशनचे कार्य

- अक्षय पात्र फाऊंडेशन ना-नफा तत्त्वावर आधारित संस्था आहे
- भारतातील वर्गांमध्ये लागणारी भूक आणि कुपोषणाचे निराकरण करण्याचा प्रयत्न.
- सरकारी व सरकार-अनुदानित शाळांमध्ये पीएम पोषण स्किम राबवत अक्षय पात्रचा भूकेचे शमन करत शाळेमध्ये मुलांना आणण्याचा मनसुबा.
- २००० पासून अक्षय पात्रने प्रत्येक शालेय दिवसामध्ये पौष्टिक आहार देण्याचे काम
- तंत्रज्ञानाचा फायदा घेत लाखो मुलांच्या गरजांची पूर्तता.
- सर्वात मोठी (ना-नफा तत्त्वावर संचालित) शालेय आहार उपक्रम बनली आहे.
- १६ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशांमधील ७५ ठिकाणी असलेल्या किचन्सच्या नेटवर्कला पौष्टिक आहार.
- आम्ही २३,००० हून अधिक शाळा व अंगणवाडींमधील २.२५ दशलक्षहून अधिक लाभार्थींपर्यंत पोहोचू शकलो.

# लसणाची ‘फोडणी’ पडतेय सहाशे रुपयांना

## दरात विक्रमी वाढ; गृहिणींचे बजेट कोलमडले; किचनमधून लसूण गायब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भाजीसाठी हवाच असलेल्या लसणाने गृहीणींच्या डोळयात अक्षरश: पाणी आणले आहे' लसणाची ‘फोडणी’ ला विक्रमी भाव आला असून तब्बल सहाशे रुपये किलो दराने लसूण मिळत आहे. त्यामुळे काही किचनमध्ये तर लसूण गायबच झाला असून गृहिणींचे बजेटमधील कोलमडले आहे.

अन्नपदार्थांना चव येण्यासाठी कांद्याबरोबरच प्रामुख्याने वापरला जाणारा घटक म्हणून लसणाचा वापर केला जातो. मात्र सध्याचे लसणाचे दर पाहता 'फोडणीत लसूण घालायचा की नाही' असा प्रश्न गृहिणींसमोर निर्माण झाला आहे. सध्या दैनंदिन वापरातील अविभाज्य घटक असलेल्या हळद, आलं, मिरची, जिरं यासारख्या गोष्टींचे दरही गगनाला भिडले आहेत.

अतिवृष्टीमुळे यंदा बाजारामध्ये लसणाची आवक कमी झाली आहे. त्यामुळेच पुढील काही महिन्यांसाठी लसूण चढ्या दराने विकला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मागील काही महिन्यांपासून सुरु असलेली लसणाच्या दरामधील ही वाढ अजून किमान दोन ते तीन महिने कायम राहणार आहे. लसूण व्यापाऱ्यांनीच ही माहिती दिली आहे.यंदा लसणाने कांद्यालाही घाम फुटेल इतका दर काढला असून त्यामुळे गृहिणींचं बजेट कोलमडलं आहे. मागील काही महिन्यांपासून सातत्याने लसणाच्या किंमतीने सातत्याने झेप घेत आता थेट 600 रुपयांची मजल गाठली आहे.घाऊक बाजारामध्ये लसूण प्रतिकिलो 300 ते 400 रुपये दराने विकत मिळत आहे. तर किरकोळ बाजारपेठेमध्ये लसणाच्या दरांनी 500 ते 600 रुपये प्रतिकिलोचे दर गाठले आहेत.

गेल्या वर्षी पावसामुळे शेतमाल खराब झाला. तेव्हापासून लसणाचे दर वाढू लागले आणि ते चढतेच राहिले. गेल्या दीड वर्षापासून लसणाचे दर चढेच असल्याचं दिसत आहे. बाजारामध्ये लसणाचा तुटवडा असल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचं सांगितलं जात आहे.

### दर घसरण्यासाठी तीन महिन्यांचे ‘वेटिंग’

- आता थेट पुढच्या वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये नवीन माल बाजारामध्ये आल्यावर आल्यावर या किमती कमी होण्याची शक्यता, व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. गेल्या रविवारी श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात मध्य प्रदेशातून 9 ते 10 टेम्पो लसूण आला आहे.

**धायरी फाटा परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त**

# सावरकर उद्यानात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिंहगड रस्ता :** धायरी फाट्याजवळील (गारमळा भागात) महापालिकेने स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान विकसित केले आहे. त्या उद्यानातील इमारतीत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्यात आले आहे. पुणे जिल्हा परिषद (आरोग्य विभाग) आणि महापालिका (आरोग्य विभाग) यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. विशेषत: ज्येष्ठ नागरिकांसाठी तातडीने औषध उपचारांची चांगली सोय या उपकेंद्रामुळे झाल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत. नागरिक या सेवेचा लाभ घेत आहेत अशी माहिती या उपकेंद्रातील डॉ. प्रियंका सगर यांनी दिली.

गारमळा परिसरात (मानस सोसायटीजवळ) स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान आहे. या उद्यानासाठी आमदार भीमराव तापकीर यांच्या आमदार निधीतून निधी देण्यात आला आहे. या ठिकाणी दोन-तीन खोल्यांची एक इमारत आहे. इमारतीभोवती छोटेसे मैदान आहे. महापालिकेने या ठिकाणी व्यायामाची साधनेही बसवली आहेत. त्यांचाही नागरिक मोफत लाभ घेऊ शकतात. आता या इमारतीतच छोटेसे उपकेंद्र सुरू केल्यामुळे नागरिकांची तातडीच्या औषध उपचारांची सोय झाली आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तर पूर्ण मोफत आरोग्यसेवा आणि औषधोपचारसेवा दिली जाते. सध्या वारंवार हवामान बदलामुळे अनेकांना सर्दी, खोकला, ताप, पोट बिघडणे अशा विकारांचा त्रास होत आहे. अनेकांना अस्वस्थ वाटणे अशक्तपणा वाटणे असेही विकार होतात.अशावेळी या उपकेंद्राचा खूप मोठा उपयोग नागरिकांना होत आहे. सध्या येथे ब्लड प्रेशरची तपासणी होते.

# अपंग दिनानिमित्त नवक्षितिजच्या विशेष प्रौढाचे पथनाट्य सादरीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जागतिक अपंग दिनानिमित्त पुणे:जागतिक अपंग दिनाचे ओचित्य साधून नवक्षितिज येथिल विशेष मित्र , मैत्रिणि व प्रौढ व्यक्तींनी पर्यावरण संरक्षणाविषयी जागृतीसाठी “ पर्यावरण सरंक्षण .”या पथनाटयाचे तळेगाव मधिल पोलीस चौकी चौक , रेल्वे स्टेशन चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सादरीकरण केले. झाडे वाचवा ,झाडे जगवा ,पाण्याचा वापर जपून करा,ग्रीन पुणे सुंदर पुणे,भविष्यसाठी पर्यावरणाचे संरक्षण करा अशा विषयाचे फलक पदयात्रेस दिसत होते.

या वेळी कार्डल ऑफ लाइफ या वृद्धाश्रमाचे प्रमुख व माजी आर टी ओ अधिकारी माननीय हरिश्चंद्र गडसिंग , सह पोलीस निरीक्षक विशाल गजरमल,( प्रमुख पाहुणे) नवक्षितिजचे अध्यक्ष डॉ चंद्रशेखर देसाई आणि नवक्षितिजचे सर्व कुटुंबिय उपस्थित होते.

डॉ. चंद्रशेखर देसाई म्हणाले “मतिमंद प्रौढ विशेष व्यक्तींच्या पुनर्वसनाचे काम करण्यासाठी नवक्षितिज ही संस्था गेली २० वर्षे अविरतपणे काम करत आहे.सध्या ९० प्रौढ व्यक्ती संस्थेमधे कायम स्वरुपी रहात असून त्यांना उत्तम आरोग्य देण्यासाठी ५७ कर्मचारी कार्यरत आहे . विशेष मित्र व मैत्रिणि बद्दल समाजात जागृती व्हावी ,त्याचा आत्मविश्वास वाढावा व त्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी त्याचप्रमाणे ते एकत्र आल्यावर समाज जागृती सारखे ते कार्य करु शकतात हे लोकांना समजावे या उद्देशाने ही पथनाट्य व पदयात्रा सुरु केली.

## विवाह सोहळा देवांचा...!

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**लक्ष्मी रस्ता :** मंगलमय सूर आणि भक्तीने भारलेल्या वातावरणात प्रभू श्रीराम आणि सीता माई यांचा पवित्र आणि ऐतिहासिक विवाह सोहळा पुणेकरांनी प्रत्यक्ष अनुभविला. महाराष्ट्रात प्रथमच श्री सीतामाई व प्रभू श्रीरामचंद्र विवाह सोहळ्याचे आयोजन पुण्यात करण्यात आले होते.

# 'अमृत'च्या सल्लागारपदी विश्वजीत देशपांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारतीय जनता पक्षाचे नेते आणि ब्राह्मण संघटनांच्या माध्यमातून विविध पदांवर कार्यरत असलेले विश्वजीत देशपांडे यांची 'अमृत' महामंडळाच्या सल्लागारपदी निवड करण्यात आली आहे. विश्वजीत देशपांडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून हिंदू जनजागृती चे काम केले. त्यानंतर पुणे शहर भाजपा अंतर्गत अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

ब्राह्मण संघटनांचे एकीकरण आणि त्यांच्यामध्ये उद्योजकता विकास करण्याच्या दृष्टिकोनातून देशपांडे यांनी आजपर्यंत भरीव कार्य केले आहे. सातत्याने सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत सामाजिक सद्भाव आणि आर्थिक साक्षरता करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी आजपर्यंत मोठे काम केले या सगळ्यांची दखल घेत विश्वजीत देशपांडे यांची 'अमृत' या महामंडळाच्या सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

'अमृत' च्या माध्यमातून ब्राह्मण समाजासह खुला प्रवर्गातील जाती जमाती समूहांकरिता अर्थसहाय्यक करण्यासाठी प्रयत्न केले जातात. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी, महिला, स्पर्धा परीक्षांसाठी प्रयत्न करणारे तरुण, की डेव्हलपमेंट साठी प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच नवोदित उद्योजक यांच्यासाठी अनेक सवलती आणि योजना कार्यान्वित केले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून या अमृत महामंडळाचे निर्माण झाले आहे.

**नानासाहेब पेशवे यांच्या व्दिशताब्दी जन्मसोहळ्यानिमित्त**

# पुणे ते वेणगाव रथयात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नानासाहेब पेशवे यांचा व्दिशताब्दी जन्मसोहळा रविवार दिनांक ८ डिसेंबर रोजी वेणगाव (कर्जत) येथे संपन्न होणार आहे. या निमित्ताने इतिहास प्रेमी मंडळाने पुणे ते वेणगाव अशी नानासाहेब पेशवे रथयात्रा आयोजित केली असून, त्यामधे रायगड व शनिवारवाडा येथील जलकलश नेण्यात येणार आहेत. ८ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजता एसएसपीएमएस (श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल) येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन रथयात्रेला प्रारंभ होणार आहे, अशी माहिती इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे यांनी दिली.

» जलकलश

नानासाहेब पेशवे यांचा जन्म ८ डिसेंबर १८२४ रोजी रायगड जिल्ह्यातील कर्जत जवळच्या वेणगाव येथे झाला. त्यानिमित्त भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. चाणक्य मंडळाचे अध्यक्ष धर्माधिकारी यांचे भाषण होणार असून खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे व प्रशांत ठाकूर, पेशव्यांचे वारसदार पुष्कर पेशवे, इतिहास अभ्यासक मोहन शेटे उपस्थित राहणार आहेत. समारंभस्थळी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके, शस्त्र व क्रांतिकारक छायाचित्रे प्रदर्शन आयोजित केले आहे.

# ‘क्रिएटिव्ह’ बनली अनाथांचा ‘नाथ’...!

## संपर्क संस्थेच्या बालग्रामच्या १३० विद्यार्थ्यांना दिली मायेची उब

सामाजिक

**संपूर्ण जग उबदार पांघरुणे घेऊन थंडीचा सामना करत असतानाच बालग्राममधील अनाथ मुले आणि मुली या कडाक्याच्या थंडीत कुडकुडत होती; ही बाब समजताच कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या भव्य विजयाच्या निमित्त ‘ बालग्राम’ मधील या क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या वतीने तब्बल १३० मुलामुलींना सोलापूरी चादरी आणि संस्थेसाठी स्पिकरची भेट देण्यात आली.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरुड :** संपर्क संस्था बालग्राम च्या माध्यमातून अनाथ मुला मुलींचा सांभाळ करणे, त्यांचे शिक्षण पूर्ण करणे व पुढे लग्न ही लावून देणे हे कार्य कौतुकास्पद असून मी ह्या संस्थेच्या पुणे जिल्ह्यातील सहा व राज्यातील बारा शाखांना सर्वतोपरी मदत करेन असे वचन आ. चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. आमदार झाल्यानंतर मुंबई येथून पुण्याकडे येताना मळवली येथे क्रिएटिव्ह फाउंडेशन च्या वतीने संपर्क बालग्राम संस्थेस उपयोगी साहित्य भेट देण्याचा तसेच विद्यार्थ्यांतर्फे चंद्रकांतदादांचा सत्कार




करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर,फाउंडेशन च्या विश्वस्त व माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर,विश्वस्त सतीश कोंडाळकर, बालग्राम चे संस्थापक अमितकुमार बॅनर्जी, सामाजिक कार्यकर्ते सचिन निंबाळकर, चेतन जोशी उपस्थित होते.

चंद्रकांतदादा पाटील प्रचंड मताधिक्याने निवडून आल्यावर त्यांना काय भेट द्यावी याचा विचार करत होतो - मग त्यांनी ज्या पद्धतीने तळागाळातील नागरिकांना काय हवं नको याकडे लक्ष दिले व त्यांना ते पुरविण्याचा ध्यास घेतला - त्याच धर्तीवर विविध सामाजिक संस्थांना मदत करावी असे ठरविले आणि त्यास अनुसरून आज मळवली येथील संपर्क बालग्राम मधील १३० विद्यार्थ्यांसाठी दादांच्या हस्ते सोलापूरी चादरी तसेच स्पीकर सेट भेट देण्याचा उपक्रम पार पडला असे क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर म्हणाले.

> “बालग्राम संस्था खूप चांगलं काम करत असून एवढ्या अनाथ मुलांचा सांभाळ करण्याचे महत्वपूर्ण काम करत आहेत, त्यामुळेच मी देखील शासनाच्या स्तरावर आणि वैयक्तिक सी एस आर निधीतून संस्थेसाठी काय करता येईल याची यादी करून त्यासाठी प्रयत्न करणार आहे.."
>
> —**चंद्रकांतदादा पाटील,** आमदार, कोथरुड



क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष संदीप खर्डेकर हे चांगलं काम करणाऱ्या योग्य संस्थेची निवड करतात आणि त्यांना ज्या गोष्टींची आवश्यकता आहे ते पुरवितात असे आवर्जून नमूद करतातच असे गौरवोद्गार पाटील यांनी काढले.

## निधी राज्य शासनाला परत देण्याची नामुष्की

# धक्कादायक...! झेडपीकडे १३३ कोटींची अखर्चित रक्कम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रामीण भागाचा विकास मंदावला असतानाच निधी उपलब्ध असूनही जिल्हा परिषद प्रशासन त्याचा वापरच करत नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे, विशेष म्हणजे गेल्या दोन वर्षांमध्ये तब्बल 133 कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिला आहे

दहा वर्षांनंतर प्रथमच अखर्चीत रक्कम वसूल करण्यासाठी राज्य शासनाकडून वेगाने पाऊल उचलली जात असल्याचे दिसून येत आहे. राज्य शासनाने जिल्हा परिषदेला अखर्चीत राहिलेल्या निधी शासनाकडे जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

जिल्हा परिषदेचा 2021-22 या आर्थिक वर्षात 1 कोटी 59 लाख रुपये, तर 2022-23 या वर्षात 131 कोटी 60 लाख रुपयांचा निधी अखर्चीत राहिला आहे. वेळेत निधी खर्च न केल्याने पुणे जिल्हा परिषदेला एकूण 133 कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा करण्याची नामुष्की ओढावली आहे.

सर्वसाधारण शिक्षण या योजनेंतर्गत 13 कोटी 56 लाख, इतर ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत 50 कोटी 28 लाख रुपये, अनुसूचित जाती व विशेष कल्याण या योजनेत 6 कोटी 44 लाख रुपये, रस्ते व पूल भांडवली यातून 21 कोटी 15 कोटी रुपये यासह विविध जिल्हा परिषदेच्या विभागातून हा निधी अखर्चीत राहिल्या आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेकडून देण्यात आली.

राज्यातील कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन, विविध योजनांना देण्यात येणारे अनुदान, कर्ज व त्यावरील व्याज भागविण्यासाठी अखर्चीत रक्कम जमा करण्याची वेळ यंदा प्रशासनावर आली आहे. अखर्चीत रकमेसंदर्भात दररोज मंत्रालय स्तरातून आढावा घेण्यात येत आहे. जिल्हा परिषदेला दि. 31 मार्च 2022 पूर्वी वितरित केलेला व 31 मार्च 2023 पर्यंत अखर्चीत असलेला निधी 28 फेब्रुवारी 2024 पर्यंत खर्च करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर खर्च न झालेला निधी तातडीने शासनाकडे जमा करण्यासाठी आदेश देण्यात आले होते.

त्यात शासनाने ज्या विभागांसाठी निधी दिली आहे, त्यापैकी किती रक्कम खर्च झाली, किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली, किती रक्कम अद्याप जमा करावयाची आहे, याची योजनानिहाय माहिती एकत्रितरीत्या वित्त विभागास सादर करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने गेल्या दोन दिवसांत सर्व विभागाची अखर्चीत निधीची माहिती संकलित केली.




**हा निधी राहिला अखर्चित...!**

- **सर्वसाधारण शिक्षण योजना :** 13 कोटी 56 लाख रु.
- **इतर ग्रामीण विकास कार्यक्रम :** 50 कोटी 28 लाख रु.
- **अनुसूचित जाती व विशेष कल्याण योजना :** 6 कोटी 44 लाख रु.

# शहर फेरीवाला समिती दोन वर्षांपासून कागदावरच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहर फेरीवाला समितीची अधिसुचना काढावी यासाठी आता समितीचे सदस्य उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. अधिसुचना काढली गेली नसल्याने गेल्या दोन वर्षापासून ही समिती कागदावरच राहीली आहे.

महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन ) नियम २०१६ नुसार नगर पथविक्रेता समिती स्थापन करण्याची तरतदु आहे. या तरतुदीनुसार पुणे महापालिकेने समितीच्या आठ सदस्यांच्या जागांकरीता निवडणुक घेतली. तसेच इतर सदस्यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्त केलेल्या सदस्यांविषयी काही संस्था आणि संघटनांनी लेखी अहरपती घेतल्या होत्या. त्यावर सुनावणी घेऊन शहर फेरीवाला समितीच्या मान्यतेने संबंधित नियुक्तीत बदल करून नव्याने शहर फेरीवाला समितीची नावे राज्य सरकारला कळविली होती. सदर फेरीवाला समितीची निवडणुक व सदस्यांची नियुक्ती करून पावणे दोन वर्ष झाले तरी,राज्य सरकारकडून या समितीविषयीची अधिसुचना काढली गेली नाही. कायद्यानुसार ही अधिसुचना काढणे गरजेचे आहे.

सदर अधिसुचना काढण्यासंदर्भात पुणे महापालिकेने पाठविलेल्या प्रस्तावाकडे राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने दुर्लक्ष केले आहे. सदर प्रस्ताव प्रलंबित राहील्याने शहर फेरीवाला समितीची बैठक अद्याप पार पडू शकली नाही. नगर पथविक्रेता योजना तयार केली आहे. योजनेच्या आराखड्यावर हरकती आणि सुचना मागविल्या आहेत. हा आराखडा फेरीवाला समितीसमोर मांडून त्यास मंजुरी घ्यावी लागणार आहे.

**निर्णय घेण्याचे अधिकारच नाहीत**

- विधानसभा निवडणुक पार पडली असुन, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतरच या समितीची अधिसुचना काढली जाऊ शकते. गेल्या दोन वर्षापासून समितीचे सदस्य महापालिकेत केवळ खेटे मारत आहे. बैठकीची औपचारीकता पार पडत असली तरी, कोणताही निर्णय समितीला घेता येत नाही. यामुळे समितीचे सदस्य उच्च न्यायालयात दाद मागणार आहे.

**» Selected**

## प्रहार दिव्यांग क्रांतीच्या प्रदेशाध्यक्षपदी धर्मेंद्र सातव



**वाघोली :** महाराष्ट्रातील लाखो दिव्यांगांच्या न्याय हक्कासाठी यशस्वीपणे लढा देणाऱ्या प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदी पुणे जिल्ह्याचे वाघोली येथील सुपुत्र असलेलले धर्मेंद्र सातव पाटील यांची निवड करण्यात आली आहे. शेगाव बुलढाणा येथे झालेल्या प्रहार दिव्यांग संघटनेच्या महाराष्ट्रातील पदाधिकारी मेळाव्यात उपस्थित महाराष्ट्रातील बहुसंख्य प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष. राज्य समन्वयक . विभाग प्रमुख .यांच्या मागणीवरून धर्मेंद्र सातव पाटील यांची प्रहार संघटनेचे सर्वेसर्वा माजी आमदार बच्चु कडू यांनी प्रदेशअध्यक्ष म्हणून निवड जाहीर केली . निवड झाल्यानंतर प्रहार संघटनेचे सर्वे सर्वा बच्चू कडू यांनी निवड झाल्याबद्दल धर्मेंद्र सातव यांचे हार घालून सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सातव पाटील हे गेले 30 वर्षापासून दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी सनदशीर मार्गाने लढा देत आहे. प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलनाचे संस्थापक सदस्य असून संघटनेच्या स्थापनेपासून एकनिष्ठपणे बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली खांद्याला खांदा लावून काम करत आहेत.

## किरकोळ कारणावरुन खून

**पुणे :** सिमेंटच्या विटेने डोक्यात मारहाण करून एका व्यक्तीचा खून केल्याची घटना कोंढवा परिसरात गुरुवारी उघडकीस आली. या प्रकरणी कोंढवा पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ताहेर असगर शेगडीवाला (वय ५५, रा. कोंढवा) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. कोंढव्यातील भैरवनाथ मंदिराजवळ रिकाम्या पत्र्याच्या शेडमध्ये गुरुवारी सकाळी मृतदेह आढळून आला. याबाबत माहिती मिळताच कोंढवा पोलिस ठाण्यातील अधिकारी आणि गुन्हे शाखेचे श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी डोक्यात सिमेंटच्या विटेने मारहाण केल्याने ताहेर यांचा मृत्यू झाल्याचे दिसून आले. याबाबत ताहेर यांच्या नातेवाइकाने पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पूजा पाटील करीत आहेत.

## जलवाहिनी टाकण्यासाठी वाहतूक वळविणार

# सोलापूर मार्गावरील वाहतूक व्यवस्थेत बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सोलापूर मार्गावरील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. मम्मादेवी चौक ते अर्जुन रस्ता टी-जंक्शन दरम्यान जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू होणार असल्यामुळे वाहतुकीचा नव्याने आराखडा लागू केला गेला आहे. शुक्रवार रात्री आठ वाजल्यापासून एम. पी. पेट्रोल पंपाजवळ जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू होईल. या कामासाठी पुणे-सोलापूर रस्त्यावर वाहतुकीसाठी काही पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. हे बदल पुढील काही दिवस लागू असतील.

» वाहतूक

- **नागरिकांसाठी महत्त्वाचा सल्ला:** वाहतूक विभागाने नागरिकांना या बदलांबद्दल सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच, प्रवाशांनी प्रवासाच्या वेळेची योजना करताना या बदलांचा विचार करावा.
- **मार्गदर्शक सूचना:** जलवाहिनी टाकण्याच्या या कामामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, कामाच्या कालावधीत स्थानिक रहिवाशांनी आणि वाहनचालकांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. पुणे-सोलापूर मार्गावरील या वाहतूक बदलांमुळे प्रवासात काहीसा त्रास होऊ शकतो.

**वाहतूक बदल पुढीलप्रमाणे**

- **स्वारगेटला जाणारी वाहतूक:** सोलापूरकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ही वाहने अर्जुन रस्ता, मम्मादेवी चौक मार्गे सरळ स्वारगेटकडे जातील.
- **सोलापूरकडे जाणारी वाहतूक:** स्वारगेटकडून सोलापूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी मम्मादेवी चौकात सरळ जाण्यास बंदी आहे. या वाहनांना डावीकडे वळून बिशप सर्कलमार्गे उजवीकडे वळून सोलापूर रस्त्याला जावे लागेल. हा मार्ग एकेरी करण्यात आला आहे.
- **येणाऱ्या वाहनांसाठी मार्ग:** सोलापूरकडून येणाऱ्या वाहनांना सरळ मम्मादेवी चौक व गोळीबार चौक मार्गे इच्छित स्थळी जाण्यास परवानगी आहे. मात्र, मम्मादेवी चौकात उजवीकडे वळण्यास बंदी आहे. या वाहनांना गोळीबार चौकातून लष्कर मार्गे प्रवास करावा लागेल.
- **डॉ. कोयाजी रस्त्याची वाहतूक** डॉ. कोयाजी रस्त्याने येणाऱ्या वाहनांना हरप्रीत मंदिर चौकात उजवीकडे वळून खाणे मारुती चौक व पूलगेट बस स्थानक मार्गे कोंढव्याकडे जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# महामानवाला अभिवादन करण्यासाठी भीमसागर उसळला

## भीमसैनिकांची अलोट गर्दी; विविध कार्यक्रमाद्वारे आदरांजली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी भीमसैनिकांची अलोट गर्दी उसळली होती, त्यानिमित्त स्टेशन येथील आणि कॅम्पातील आंबेडकर पुतळा याठिकाणी अक्षरश; जनसागर उसळला होता. विविध संघटनांच्या वतीने रक्तदान शिबीरासह अन्य समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



### एमआयटी डब्ल्यूपीयूत महामानवास अभिवादन

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या स्मृतिंना उजाळा देऊन विनम्र अभिवादन केले. तसेच विद्यापीठाचे विश्वस्त, कुलगुरू, विविध विभागातील विभाग प्रमुख, डीन, डायरेक्टर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पाअर्पण करून अभिवादन केले.

या वेळी अमेरिकेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी,वरिष्ठ साहित्यीक आचार्य रतनलाल सोनग्रा, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एम.पठाण, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, प्रा.डॉ. विनोद जाधव, प्रा. डॉ. दत्ता दांडगे व प्रा. गायकवाड उपस्थित होते.

विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले," या देशातील लोकांना भगवान गौतम बुद्ध, म. गांधी आणि डॉ. आंबेडकर कधीच कळले नाहीत. ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. त्यामुळेच आत्मचिंतन किंवा आत्मपरिक्षणाची वेळ आली आहे. त्यांनी आपल्याला कर्तव्याची जाणिव करून दिली आहे. मानवता हीच भारतीय संस्कृतीचे खरे वलय आहे."

आचार्य रतनलाल सोनग्रा म्हणाले," अहमदनगरच्या जेलमध्ये जेव्हा मौलाना अबुल कलाम आझाद, पं. जवाहरलाल नेहरू, आचार्य नरेंद्र बंदिस्त होते. त्यावेळेस प्रत्येकाने ग्रंथ लिहिला. परंतू डॉ. आंबेडकर यांनी बाहेर राहून 'थॉट्स ऑफ पाकिस्तान' हा ग्रंथ लिहिला. एकाच वेळी देशात सर्वात सुंदर ग्रंथ निर्मिती त्याकाळी झाली होती. यामुळेच आपल्या देशात गुरूग्रंथ असे संबोधिल्या जाते. आज जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे."

त्यानंतर डॉ. अशोक जोशी, डॉ.एस.एम.पठाण, डॉ. आर.एम. चिटणीस, डॉ.दत्ता दांडगे, प्रा. विनोद जाधव डॉ.मिलिंद पात्रे, प्रा. गायकवाड यांनी भाषणातून सांगितले की, महामानव डॉ. आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान जगातील सर्वश्रेष्ठ आहे. त्याच प्रमाणे त्यांनी सर्वांना शिक्षणाचा अधिकार दिल्यामुळे आज देश प्रगतीपथावर आहे. डॉ. आंबेडकरांचे तीन गुरू होते भगवान गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिबा फुले हे होते. प्रत्येकाने आपले मूल्य ठरवून जीवन जगावे अशी बाबासाहेबांच्या शिकवणी ला उजाळा दिला.



**पुणे :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या स्मृतिंना उजाळा देऊन विनम्र अभिवादन केले.

### संविधानाची मूल्ये आचरणात आणण्याची गरज: प्रा. डॉ. गोसावी

भारतीय संविधानाचे अमृतमहोत्सवी वर्ष असून या संविधानाची मूल्ये जाणणे व ती आचरणात आणणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरणार असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व रासेयो आणि बीओडी यांच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. (डॉ.) सुधाकर जाधवर, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे, वित्त व लेखा अधिकारी श्रीमती चारूशिला गायके, अधिष्ठाता प्रा. (डॉ.) विजय खरे, प्रा. (डॉ) प्रभाकर देसाई, अधिसभा सदस्य प्रा. (डॉ.) राजेंद्र घोडे, मुकुंद पांडे, प्रा. (डॉ.) राधाकृष्ण पंडित आदी मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण आदरांजली वाहिली.

आमंत्रित प्रमुख वक्ते प्रा. (डॉ.) सुधाकर जाधवर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चिंतन आणि भारतीय समाज या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील विविध प्रसंगातून आणि घटनांच्या माध्यमातून तत्कालीन भारतीय समाजाबद्दल बाबासाहेबांचे विचार उपस्थितांसमोर मांडले. याप्रसंगी उपस्थितांनी बुद्धवंदनेने बाबासाहेबांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीओडीचे संचालक प्रा. (डॉ.) अभिजित कुलकर्णी यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ.बोकेफोडे यांनी केले.

### बोपोडीत हजारो दिप लावून अभिवादन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे , रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला राजर्षी शाहू चौक बोपोडी येथे हजारो दिवे लावून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. माजी उपमहापौर सुनिता परशुराम वाडेकर, अध्यक्ष परशुराम वाडेकर, शिवाजीनगर मतदार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी बुद्ध वंदना घेऊन बाबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# माझे माहेर पंढरी अन् हे भोळ्या शंकरा, आवड तुला बेलाची...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माझे माहेर पंढरी..., शरण जाता रमावरा सर्व सुखे आली घरा..., माझ्या भोळ्या महादेवा, आवड तुला बेलाची..., इंद्रायणी काठी देवाची आळंदी... अशा भक्तीगीतांनी कसबा पेठेतील श्री काळभैरवनाथ मंदिर परिसर भक्तीमय झाला. सांगीतिक कार्यक्रमाचे श्री काळभैरवनाथ जयंती उत्सवाचा समारोप झाला.



श्री बहिरोबा देव ट्रस्ट, श्री काळभैरवनाथ मंदिर कसबा पेठ तर्फे श्री काळभैरवनाथ जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पौराणिक महत्त्व असलेल्या पुण्याच्या कसबा पेठेतील प्राचीन ग्रामदैवत व क्षेत्रपाल श्री काळभैरवनाथ जयंती जन्माष्टमीच्या दिवशी उत्साहात साजरी करण्यात आली. उत्सवात पं. आनंद जोशी यांच्या 'संतवाणी' या भक्तीसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पं. आनंद जोशी यांनी विविध भक्तीगीतांचे सादरीकरण केले. त्यांना तेजस जोशी (तबला), वरद वाधवडे (हार्मोनियम), सौमिनी देवरे (व्हायोलिन), विवेक कुलकर्णी (तालवाद्य) यांची उत्कृष्ट साथ मिळाली. तसेच अंजली जोशी-हिंगणीकर, तन्वी पाटील, आणि श्रेयस जोशी यांनीही साथसंगत केली. डॉ. सरोज देवरे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

कार्यक्रमाची सुरूवात वक्रतुंड महाकाय या गणेश वंदनेने झाली. त्यानंतर खंडेरायाच्या लग्नाला बानू नवरी नटली... माऊली माऊली... या गीतांनी कार्यक्रमाच्या पूर्वाधात भाविक भक्तीमय झाले. आरंभी वंदीन अयोध्येचा राजा... माझे माहेर पंढरी या गीतांनी मंदिराचा परिसर भक्तीमय झाला. यावेळी कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

# शिवप्रतापदिनाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवप्रतापगड उत्सव समितीतर्फे 'शिवप्रताप दिन' नातूबाग येथे रविवारी (ता. ८) सायंकाळी पाच वाजता होणार असल्याची माहिती समितीचे कार्याध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी आमदार अतुल सावे, ॲड. अमोल डांगे, ॲड. स्मित शिंदे, बाळासाहेब भामरे आणि ऋषिकेश कामठे यांना विविध पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. या वेळी निवृत्त लष्करी अधिकारी विंग कमांडर शशिकांत ओक, जगद्गुरू तुकाराम महाराजांचे वंशज शिरीष महाराज मोरे उपस्थित राहतील.



# ज्येष्ठांची सेवा ही ईश्वर सेवा-डॉ. माशेलकर

**पुणे :** भारत हा देश आज तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो, परंतु कालांतराने देशातील ज्येष्ठांची संख्या वाढणार असल्याने सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या संस्थानी ज्येष्ठांच्या गरजा आणि सेवा पुरवण्यासाठी काम करणे आवश्यक आहे. कारण ज्येष्ठांची सेवा ही ईश्वर सेवाच आहे, असे मत पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

» पुरस्कार

इंटरनॅशनल लॉंजिव्हीटी सेंटर, भारततर्फे (आयएलसी-आय) कै. बी.जी. देशमुख उत्कृष्ट ज्येष्ठाश्रम पुरस्कार पुण्यातील वानप्रस्थाश्रम संस्थेला डॉ. माशेलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

भारती विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालय सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्राचे माजी पोलीस महासंचालक आणि इंटरनॅशनल लॉंजिव्हीटी सेंटरचे चेअरमन जयंत उमराणीकर, भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. शिवाजीराव कदम आणि भारती अभिमत विद्यापीठाचे उप-कुलगुरू डॉ. विकास सावजी आदी मान्यवर उपस्थित होते.

रूपये दहा हजार, मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## सोमवारपासून शहरात पालिकेचे सगळे विभाग उतरणार स्वच्छतेसाठी

# महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी करणार 'साफसफाई'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात सध्या ठिकठिकाणी कचरा पडला आहे. दुभाजक अस्वच्छ असून त्यातील झाडे वेडीवाकडी वाढली आहेत. रस्ते व्यवस्थित झाडले जात नसल्याने धुळीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. तसेच अतिक्रमणामुळे रस्त्यावर कचरा, खरकटे अन्न टाकण्याचे प्रकार वाढल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. पण दैनंदिन स्वच्छता योग्य पद्धतीने केली जात नसल्याने व बेशिस्त नागरिकांवर कारवाई केली जात नसल्याने शहराचे बकालीकरण वाढले आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी महापालिका प्रशासनाने सर्वंकष स्वच्छता (डीप क्लिनिंग) करण्याचा निर्णय सोमवार पासून घेतला आहे. यामध्ये महापालिकेचे सर्व विभाग, त्यातील कर्मचारी एकत्र येऊन दोन दिवसांत एक क्षेत्रीय कार्यालय स्वच्छ करणार आहेत. प्रत्येक विभाग अतिरिक्त मनुष्यबळासह काम करणार असल्याने स्वच्छता केली जाईल. अतिक्रमण, अनधिकृत फलकांवरही कारवाई केली जाणार आहे.



एकाच वेळी सुमारे दीड हजार कर्मचारी एका क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत उतरवून साफसफाई केली जाणार आहे. परिमंडळ एकमध्ये ९ ते १४ डिसेंबर या कालावधी ही मोहीम राबविली जाईल. ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयातून सोमवारपासून ही मोहीम सुरू होईल. शहर स्वच्छतेच्या संदर्भात नुकतीच पुणे महापालिकेत अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी बैठक घेतली. त्यामध्ये १५ क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त, आरोग्य निरीक्षक, अतिक्रमण निरीक्षक, आकाशचिन्ह विभाग, घनकचरा विभाग, विद्युत, उद्यान, पथ, मलनिःसारण यांसह अन्य विभागाचे अधिकारी, मोहल्ला कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

**अशी राबविणार स्वच्छता मोहिम**

- झोपडपट्टी, लगतचे रस्ते स्वच्छ करणे, रस्त्यावरील माती उचलणे
- भित्तिपत्रक, दुभाजकातील वाढलेले गवत, जाहिराती काढणे
- रस्त्यावर बंद पडलेली व बेवारस वाहने उचलणे
- डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नष्ट करणे
- रस्त्यावरील खड्डे बुजविणे, राडारोडा उचलणे
- पावसाळी गटार व सांडपाण्याचे चेंबर दुरुस्त करणे
- या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्थांना सहभागी करून घेणे
- प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात दोन दिवस स्वच्छता मोहीम

#रा

## मोफत मोतीबिंदू व शस्त्रक्रिया शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे सिटी व मायमर मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तळेगाव दाभाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मोफत मोतीबिंदू चेकअप व शस्त्रक्रिया शिबिर पार पडणार आहे. यासह इतर रोगनिदान चाचण्या होणार आहेत. दिनांक ८ डिसेंबर रोजी सकाळी १० ते २ वेळात शिबिर होणार आहे.

यावेळी डॉ. सुचित्रा नांगरे, डॉ. महेश दर्पणगिरी, अध्यक्ष किरण ओसवाल, दीपक फल्ले, विनोद राठोड, सौरभ मेहता, रेखा भेगडे, अजित वाळुंज, सुबोध मालपाणी आदी उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने कर्तव्यदक्ष नागरिक हा पुरस्कार सुरेश शिंदे यांना देण्यात येणार आहे. तसेच रोटरी कम्युनिटी कॉर्प्स (आरसीसी) आशा वर्कर्स तळेगाव दाभाडे सिटीचा शुभारंभ होणार आहे.

क्लबच्या अध्यक्षपदी अनिता सुनील भेगडे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी मंदाकिनी साळवे, सचिव पदी वैशाली मेठाळ, एडमिन डायरेक्टर शालिनी रणभारे, सल्लागारपदी संतोष परदेशी यांची निवड करण्यात आली आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष किरण ओसवाल व सहकाऱ्यांनी केले आहे.

## मोशीमध्ये एकावर चाकूने हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोशी :** जुन्या वादातून एका व्यक्तीवर चाकूने वार केले. तसेच त्याच्या पत्नीला मारहाण केली. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. ही घटना मंगळवारी (दि.३) रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास बोऱ्हाडेवस्ती मोशी येथे घडली.

विजय बाबासाहेब साळवे (वय २५), अजय बाबासाहेब साळवे (वय २४), ज्ञानेश्वर वसंत दुनघव (वय २२, तिघे रा. मोशी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी कैलास सुभाष सुधारे (वय ३५, रा. मोशी) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कैलास सुधारे यांच्या घराशेजारी आरोपी राहतात. त्यांच्यामध्ये सांडपाण्याच्या कारणावरून पूर्वी वाद झाले आहेत. त्या कारणावरून आरोपींनी कैलास यांच्या घराचा दरवाजावर जोरजोरात लाथा मारून दरवाजा तोडला. घरात येऊन कैलास यांच्यावर चाकूने वार केले. तसेच त्यांच्या पत्नीला बेदम मारहाण केली. एमआयडीसी भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

### मनपा निवडणुकीच्या तयारीला लागा, कलाटे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

# पालिका निवडणुकीत सर्वाधिक तरुण चेहऱ्यांना संधी मिळणार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** निवडणुकीत पराभव झाला, पण म्हणून आपण संपलेलो नाही. लाखाहून अधिक मतदारांनी आपल्यावर विश्वास ठेवला, हजारो कार्यकर्ते दिवसरात्र या निवडणुकी दरम्यान राबले. महाविकास आघाडी म्हणून आपण प्रामाणिकपणे एकत्र काम केले. आपल्या सर्वांचा मी ऋणी आहे. भविष्यातील शहराच्या विकासासाठी, जनसामान्यांना न्याय देण्यासाठी आता आपल्याला पूर्ण ताकदीने महापालिका निवडणुक लढायची आहे. त्यासाठी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागू, अधिकाधिक नवीन आणि तरुण चेहऱ्यांना संधी देऊ, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते राहुल कलाटे यांनी वाकड येथे केले.

विधानसभा निवडणूकीनंतर महाविकास आघाडीचे पदाधिकारी - कार्यकर्ते - मतदार यांच्यासोबत आयोजित आभार मेळाव्यात कलाटे बोलत होते. यावेळी पृथ्वीराज साठे, संजोग वाघेरे, हरीश नखाते, अरुण पवार, इम्रान शेख, गणेश भोंडवे, नवनाथ जगताप, संपत पवार, विजय काळे, किरण वाडगामा, दत्तात्रय देशमुख, वैशाली मराठे, सागर तापकीर, दिनेश नढे, उल्हास कोकणे, हेमंत डांगे, युवराज वाल्हेकर, साकी गायकवाड, मयुर जैस्वाल, माधव पाटील, नवनाथ तरस, अनिता तुतारे, विश्रांती पाडाळे, सचिन नेटके, बाळासाहेब नढे, संदेश नवले, अनिरुद्ध कांबळे, मकरध्वज यादव, चिंतामण सोंडकर, माऊली मलशेट्टी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



**दिल्लीची हुकूमशाही आता महाराष्ट्रातही..**

● संविधान दिनी राष्ट्रपती, पंतप्रधान व विरोधी पक्षनेते यांनी लोकसभेच्या सभागृहात बोलण्याची परंपरा आपल्या देशात होती. त्यानुसार सर्वांना बोलू द्यावे, अशी मागणी विरोधी पक्षाने सध्याच्या सरकारकडे केली मात्र ती मागणी धुडकावून लावण्यात आली. अशी माहिती खुद्द शरद पवार साहेबांनी आम्हाला दिली. अशीच हुकूमशाहीवृत्ती दिल्लीतुन मुंबईपर्यंत आणि आता संपुर्ण महाराष्ट्रात देखील आली आहे. चिंचवडमध्येही यापूर्वीच उदघाटन झालेल्या प्रकल्पांचे पुन्हा उदघाटन अजून शपथविधीही झालेला नसतांना विद्यमान आमदारांनी केले, अशी खोचक टीका कलाटे यांनी केली.

या निवडणुकीत सर्वच पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी एकजुटीने दिलेला लढा कौतुकास्पद आहे. आगामी काळात महापालिका निवडणूकीत याच ताकदीने, एकजुटीने काम करु. लोकहितासाठी नेटाने काम केल्यास या महापालिकेत सर्व तरुण चेहरे दिसतील. इथल्या आमदारांचा जीव महापालिकेत आहे आणि हीच महापालिका त्यांना आपण मिळू द्यायची नाही. त्यांचे मनसुबे धुळीत मिळविण्यात यशस्वी होऊ, असा निर्धार कलाटे यांनी व्यक्त केला. देशातील लोकशाही जिवंत ठेवायची असेल, पुढच्या पिढीचे भवितव्य सुरक्षित करायचे असेल तर चुकीच्या प्रवृत्तींविरोधात लढा उभारावा लागेल. विधानसभेला लाडकी बहीण, 'कटेंगे तो बटेंगे' असे नरेटिव्ह तयार करून सर्वसामान्य लोकांची दिशाभूल करण्यात आली. शहराच्या मूलभूत प्रश्नापासून लक्ष हटवून वेगळ्याच मुद्द्यांवर ही निवडणूक झाली. या सर्व वाईट प्रवृत्तींविरोधात लढा उभारावा लागेल. शहरातील बिघडलेली व्यवस्था सुधारण्यासाठी चांगल्या विचारांची तरुण पिढी पुढे आणावी लागेल.

## शेतकऱ्यांची रब्बी पिकाच्या पेरणीची लगबग सुरू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** मावळ तालुक्यातील मुख्य खरीप भात पिकाच्या कापण्या पूर्ण झालेल्या असून आता मावळातील शेतकऱ्यांची रब्बी पिकाच्या पेरण्याची लगबग सुरू झालेली आहे. यावर्षी भात पिकाचे उत्पन्न अतिशय चांगले आल्याने शेतकरी आनंदी व समाधानी आहेत.

मावळ तालुक्यात यावर्षी १२ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावर भात पीक घेण्यात आले होते. या सर्व भात पिकाची कापणी पूर्ण झालेली असून यातील सुमारे ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांनी भाताची झोडणी केलेली आहे. या वर्षी भात पिकाला चांगले उत्पन्न आल्याने शेतकरी अतिशय समाधानी आहेत. या वर्षी मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी सुमारे ९५ टक्के क्षेत्रावर इंद्रायणी जातीचे भात पीक घेतलेले आहे. तर अन्य ५ टक्के फुले समृद्धी, कोलम, आंबेमोहोर, बासमती, स्थानिक ही भात पिके घेतलेली आहे.

मावळ तालुक्याचे कृषी अधिकारी दत्तात्रय पडवळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खरीप भात पिकासाठी शेतकऱ्यांना प्रथमपासून कापणीपर्यंत मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे वेळोवेळी आलेल्या अडचणी संदर्भात प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन केले. यावर्षी जून महिन्यात मान्सूनच्या पावसाने ताण दिल्याने जुलै महिन्यापासून खरीप भात पिकाच्या लावणीला सुरुवात झाली होती. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यापर्यंत हे भात पीक पूर्ण कापणीस तयार झाले होते.

# भोसरीतील सेक्टर बारासह अन्य गृहप्रकल्पांची होणार तपासणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी -** सेक्टर १२ या गृहप्रकल्पांसह इतरही गृहप्रकल्पांचीही पाहणी करण्याची सूचना 'पीएमआरडीए'चे आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहेत. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना या सूचना दिल्या आहेत. गृहप्रकल्पांमध्ये त्रुटी आढळल्यास ठेकेदार व इतरांवर फौजदारी गुन्हा दाखल होईल, असा इशाराही म्हसे यांनी दिला आहे.




पेठ क्रमांक १२ भोसरी भागात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गृहप्रकल्प एक आणि दोनमध्ये जवळपास साडेचार हजार सदनिकांची उभारणी करण्यात येणार आहे. मात्र, पहिल्या टप्प्यातील गृहप्रकल्पात सदनिकेतील बाथरूम, टॉयलेट, टेरेस, सोलर वाटर लाईन, ड्रेनेज लाईन याबाबत विविध समस्या निर्माण झाल्या होत्या. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी छत गळत असल्याच्या तक्रारीही नोंदवण्यात आल्या आहेत. ठिकठिकाणी स्लॅब देखील निखळून पडले आहेत.

या प्रकल्पातील नेमके कोणते दोष आहेत, याची तपासणी करण्याचे आदेश अभियांत्रिकी विभागाला दिले होते. दरम्यान, या प्रकल्पातील दर्जाची तपासणी करण्याची जबाबदारी मुंबईतील आयआयटी या संस्थेला देण्यात येणार होती. मात्र, त्याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार पूर्ण करण्यात आला नव्हता. तसेच तांत्रिक कारणाअभावी त्याऐवजी इतर कंपनीच्या माध्यमातून या दर्जाची तपासणी पूर्ण करण्यात येणार आहे. त्या अहवालामध्ये काही दोष आढळून आल्यास याबाबत संबंधित बांधकाम व्यावसायिक अडचणीत येऊ शकतो. याबाबत फौजदारी कारवाईही संबंधित व्यावसायिकांवर होऊ शकते, अशी माहिती म्हसे यांनी दिली.

## मोरवाडीत नव्याने दोन न्यायालय स्थापन करण्याच्या हालचाली सुरू



**मोरवाडी-** मोरवाडी येथे ५ न्यायालय फर्निचर सहित तयार असून या ठिकाणी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय व जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड मधील वकिलांनी वारंवार मागणी केली होती. सदर न्यायालयांच्या प्रस्तावास मुंबई उच्च न्यायालयाने मंजुरी दिली असून सदरचा प्रस्ताव निधी अभावी शासन स्तरावर प्रलंबित आहे. परंतु सदरच्या प्रक्रियेला वेळ लागणार असल्यामुळे तोपर्यंत इतर दोन न्यायालये पिंपरी मोरवाडी येथे सुरू करण्यासाठी आज रोजी मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम. के. महाजन साहेब तसेच पिंपरी न्यायालयातील दिवाणी न्यायाधीश श्री. एम. जी. मोरे यांनी आज रोजी मोरवाडी येथील जुन्या न्यायालयाची पाहणी केली. यावेळी आकुर्डी येथील महापालिकेचे सुरू असलेले दिवाणी न्यायालाय मोरवाडी येथे स्तलंतरित करावे जेणेकरून वकिलांना व पक्षकारांना जवळ जवळ दोन्ही न्यायालय होऊन त्रास कमी होईल अशी मागणी महाराष्ट्र आणि गोवा नोटरी असो चे अध्यक्ष अॅड. अतिश लांडगे यांनी केली.

तसेच यावेळी पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशन चे माजी अध्यक्ष संजय दातीर पाटील, अॅड. दिनकर बारणे, अॅड. गोरक्ष लोखंडे (महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग- सदस्य), अॅड. श्रीराम गालफाडे, अॅड. निलेश भिसडे, श्री शुभम मचाले उपस्थित होते.

## पिंपळेगुरवमध्ये तरुणावर कोयत्याने वार तरुण जखमी




**पिंपळे गुरव :** गल्लीत का बसलात, असे म्हणत तीन जणांच्या टोळक्याने कोयत्याने तरुणावर वार केले. त्यानंतर कोयता हवेत फिरवत परिसरात दहशत निर्माण केली. याप्रकरणी सांगवी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. ही घटना जवळकरनगर, पिंपळेगुरव येथे घडली.तन्मय अविनाश कांबळे (वय १८), तथागत उर्फ आयुष महेंद्र कोले (वय २०, दोघे रा. पिंपळे गुरव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्यासह अभी सुरवसे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अक्षय दत्तू कळसकर (वय २६, रा. पिंपळे गुरव) यांनी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

अक्षय हे त्यांच्या मित्रांसोबत घराजवळ गप्पा मारत थांबले होते. तिथे आरोपी आले. तन्मय आणि तथागत यांनी अक्षय यांना शिवीगाळ करून दगडाने मारहाण केली. अभी याने कोयत्याने अक्षय यांच्यावर वार केले. यात अक्षय यांचा जीव जाईल याची कल्पना असताना देखील आरोपींनी हा हल्ला केला. त्यानंतर आरडाओरडा करीत कोयता हवेत फिरवून परिसरात दहशत निर्माण केली. सांगवी पोलीस तपास करीत आहेत.

## चऱ्होलीयेथे विद्युत खांब उभारण्यात यावा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चऱ्होली :** आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीत असलेल्या चऱ्होली येथील काळे कॉलनीमध्ये विद्युत खांब उभारण्यात यावा अशी मागणी सचिन काळे युवा मंचच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात आळंदी नगरपरिषदेच्या विद्युत विभागाचे अभियंते विष्णूकुमार शिवशरण यांच्याकडे लेखी निवेदन देऊन विद्युत खांब उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, काळे कॉलनी येथे गेल्या १० वर्षापासून काही भागातील रस्त्यावर विद्युत खांब नसल्याने रात्रीच्यावेळी अंधाराचे साम्राज्य असते. रात्री रस्त्यावर लाईट नसल्यामुळे महिलांना रस्त्यावर ये -जा करता येत नाही. अनेक विद्यार्थीनी संध्याकाळी शिकवणीसाठी घराबाहेर ये- जा करत असतात. या अंधाराचा फायदा घेऊन काही टवाळखोर त्या ठिकाणी विद्यार्थिनींची छेडछाड काढण्याच्या घटनाही घडत आहेत.

वारंवार नगर परिषदेच्या विद्युत विभागाच्या अभियांत्यांना तोंडी तक्रार दिली आहे.

पण ते गांभीर्याने घेत नाहीत. परंतु या ठिकाणी महिला व विद्यार्थिनींबाबतीत एखादी घटना घडल्यानंतर नगरपरिषदेला जाग येणार आहे का? त्यामुळे तातडीने या ठिकाणी विद्युत खांब उभारून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी सचिन काळे युवा मंचच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक अँड सचिन काळे, युवा नेते मंगेश काळे उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत – शहराध्यक्ष योगेश बहल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खराळवाडी :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी योगेश बहल म्हणाले की, डॉ. आंबेडकरांचे जीवन हे केवळ एक व्यक्ती नसून संपूर्ण भारतीय समाजासाठी प्रेरणास्त्रोत आहे. बाबासाहेबांनी आपले बहुतांश आयुष्य सामाजिक विषमता, जातीय भेदभाव आणि वंचित वर्गाच्या हक्कांसाठी लढण्यात घालवले. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आणि त्यांची विचारधारा तसेच आजही त्यांनी समाजासाठी दिलेला बंधुता, समानता, एकात्मतेचा संदेश चिरंतनकाळ प्रेरणास्त्रोत म्हणून राहील. अशा महामानवाला आपण सर्वजण महापरिनिर्वाण दिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस आदरांजली वाहतो.यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, भोसरी विधानसभा संघटक प्रकाश सोमवंशी, माजी नगरसेवक राजू बनसोडे, बन्सी पारडे, ओबीसी अध्यक्ष विजय लोखंडे, ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष अॅड सचिन औटे, महिला कार्याध्यक्षा कविताताई खराडे, असंघटीत कामगार अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ, व्यवस्थापन सेल अध्यक्ष अकबर मुल्ला, झोपडपट्टी विभाग अध्यक्ष संतोष निसर्गंध, वाहतूक सेल अध्यक्ष विनोद वरखडे, उद्योग व व्यापार अध्यक्ष श्रीकांत कदम, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हाने, प्रसन्ना डांगे, उपाध्यक्ष गोरोबा गुजर, संदिपान झोंबाडे, ख्रिश्चन सेल अध्यक्ष डॅनियल दळवी, उपाध्यक्ष बापू कातळे प्रदीप गायकवाड, सामाजिक न्याक विभाग कार्याध्यक्ष यश बोथ, सामाजिक न्याय उपाध्यक्ष कुमार कांबळे, सरचिटणीस अभिजीत आल्हाट, विनय शिंदे, रवींद्र सोनवणे, निखिल सिंह, राजू चांदणे, झहीर (छोटू) खान, जावेदभाई जकाते, सचिन वाल्हेकर नीलम कदम, श्रीनिवास बिराजदार, सतीश सूर्यवंशी, विराज बनसोडे, कार्यालयीन संपर्क प्रमुख धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादी पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## बाजारात बनावट कपडे विक्री




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** नामांकित 'ब्रॅण्ड'चे बनावट कपडे विक्री केल्याप्रकरणी वाकड येथील एका दुकानदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुण नरेश शर्मा (वय ३८, रा. वाकड) असे गुन्हा दाखल झालेल्या दुकानदाराचे नाव आहे. याप्रकरणी महेंद्र सिंग (वय ३७, रा. कसबा पेठ, पुणे) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शर्मा याचे कस्पटे वस्ती वाकड येथे कपड्यांचे दुकान आहे. त्याने दुकानामध्ये नामांकित कंपन्यांचे स्टिकर असलेले कपडे विक्रीसाठी ठेवले होते. कंपनीला बनावट कपड्यांची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कंपनीकडून पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. पोलिसांनी याबाबत कारवाई करत दोन लाख ६३ हजार २३० रुपये किमतीचे बनावट कपडे जप्त केले आहेत. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

### मतदान नोंदणी शिबिराचे उद्घाटन

# मोहननगर येथे मोफत मतदान स्मार्ट कार्ड वाटप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मोहन नगर :** धाराशिव मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार कैलास पाटील यांनी शिवसेना शाखा मोहननगर येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी मोफत मतदान स्मार्ट कार्ड वाटप व नवीन मतदान नोंदणी शिबिराचे उद्घाटन आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पुन्हा निवडून आल्याबद्दल शिवसेना शाखेच्या वतीने आमदार कैलास पाटील यांचा श्रीफळ शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर नवीन मतदान नोंदणीचे फॉर्म व ज्येष्ठ नागरिकांचे मतदान कार्डचे स्मार्ट कार्ड वाटप आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगरसेविका मीनल यादव, शिवसेना विभाग प्रमुख विशाल यादव, शशिकांत पांडाळे, नागेश नामदे, मधुसूदन आंबुसकर, सोमनाथ अलंकार, मोहन धापटे, रघुभाऊ कदम, काशीद काका, भोसले साहेब, दत्तात्रय धावडे, राजू खजिनदार, निलेश सुबे, संजय वडपल्ली, संजोग महाजन असे अनेक शिवसैनिक व मोहननगर मधील नागरिक यावेळी उपस्थित होते.


**जाहीर समन्स**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**
**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**
बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२

**उत्कर्ष ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.** ...अर्जदार
पत्ता : वडगांव निंबाळकर ता. बारामती.जि पुणे
विरुद्ध ...जाबदेणार

| अ.क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सुरेश लक्ष्मण धुमाळ मु. पो. वडगांव निंबाळकर ता. बारामती जि. पुणे | १ | ८६५/२४ | १३,५८,७८३/- |
| २. | श्री. नितिन मुरलीधर मोरे तावरे बंगला, आमराई, बारामती | २ | ८६५/२४ | १३,५८,७८३/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक १३-१२-२०२४ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळे वर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून आज दिनांक २९-११-२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही
(श्री एस. एम. तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे
सहकारी फेडरेशन लि., पुणे



**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येते की माझे पती सलिम कादर पानसरे, राहणार सेक्टर २६ , प्राधिकरण निगडी , पुणे ४११०४४. यांचे ०३.०७.२०२४ रोजी निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेली चार वाहने अनुक्रमे (१) TVS तिनचाकी रिक्षा नंबर MH 14-CU-3022 चासीस नंबर MD6M14CK1G4D10773 व इंजिन नंबर QK4DG025885

(२) दोन चाकी वाहन नंबर MH 14-ES-6606 चासीस नंबर MBLHA10BLEGJ04136 व इंजिन नंबर HA10ETEGJ19245

(३)अशोक लेलॅण्ड ट्रक नंबर MH-14-BJ-0587 चासीस नंबर LNR161364 व इंजिन नंबर LNH527387 (४) चार चाकी वाहन नंबर MH-14-HW-9655 चासीस नंबर MA3JMT81SKH210449 व इंजिन नंबर K12MN9020480

असे असून सदर चारही वाहने त्यांची कायदेशीर वारसदार पत्नी सायराबानो सलीम पानसरे यांच्या नावावर करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असेल तर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात ७ दिवसात कळविण्यात यावे .अन्यथा सदर वाहन त्यांच्या नावावर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.०६/१२/२०२४

शिक्का

सायराबानो सलीम पानसरे
राहणार सेक्टर २६ , प्राधिकरण
निगडी , पुणे ४११०४४.

# ‘लाडक्या बहिणीं’चा भार?

विधानसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ शिंदे सरकारने महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देण्याची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. त्याचा परिणाम निवडणुकीत मतांचा पाऊस पडण्यात दिसला. या योजनेमुळेच महायुतीला एकहाती सत्ता मिळाली असे म्हणता येईल. पण ही योजना राबविण्यासाठी इतर सरकारी कर्मचा-यांना मिळणारा आर्थिक लाभ स्थगित ठेवून त्याचे पैसे लाडक्या बहिणींसाठी वापरले अशी चर्चा आहे. या लाडक्या बहिणींसाठी १७ हजार कोटी खर्च होत आहेत म्हणे. त्यामुळे राज्याचा आर्थिक विकास खुंटला असून राज्याच्या कर्जात दोन हजार कोटींची वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे. महायुतीने निवडणूक प्रचारात पुन्हा सत्ता मिळाल्यास लाडक्या बहिणींना दीड हजार ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. ती आता सत्ता मिळाल्याने पूर्णत्वास नेण्याशिवाय पर्याय नाही. लाडक्या बहिणींमुळे सत्ता मिळाली पण कर्जबाजारी राज्याचा विचार कोण करणार? राज्यकर्त्यांनी जनतेने न मागता मतांसाठी मतदारांना खुश करण्यासाठी त्यांच्यावर सवलतींचा वर्षाव केला. सरकार कोणाचेही असो निवडणुका जवळ आल्या की ते सवलतींचा वर्षाव करते. एकदा का सत्ता मिळाली की ते आपले खरे रूप दाखवतात. केवळ निवडणुकीपुरती स्वस्ताई आणायची आणि नंतर महागाईला थैमान घालू द्यायचे! असे होऊ नये म्हणून सरकारने वास्तवाचे भान ठेवून कोणत्याही योजना राबवाव्यात. महागाईचा फटका सर्वसामान्यांना बसतो हे लक्षात ठेवून पावले उचलायला हवीत. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आले असले तरी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलांना २१०० रुपयांसाठी पुढील भाऊबीजेपर्यंत वाट पहावी लागणार आहे. पात्र महिलांना २१०० रुपये देण्याआधी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करावी लागणार आहे. त्यानंतर त्याची अंमलबजावणी होईल. त्यामुळे लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात वाढीव रक्कम जमा करण्यासाठी आणखी १० महिन्यांचा कालावधी लागेल असे भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे लाडक्या बहिणींमध्ये खळबळ उडाली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत २०२४ च्या अर्थसंकल्पात दीड हजार रुपयांप्रमाणे ४५ हजार कोटींची तरतूद केली होती. त्यानुसार जुलै २०२४ पासून पात्र महिलांच्या बँक खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली. नोव्हेंबरपर्यंत अडीच कोटी महिलांच्या बँक खात्यात दीड हजार रुपयांप्रमाणे पैसे जमा करण्यात आले. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आल्यास २१०० रुपये देण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनानुसार वाढीव रक्कम नाही दिल्यास महायुतीची तसेच भाजपची प्रतिमा मलिन होईल याची आम्हाला कल्पना आहे असे मुनगंटीवार म्हणाले. त्यामुळे आपण मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहोत. आपण आपल्या शब्दावर ठाम राहिले पाहिजे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योजनेतील रक्कम वाढविण्याचे आश्वासन प्रचार सभांमधून दिले होते. त्यावेळी आपणच मुख्यमंत्रिपदी कायम राहू अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र निकालानंतर राज्यातील सत्तेचे चित्र पालटले असून देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. आता ‘शिंदे सरकार’ अस्तित्वात नसल्याने वाढीव निधीचे आश्वासन पाळण्याचे कोणतेही बंधन ‘फडणवीस सरकार’वर नाही ही वस्तुस्थिती आहे. नव्या सरकारला वाढीव हप्त्यासाठी मोठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागणार असून त्यासाठी आर्थिक स्थितीचा पुन्हा एकदा आढावा घ्यावा लागणार आहे. नव्या सरकारकडून मांडल्या जाणाऱ्या पूर्ण अर्थसंकल्पामध्ये आर्थिकदृष्ट्या शक्य असेल तरच निधी वाढवण्याचा फेरविचार केला जाऊ शकतो. फडणवीस सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. पूर्ण अर्थसंकल्प मांडल्याशिवाय वाढीव निधीचा मार्ग सुकर होण्याची शक्यता नाही असे दिसते. राज्यावर कर्जाचा बोजा वाढत असल्याने योजनेतील निधीमध्ये वाढ केली जाऊ नये, असे प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सध्या दिली जाणारी मासिक दीड हजार रुपये रक्कम कायम ठेवावी अशी या अधिकाऱ्यांची सूचना आहे म्हणे. वाढीव निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्याचे आश्वासन शिंदे यांनी दिले होते. परंतु आता ते मुख्यमंत्री नसल्याने आणि निवडणूकही झाली असल्याने नव्या रेवड्यांची घोषणा करण्याची नव्या सरकारला गरज नाही. शिंदे सरकारने योजनांवर सढळ खर्च केल्याने आता अर्थमंत्रालयाला हात आखडता घ्यावा लागणार आहे. अर्थमंत्रालयाची जबाबदारी अजित पवार यांच्याकडेच राहण्याची शक्यता असल्याने त्यांनाही आर्थिक नियोजनावर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. अजित पवारसुद्धा वाढीव निधीच्या आश्वासनांचा फेरविचार करतील असा अंदाज आहे. वाढीव रक्कम देण्याचे आश्वासन पाळले गेले नाही तर ती मतदारांची फसवणूक ठरेल असेही नाही. कारण मोदी सरकारने प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये देण्याचे आश्वासन तरी कुठे पाळले? तरीही मतदारांनी भाजपला मते दिलीच ना! त्यामुळे वाढीव रक्कम दिली नाही म्हणून लाडक्या बहिणी नाराज होतील असे नाही. दीड हजार तर दीड हजार! लाडक्या बहिणींच्या कागदपत्रांची पडताळणी होणार आहे म्हणे. त्यात त्रुटी आढळल्यास त्यांना योजनेला मुकावे लागणार आहे. नवे सरकार पात्र महिलांच्या कागदपत्रांची तपासणी करणार आहे. त्यानुसार खोटे दावे करणाऱ्या किंवा फसवणूक करणाऱ्या लाभार्थींना योजनेतून वगळण्यात येणार आहे. जे लाभार्थी निवृत्तिवेतनधारक आहेत, ज्यांच्याकडे चारचाकी वाहन आहे, ज्या महिलांच्या नावावर पाच एकरपेक्षा अधिक जमीन आहे अशा लाभार्थींना या योजनेतून बाद केले जाणार आहे. एका कुटुंबातील फक्त दोन महिलांनाच या योजनेचा लाभ मिळेल. मते जिंकण्यासाठी ज्यांचा ‘लाडक्या बहिणी’ असा उदो उदो झाला त्याच आता राज्याला भार ठरणार आहेत असे दिसते!

एकीकडे, आधुनिक दळणवळण माध्यमे आणि वाहतुकीच्या साधनांमुळे आजचे डिजिटल जग जागतिक खेड्यात रूपांतरित झाले आहे. आज सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे सर्व भूभागांवर ‘नजर’ ठेवली जात असून अनेक गुन्हेगारांचा शोध घेण्यात तंत्रज्ञान प्रभावी ठरत आहे. असे असताना देशभरातून दरवर्षी ८०,००० हून अधिक मुले बेपत्ता होतात असे जर नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोची आकडेवारी दर्शवत असेल तर ती निश्चितच चिंताजनक आणि धक्कादायक बाब आहे. घरातून हरवलेली मुलं घरी परत न येण्याची शक्यता जवळपास १०० टक्के असते. काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या यूएनच्या अहवालानुसार आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील सरकारविरोधी सशस्त्र संघटनांनी मुलांना त्यांच्या संघर्षात सहभागी बनवले आहे. सरकारी आणि निमसरकारी प्रयत्न करूनही मुले गायब का होताहेत?

# कुठे गायब होताहेत मुले?



**शुभांगी कुलकर्णी, समाजशास्त्र अभ्यासक**

मानवी तस्करी हे आधुनिक जगातील कटू वास्तवही आहे आणि बहुविकसित तपास यंत्रणांपुढील जटिल आव्हानही आहे. विशेषतः बालकांची तस्करी ही जागतिक पटलावरची एक मोठी समस्या बनली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) या तस्करीचे संघटिन नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी अलीकडेच देशातील सहा राज्यांमध्ये २२ ठिकाणी छापे टाकले. एनआयएने हे प्रकरण स्थानिक पोलिसांकडून ताब्यात घेतले आहे. आज एकीकडे डिजिटल तंत्रज्ञानाच्या व्याप्तीमुळे जग ग्लोबल व्हिलेजचे रुप धारण करत आहे. दळणवळणाची साधने अत्याधुनिक असल्याने एकमेकांशी संपर्क करणे, साधणे सहज सोपे झाले आहे. दुसरीकडे याच जगातील भारतातून दररोज हजारोंच्या संख्येने मुले बेपत्ता होत आहेत. विशेष म्हणजे  पापणी लवण्याच्या आत एखादी माहिती एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे पोचत असताना आणि सर्व गोष्टी कॅमेऱ्याच्या कक्षेत आलेल्या असताना दरवर्षी देशभरातील सुमारे ८० हजारांहून अधिक मुले बेपत्ता होण्याचा अर्थ काय काढायचा? मुलांच्या ‘नॉट रिचेबल’चे वाढते प्रमाण हे चिंताजनक पातळीवर पोचले आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या म्हणजेच ‘एनसीआरबी’च्या डिसेंबर २०२३ च्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये ८३,३५० मुले गायब झाली होती. यामध्ये २०,३८० मुले आणि ६२,९४६ मुली आणि २४ तृतीयपंथीयांचा समावेश आहे. यापूर्वी ‘एनसीआरबी’ने २०२२ मध्ये सादर केलेल्या डेटानुसार बेपत्ता मुलांची संख्या ७६,०६९ होती. याचाच अर्थ वर्षभरात बेपत्ता होणाऱ्या मुलांची संख्या ही सहा हजारांनी वाढलेली दिसते. २०२१ मध्ये बेपत्ता होणाऱ्या मुलांची संख्या केवळ ३३६५० होती. या आकडेवारीने एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे बेपत्ता होण्याच्या संख्येत वर्षागणिक प्रचंड वाढ होत आहे. एकीकडे मुलांच्या सुरक्षेसाठी पालकवर्ग आणि पोलीस पूर्वीच्या तुलनेत अधिक सजगता बाळगत असताना आणि अत्याधुनिक उपकरणांच्या बळावर सुरक्षा व्यवस्था चौकस केली जात असताना लहान मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण मात्र कमी होताना दिसत नाहीये, हे खरे पाहता आपल्या एकूण तपास यंत्रणांचे घोर अपयश म्हणायला हवे. विशेष म्हणजे ‘एनसीआरबी’ची आकडेवारी अपूर्ण स्वरुपाची आहे. प्रत्यक्षात मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण त्याहून अधिक आहे. काही स्वयंसेवी संस्थांच्या मते, दरवर्षी ८० ते ८५ हजार नाही तर अनेक लाख मुले बेपत्ता होत आहेत. म्हणजेच देशात दर मिनिटाला किमान दोन मुले गायब होताहेत. घरापासून निघून जाणारी मुले शेवटी असतात कोठे? अनेक महिने शोध घेऊनही त्यांचा पत्ता का लागत नाही? हा प्रश्न चिंताजनक आहे. घरातून निघून गेलेली मुले परत येण्याची शक्यता ही असून नसल्यासारखीच असते. काही बेपत्ता मुले सापडतात आणि त्यांच्यासंदर्भात थोडीफार माहिती गोळा करू शकतो. त्यांना कोणी आमिष दाखवून कसे पळवून नेले, हे देखील समजते. परंतु जी मुले परत आलीच नाहीत, त्यांच्यासंदर्भात त्यांच्या पालकांना काहीच ठाऊक नसते.

पोलिसांकडे पूर्वीच्या तुलनेत आज चौकशीसाठी आणि तपासाठी चांगली साधने आहेत. तरीही बेपत्ता मुले अंदाज बांधल्याप्रमाणे घरी परतताना दिसत नाहीत. शेवटी ही मुले जातात कोठे आणि त्यांचे काय होते, याचा शोध कोणालाच लागत नाही.

स्वयंसेवी संस्था किंवा बालहक्कांसाठी कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मते शेकडो बेपत्ता मुलांची तर पोलिसांकडे नोंदच केली जात नाही. पालकांनी तक्रार केली तरी पोलिस ठाण्यात त्यांना थारा दिला जात नाही. याबाबत निठारी हत्याकांडाचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. या बालहत्याकांडात बळी गेलेल्या मुलांच्या पालकांनी पोलिसाकंडे ती बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. परंतु पोलिसांनी त्याकडे लक्ष दिले नव्हते. माजी सैनिक शहाजी जगताप यांची सांगलीत बीएससीच्या तृतीय वर्षांत शिकणारी मुलगी बेपत्ता झाली होती. याबाबत तक्रार करुनही पोलिसांना तिचा शोध घेता आला नाही.

गतवर्षी केंद्रीय गृहमंत्रालयाने संसदेत दिलेल्या माहितीनुसार २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत देशभरातून १३.१३ लाखांहून अधिक मुली आणि महिला बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. महाराष्ट्रात याच कालावधीत १८ वर्षांखालील बेपत्ता मुले व मुलींची संख्या १२ हजारांहून अधिक होती. या केंद्रीय आकडेवारीचा संदर्भ घेत शहाजी जगताप यांनीच गतवर्षी मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने याबाबत चिंता व्यक्त करताना सर्व सरकारी विभाग, पोलिस, रेल्वे आदी प्राधिकरणांनी एकत्रित काम करणे आवश्यक असल्याचे म्हटले होते.  वास्तविक जी मुले घरी परतत नाहीत, ती गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकतात. बेपत्ता मुलींवर तर बलात्कारासारख्या भयंकर घटना घडतात, अनेकींना शरीरविक्रीच्या विळख्यात ढकलले जाते. अनेकींचा खूनही होतो. आंतरराष्ट्रीय गुन्ह्याच्या अभ्यास करणाऱ्या पत्रकारांच्या बातम्या पाहिल्या तर शेकडो मुलांच्या अवयवयांची तस्करीही होत असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होते. काही संघटना मुलांचे अवयव गुपचूप काढून त्याची विक्री करण्याचा अमानुष प्रकार करतात.

दुसरीकडे, अल्पवयीन मुले ही दहशतवाद्यांच्या हाती लागणारे सोपे हत्यार असल्याचेही गेल्या काही वर्षांत स्पष्ट झाले आहे. काही वर्षांपूर्वी संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालानुसार, आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील सत्ताविरोधी सशस्त्र संघटनांनी मुलांना आपल्या संघर्षात ओढले होते.  मुले बेपत्ता होण्याच्या प्रकरणांत सरकारकडून, स्वयंसेवी संस्थांकडून युद्धपातळीवर प्रयत्न करूनही फारसे यश मिळताना दिसत नसल्यामुळे आता प्रयत्नांची दिशा बदलावी लागणार आहे.  ‘ऑपरेशन मुस्कान’ ही बेपत्ता मुलांना शोधून त्यांच्या आईवडिलांच्या ताब्यात देण्यासाठी राबविली जाणारी एक प्रकारची चळवळ किंवा मोहीम आहे.  २०२२ मध्ये मुंबई पोलिसांनी या मोहिमेंतर्गत एका महिन्यांत १९० मुलांना शोधून काढले होते. अशा प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घ्यायला हवा. पोलिस आणि स्वयंसेवी संस्थांच्या आकलनानुसार मुले–मुली बेपत्ता होण्यामागे काही कारणे दिसून येतात. यामध्ये घरात सतत होणारी भांडणे, पालकांचा अतिकडकपणा, अभ्यासाचा दबाव, बाह्यजगाचे आकर्षण, शिक्षणाची भीती, सोशल मीडिया, चित्रपटातील आभासी जगाची भुरळ, अल्पवयातील प्रेमप्रकरणे, क्षुल्लक किंवा गंभीर स्वरुपाचे पालकांशी झालेले वाद, आर्थिक परिस्थिती, व्यसनाधिनता, वाईट संगत अशा काही कारणांमुळे मुले–मुली घर सोडून जातात. या कारणांचा विचार करुन पालकांनी आपल्या पाल्यांबाबत, त्यांच्याशी असणाऱ्या वर्तणूक व्यवहाराबाबत अधिक काळजी घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर बेपत्ता होणाऱ्या मुलामुलींच्या प्रचंड प्रमाणात वाढत चाललेल्या संख्येचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनानेही अधिक व्यापक उपाययोजना करायला हव्यात.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शनिवार, दिनांक ७ डिसेंबर २०२४,** मार्गशीर्ष शु. ६, धनिष्ठा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. चंपाषष्ठी, ध्वजदिन. नक्षत्र : धनिष्ठा, योग : व्याघात/हर्षण, करण : गरज. सूर्योदय : स.०६.४० सूर्यास्त : सायं.०५.३० वा. **राहू काळ : सकाळी : ९:०० ते १०:३०**

**दिनविशेष**

▶१७८२ : चित्तूरच्या लढाईत इंग्रजांशी लढताना हैदर अलीचा मृत्यु. ▶१८१०: सर्व सजीव पेशींनी बनवलेले असतात. हा विचार मांडून पेशी विज्ञानाचा पाया घालणाऱ्या थिओडोर स्वान या शास्त्रज्ञाचा जन्म. ▶१८२५ : कलकत्ता बंदरात एंटर प्राईज नावाने वाफेवर चालणारे जहाज आले. बाष्पशक्तीवर चालणारे भारतात येणारे ते पहिले जहाज होते. ▶१८५६: भारतातील पहिला उच्चवर्णीय विधवाविवाह साजरा झाला. ▶१९११ : चीनमध्ये पुरुषांना केसांची वेणी घालण्यासाठी सक्ती करणारा कायदा रद्द. ▶१९४१ : कविवर्य भा.रा. तांबे यांचा मृत्यु. ▶१९४१: जपानने अमेरिकेच्या पर्ल हर्बर बंदरावर हल्ला चढवून तेथील आरमार उध्वस्त केले. या हल्ल्यामुळे अमेरिका दुसऱ्या महायुद्धात उतरली. ▶१९९४ : ज्येष्ठ कन्नड साहित्यिक यू. आर. अनंतमूर्ती यांना ज्ञानपीठ पुरस्कार. ▶१९९५ : भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत (इस्त्रो) जुळणी केलेला इन्सॅट–२ उपग्रहाचे फ्रेंचमधील कौरू अंतराळ केंद्रातून प्रक्षेपण. ▶ १९८० : बीटल् जॉन लेननचा न्यूयॉर्कमध्ये खून.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : राग निवळेल. ▲ **वृषभ** : देणी द्यावी लागतील. ▲ **मिथुन** : प्रकृतीमान सुधारेल. ▲ **कर्क** : धनलाभ होईल. ▲ **सिंह** : वाटाघाटी कराल. कन्या : अनपेक्षित कामे होतील. ▲ **तुळ** : सुखासिन दिवस.▲ **वृश्चिक** : पथ्यपाणी सांभाळा. ▲ **धनु** : आवडत्या व्यक्तींची भेट होईल. ▲ **मकर** : कामचा कंटाळा येईल. ▲ **कुंभ** : ओळखीतून लाभ होईल. ▲ **मीन** : आनंददायक दिवस.

**चिंतन**

ब्रह्मचर्याश्रमात ज्ञान संपादन करण्यासाठी अभ्यास आणि आत्मविकास करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणे हाच उत्तम मार्ग आहे, तर समाजाची उन्नती करण्यासाठी, समाज सुस्थितीत राहावा म्हणून ग्रामसेवा, ज्ञानसेवा करावी.

– संत तुकडोजी महाराज

**व्यक्तीविशेष**

## हैदर अली

अठराव्या शतकातील एक वीर योद्धा म्हणून म्हैसूरचा सुलतान हैदर अली प्रसिद्ध आहे. हैदर अलीच्या जन्माच्याच तारीख आणि सालाविषयी मतभेद आहेत. पण त्याचा जन्म १७२० च्या आसपास झाला. त्याचे वडील पतह मुहम्मद म्हैसूरचे राजे वडियार यांच्या दरबारातील वरीष्ठ लष्करी अधिकारी होते. वडियार राजांनी त्यांना बुधिकोटे हे गाव जहागिर म्हणून दिले, तेथेच हैदरचा जन्म झाला. वडिलांप्रमाणे हैदरही लष्करात सामिल झाला. सुरुवातीला तो अरकॉटच्या राजांच्या पदरी होता, त्यानंतर तो श्रीरंगपट्टणम येथे आला, तेथे त्यांचे काका वडियार राजांच्या पदरी होते. त्यांनी हैदरची गाठ कृष्णराज वडियार दुसरा यांचा प्रधान देवराज याच्याशी करून दिली. हैदर आणि त्याच्या भावाला राजाने म्हैसूरच्या लष्करात अधिकारी म्हणून नेमले. १७५७ मध्ये देवराजाने मराठे आणि हैदराबादपासून म्हैसूरचे रक्षण करण्यासाठी हैदर अलीची मदत मागितली. त्यावेळी म्हैसूरचे सैन्य विस्कळीत आणि बेशिस्त झाले होते. हैदर अलीने सैन्याची घडी नीट बसवली आणि राज्यातील बंडाळी मोडून काढली आणि हळूहळू म्हैसूरचा तो सर्वेसर्वा बनला. स्वतःला म्हैसूरचा सुलतान म्हणवून घेऊ लागला. आपल्या कारकिर्दीत हैदरने ब्रिटीशांना जीव तोडून विरोध केला. दुर्दैवाने त्याला इतर राज्यांची मदत मिळाली नाही. त्याच्यानंतर त्याचा मुलगा टीपू सुलतान यानेही मोठा पराक्रम गाजवला. ७ डिसेंबर १७८२ रोजी हैदर अलीचे निधन झाले.

**बोधकथा**

## पोपटाचा धडा

राजस अतिशय हुशार मुलगा होता. त्याला नेहमीच वेगवेगळ्या गोष्टी स्वतः करून पाहण्याची आवड होती. एकदा त्याच्या मित्राकडे त्याने एक पाळलेला पोपट पाहिला. तो पोपट मस्तपैकी सगळ्यांशी गप्पा मारत होता. सगळ्यांना नावाने हाक मारत होता. ते पाहून राजसला खूपच गंमत वाटली. घरी आल्यानंतर त्याने आईजवळ आपणही पोपट आणायचा, असा हट्ट धरला. आईने सुरुवातीला टाळाटाळ केली; पण राजस खूपच हटून बसल्यानंतर दोन–तीन दिवसांनंतर राजसच्या घरात एक हिरवागार पोपट आला. त्यासाठी छानसा पिंजरा आणला. त्या पिंजऱ्यात पाण्याचं भांड, खाण्यासाठी वाटी असं सारं काही ठेवलं. दोन–तीन दिवसांनंतर आई तिच्या मैत्रिणीकडे जाणार होती. जाताना आईनं राजसला सांगितलं हे बघ राजस मला येण्यासाठी उशीर होणार आहे, तेव्हा तू या पोपटाला पाणी आणि खाण्याचे पदार्थ दे. राजस आनंदाने ‘हो’ म्हणाला. आई गेल्यानंतर थोडा वेळ त्याने पोपटाशी गप्पा मारल्या आणि नंतर त्याचा आवडता कार्यक्रम पाहण्यासाठी टीव्हीसमोर बसला.

**जिज्ञासा**

## युरेका, युरेका

आर्किमिडीज हा फार जुन्या काळातील प्रसिध्य शास्त्रज्ञ. गणित आणि विज्ञान शास्त्रात यांना फार गती होती. आर्किमिडीजचा जन्म सीसीली बेटातील सायरॅक्युज येथे झाला. आपल्या वडिलांकडून त्याला ही वैज्ञानिक बुद्धिमत्ता मिळाली होती. सायरॅक्युज येथे बुद्धिमत्तेमुळे आर्किमिडीज बरेच नाव झाले होते. एकदा तेथील राजाला आपल्या मुकुटात सोन्यामध्ये दुसऱ्या कुठल्या तरी धातूची भेसळ केली जाते असा संशय आला. त्याने ही गोष्ट आर्किमिडीजला सांगितली. आता सोन्याच्या मुकुटात इतर हलक्या प्रतीच्या धातूची भेसळ आहे की नाही हे कसे ओळखायचे हा प्रश्न आर्किमिडीजच्या डोक्यात घोंगावू लागला. बरेच दिवस याच विचारात असताना एकदा अचानकपणे त्याला या प्रश्नाचे उत्तर सापडले.

**सामान्यज्ञान**

जोशी, शिंदे, भोसले हे तिघेजण एकाच अपार्टमेंटमध्ये राहतात. जोशी अजून अविवाहित आहेत. शिंदे यांची मासिक प्राप्ती या तिघांपैकी जो वयाने सर्वात लहान आहे. त्याच्या प्राप्तीपेक्षा कमी आहे. तिघांच्यात वयाने जो सर्वात वडील आहे त्याची प्राप्ती सर्वात जास्त आहे खरी पण त्याला आपल्या मुलीच्या कॉलेजच्या खर्च करावा लागतो. तर या तिघात सर्वात वडील कोण आणि सर्वात लहान कोण?

**उत्तर : जोशी हे वयाने सर्वात लहान असून भोसले सर्वात वडील आहेत.**

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५२१**


| | | | |
|---|---|---|---|
| | | 1 | |
| | 2 | | |
| | | 3 | |
| | 4 | | |

**क्रमांक ५२० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 3 | 2 | 1 |
| 2 | 1 | 3 | 4 |
| 3 | 4 | 1 | 2 |
| 1 | 2 | 4 | 3 |

**हास्यविनोद**

वेड्यांच्या इस्पितळात सर्व वेड्यांना व्यायामासाठी मैदानात आणण्यात आले. त्यांना झोपवून सायकलींग प्रमाणे ॲक्शन करण्याचे सांगितले. सर्व वेडे सायकलींग करतानाच्या हालचालीप्रमाणे पाय हलवत होते. एक वेडा मात्र शांत तसाच झोपला होता. डॉक्टरनी विचारले, अरे काय झाले? पाय का हलवत नाहीयेस?’ वेडा शांतपणे म्हणाला, सायकल उताराला लागली आहे.



वार्षिक परीक्षेत नापास झालेल्या सुमानं बाबांच्या रागाला सामोरं जावं लागू नये म्हणून एक युक्ती शोधली. बाबांजवळ आली आणि म्हणाली, सुमा : पप्पा, कोणावर रागावणं चांगली गोष्ट आहे का ? **पप्पा :** छे ! बेटी चांगली माणसं कधीच कोणावर रागावत नाहीत. **सुमा :** हे पहा माझं रिपोर्ट कार्ड, मी नापास झाले आहे.

**महिलायन**

## सौंदर्य प्रसाधनांचे साईड इफेक्ट्स

सौंदर्य अधिक खुलण्यासाठी आपण वेगवेगळ्या प्रसाधनांचा वापर करत असतो. अलीकडे बाजारात असंख्य प्रकारची प्रसाधने उपलब्ध आहेत. किती तरी कंपन्या तऱ्हे तऱ्हेची प्रसाधने नित्याने बाजारात आणत असतात. त्यांच्या आकर्षक आणि चकचकीत जाहिरातींना भुलून बऱ्याचशा महिला पुरेशी माहिती न घेता सौंदर्य प्रसाधने विकत घेतात. परंतु त्यापैकी बऱ्याच प्रसाधनांचा त्वचेवर अत्यंत घातक असा परिणाम होऊ शकतो हे त्यांना माहित नसते. कोणीतरी सांगितले म्हणून एखादं प्रसाधन विकत घेणं जास्त धोकेदायक असते. अलीकडे बाजारात ॲण्टी एजींग क्रिम्स म्हणजेच वाढत्या वयाच्या खुणा पुसण्यासाठी उपयुक्त ठरणारी क्रिम्स आलेली दिसतात. वाढतं वय कुणालही नको असतं. ते झाकण्यासाठी चटकण अशी क्रिम्स विकत घेतली जातात. परंतु ॲण्टी एजींग किंवा त्वचेच्या देखभालीचा तत्सम दावा करणारी उत्पादने याबाबत बरीच अपयशी असतात. यामुळे त्वचेचा फायदा तर दूरच राहतो पण, त्यातील हानीकारक रसायनांमुळे त्वचेचे जास्त नुकसान होते. अनेक सौंदर्य प्रसाधनांमधील विशिष्ट रसायनांमुळे त्वचेवर खाज येऊ लागते. बारीक पुरळं येतात. म्हणूनच ती रसायनं माहिती करून घेणं आवश्यक ठरतं.

ॲण्टीएजींग क्रिमचा मुख्य घटक म्हणजे रेटिनॉल हे रसायन होय. या रसायनामुळे त्वचेवरील थर उडू शकतात. ती तडकू शकते. तसेच त्वचेवर खाज सुटण्याचीही शक्यता असते. विशेष करून गर्भवती महिलांनी रेटिनो पासून बनवलेल्या उत्पादकांचा वापर टाळायला हवा. रेटीनॉलमुळे त्वचा सूर्यप्रकाशात जास्त संवेदनशील आणि नाजूक होते. हा धोका लक्षात घेऊन असे क्रीम वापरावे. प्रसाधने घेताना त्यावरील घटकांची नावे अवश्यक वाचावीत. ज्या प्रसाधनांमध्ये हायड्रोक्विनॉन हे रसायन वापरले असेल ते टाळावं. (पूर्वार्ध)

**गंमतग्यान**

## हॉट एअर बलून

फुग्यात हवा भरून ते उडवणे यातील आनंद वेगळाच असतो. हेच तत्व लक्षात घेऊन अनेक प्रकारचे फुगे तयार झाले. ज्यांच्या सहाय्याने मुले, माणसे आकाशात उडू शकतात. हॉट एअर बलून असाच एक फुगा आहे. याच्या माध्यमातून उडण्याची वेगळीच मजा आनंदायला मिळते. हा हॉट एअर बलून हवेत कसा उडतो ? आधुनिक हॉट एअर बलुनमध्ये इंधनासाठी प्रोपेनचा वापर केला जातो. कंप्रेस्ड लिक्विड प्रोपेन कमी वजनाच्या सिलेंडरमध्ये भरून बलून बास्केटमध्ये ठेवले जाते आणि तो जाळण्यासाठी स्टीलच्या एका डीटींग कॉईलच्या माध्यमातून बर्नरशी जोडले जाते.

‘राष्ट्र संचार’ (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### अनाथाश्रमास संगणक भेट

**पिंपरी :** वुई टुगेदर फाउंडेशन, पिंपरी चिंचवड या सेवाभावी संस्थेच्यावतीने विकास अनाथ आश्रमातील ५५ मुला-मुलींना आवश्यक अंतर्वस्त्रे आणि संगणक प्रदान करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते रवींद्र इंगळे यांनी एकूण ५५ मुला-मुलींसाठी प्रत्येकी दोनप्रमाणे ११० अंतर्वस्त्रे तसेच अनिल पोरे, सीता केंद्रे व जयंत देशमुख यांनी प्रत्येकी एक संगणक सेट प्रदान केला. तसेच चिंचवड येथील व्यावसायिक अतुल सेठ यांनी या मुलांना नवीन शर्ट भेट केले.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास अभिवादन

**पिंपरी :** महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पिंपरी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे राष्ट्रवादी पक्षाचे शहराध्यक्ष योगेश मंगलसेन बहल यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### भरधाव गाडी चालवणे बेतले जिवावर

**पिंपरी :** वेगात वाहन चालवणे एका वृद्ध व्यक्तीच्या जीवावर बेतले. वाहनाचा अपघात होऊन वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना पिंपरी येथे घडली. अरुण यशवंत वाघ (वय ७०, रा. अजमेरा कॉम्प्लेक्स, पिंपरी) असे मृत्यू झालेल्या वृद्ध व्यक्तीचे नाव आहे.

# शहरात 2 लाख नवीन मालमत्ता

## कर आकारणीसाठी कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मालमत्ता सर्वेक्षणात आकारणी न झालेल्या सद्यस्थितीत २ लाख ५१ हजार १६५ इतक्या नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यापैकी २लाख ३ हजार ८९४ मालमत्तेची मोजणी पूर्ण झाली असून त्यावर कर आकारणी कार्यवाही सुरु आहे. सर्वेक्षणात आढळून आलेल्या मालमत्तापैकी १ लाख १३ हजार ८३१ मालमत्ताधारकांना आतापर्यंत मालमत्ता कर आकारणीसाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नोटीस, एसएमएस यामाध्यमातून कळविण्यात आले आहे.

ही कागदपत्रे मालमत्तेस अद्यावत व बिनचूक नाव लावण्यासाठी व विशेष दिनांकापासुन आकारणी करण्यासाठी आवश्यक आहेत. अद्यापपर्यंत ज्या मालमत्ताधारकांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत अशा मालमत्ताधारकांना पुन्हा कागदपत्र मागणीपत्राची अंतिम नोटीस बजाविण्याची कार्यवाही सुरु आहे. कागदपत्रे मागणीची नोटीस समक्ष तसेच मालमत्ता बंद असल्यास मालमत्तेच्या दर्शनीभागावर लावून बजावणी करण्यात येत आहे. तरी मालमत्तेच्या नोंदणी व आकारणीसाठी आवश्यक असलेली पुढील कागदपत्रे संबंधित करसंकलन कार्यालयात पूर्तता करणे गरजेचे आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत आकारणी न झालेल्या मालमत्तांचे नोंदणी व करआकारणी कार्यवाही करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि या खासगी कंपनीची नेमणूक करण्यात आली असून त्यांच्यामार्फत शहरातील मालमत्तांचे सर्वंकष सर्वेक्षण सुरू आहे.

**» मालमत्ता**

नोटीस बजावूनही पूर्तता न केल्यास मालमत्ताधारकांस याबाबत कोणतेही स्वारस्य नाही असे समजण्यात येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५०(अ) मधील तरतूदीनुसार सहा वर्षे मागे जाऊन मालमत्ताकराची आकारणी केली जाईल. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांना मालकी हक्काचे व बांधकाम पूर्णत्वाचे कागदपत्राचे पूर्तता करण्यासाठी मे. स्थापत्य कन्सल्टंट प्रा. लि याएजन्सीमार्फत नोटीस बजाविण्यात येत असून या कागदपत्रांची पुर्तता करावी, असे आवाहन करसंकलन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरालगतच हिंजवडी आयटी पार्क, तळवडे आयटी पार्क, चाकण, रांजणगाव एमआयडीसी हा भाग येतो. या भागात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत. संपूर्ण देशभरातून या भागात कामगार वर्ग रोजगारानिमित्त वास्तव्यास आहे. मात्र, या भागात अंतर्गत रस्ते, पाणी, वीज अशा मूलभूत सुविधा अद्यापही अपुऱ्या आहेत. त्यामुळे येथील कामगार वर्ग पिंपरी-चिंचवड शहरात वास्तव्यास प्राधान्य देतो. त्यामुळे एमआयडीली न पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत बांधकामे मोठ्या प्रमाणात वाढले आहे.



पिंपरी : पिंपरी चिंचवड शहराचा झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये शहरात नवीन मालमत्तांची सख्या वाढली आहे.

### या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी नोटीस

- इमारत/जमीन/फ्लॅटची मालकी हक्काची कागदपत्रे, खरेदीखत किंवा इंडेक्स, सातबारा उतारा, मिळकतपत्रिका
- एमआयडीसी/प्राधिकरण/ पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांच्याकडील मालमत्ता असल्यास रजिस्टर अग्रीमेंट, दस्त व संबधित संस्थेने निर्गमित केलेले ताबा पत्राची सत्य प्रत.
- मिळकतीबाबत नोंदणीकृत बक्षीसपत्र/वाटणीपत्र झाले असल्यास त्याची सत्य प्रत.
- इमारत बांधकाम परवानगी प्राप्त असल्यास मंजूर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व मंजूर नकाशाची प्रत, या कागदपत्रांची संबंधित मालमत्ताधारकांनी पुर्तता करणे अत्यंत आवश्यक आहे.



> मालमत्ता करआकारणीसाठी आवश्यक कागदपत्रे सात दिवसांमध्ये विभागीय करसंकलन कार्यालयामध्ये जमा करावीत. मालमत्ताधारकांना बजाविण्यात आलेल्या नोटीसवर देण्यात आलेल्या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा नमूद केलेल्या ई-मेलद्वारेही कागदपत्रांची पूर्तता करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.नोटीस बजावूनही कागदपत्रे सादर न केल्यास आणि अयोग्य आकारणी झाल्यास त्याची जबाबदारी महापालिकेची राहणार नाही.
>
> — **अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, कर आकरणी व कर संकलन विभाग

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** दिव्यांग बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नेहमीच विविध नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यात येत असतात. १७ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान दिव्यांग बांधवांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी "पर्पल जल्लोष" म्हणजेच 'जल्लोष दिव्यांगत्वाचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमात शहरातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांशी संवाद साधताना आयुक्त सिंह बोलत होते.

**» दिव्यांग दिन**

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिकेचे दिव्यांग भवन हे दिव्यांग बांधवांना स्वत:ची हक्काची जागा वाटावी यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. दिव्यांग भवनामार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये वाढ करून अधिक दर्जेदार सुविधा पुरविण्यावर महापालिका भर देत आहे. सहा वर्षांपर्यंतच्या वयोगटातील मुलांचे अंपगत्व ओळखून त्यावर तज्ञांच्या सल्ल्याने योग्य उपचार करण्याची आवश्यकता आहे. सुरूवातीलाच दिव्यांगत्वाचे निदान झाल्यास योग्य उपचार करण्यास आणि कमी वेळेत दिव्यांगत्वावर मात करण्यास मदत होऊ शकते.

### या मान्यवरांचा सन्मान

- विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दिव्यांग बांधवांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये दिव्यांग भवन प्रकल्पाच्या उभारणीमध्ये विशेष कामगिरी केलेले अभिजीत मुरूगकर, कविता मुरूगकर, गेली १० वर्षे दिव्यांग सेवेत कार्यरत असलेले राजेंद्र वाघचौरे, २४ व्या राष्ट्रीय पॅरा स्विमिंग स्पर्धेमध्ये ४ सुवर्ण तसेच १ कांस्य पदक आणि महाराष्ट्र शासन सहाय्यक क्रीडा विकास अधिकारी या वर्ग २ पदासाठी निवड झालेल्या वैष्णवी जगताप, १६ व्या राज्यस्तरीय पॅरा स्विमिंग स्पर्धेत १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये सुवर्ण आणि ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्य पदक मिळविलेले संकल्प बोत्रे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

# शुल्काबाबत माहिती देण्यास महाविद्यालयांची टाळाटाळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्रातील सर्व शासकीय, अकृषी, खासगी व अभिमत विद्यापीठ यांनी सर्व अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेल्या सर्व शुल्काची माहिती सर्व विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व आवारातील सूचना फलकावर लावणे बंधनकारक आहे. परंतु काही अपवाद वगळता शहरातील महाविद्यालयात फलकांवर शुल्काची माहिती लावलेली दिसून येत नाही.

उच्च व तंत्र शिक्षण विभागात पदवीपूर्व व पदवीत्तर अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या खुला व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळते. या अभ्यासक्रमांना मागासवर्गीय प्रवर्गासोबतच विद्यार्थ्यांना राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजना लागू आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे महाविद्यालयांना सरकारकडून मिळतात, मात्र, महाविद्यालय प्रशासन विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना संपूर्ण शुल्क भरण्याचा तगादा लावत असल्याचेच चित्र आहे.



अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयाच्या संबंधित विद्यापीठाने ठरवलेल्या शुल्क दराप्रमाणे शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, नोंदणी शुल्क, प्रॅक्टिकल शुल्क व परीक्षा शुल्क याची महाविद्यालयाला प्रतिपूर्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

### विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्काची वसुली

- अनेक अनुदानित महाविद्यालयांमध्ये इतर शुल्कांच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून वाढीव शुल्क आकारले जात आहे. सर्व प्रकारच्या शुल्क आणि खर्चाचा ताळेबंद दरवर्षी जाहीर करणे आवश्यक असताना तो केला जात नाही. यामुळे महाविद्यालयाकडून प्रचंड प्रमाणात बेकायदा शुल्क वसूल केला जात आहे. याबाबत उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर व राज्याचे तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्याशी संपर्क केला असता ते फोनवर उपलब्ध झाले नाही.

### संशयातून तरुणाचा धारदार शस्त्राने खून

**पिंपरी :** एका नातेवाईक महिलेशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून एका तरुणाचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला होता. ही घटना गुरुवारी (दि. ५) सायंकाळी पावणे सात वाजताच्या सुमारास चऱ्होली येथे घडली. अवघ्या १२ तासांच्या आता पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने एका आरोपीला अटक केले असून एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे.

सचिनकुमार लखीदर राय (वय २३, रा. बंगरी, जि. मुझफ्फरपुर, बिहार) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गौतम रामानंद राय (वय २२, रा. तेजस रेसीडन्सी, मंगलनगर, वाकड. मूळगाव मु. बंगरी पो. मरवन ता. काटी जि. मुजफ्फरपूर, राज्य-बिहार) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

# पोलिसांचाही साजरा होणार वाढदिवस; महानिरिक्षकांचा आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कधी बंदोबस्त, कधी नैसर्गिक आपत्ती, सणोत्सव, व्हीआयपी दौरा, अपघात, राजकीय कार्यक्रम, निवडणुका, नागरिकांच्या समस्या, अडचणी आणि गुन्हेगारी यासह शहरातील कायदा सुव्यवस्था सांभाळण्यासाठी पोलीस दल कायम तत्पर असते. मात्र, कामाचा ताण, शारीरिक मानसिक थकवा आणि वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करत असताना सुरु असलेली तारेवरची कसरत यामध्ये खाकीतल्या त्या माणसाला स्वतःकडे लक्ष देण्यास वेळच मिळत नाही.

त्यातच महत्वाच्या सणोत्सवासह वाढदिवसासारख्या



महत्वाच्या दिवशी पोलिसांना घर आणि परीवाराला वेळ देता येत नसल्याने नेहमीच कौटुंबिक नाराजी पत्करावी लागते. मात्र आता पिंपरी चिंचवड पोलिसांना त्यांच्या वाढदिवसाला हक्काची सुट्टी मिळणार आहे. इतकेच नाही तर वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला पोलीस ठाण्यात वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. याबाबत थेट पोलीस आयुक्तांनी आदेश दिले आहेत.

### पोलिसांचा वाढदिवस होणार 'हॅप्पी'

- वाढदिवसाच्या आदल्या दिवशी पूर्वसंध्येला पोलीस ठाण्यांमध्ये संबंधित वरिष्ठ अधिकारी हे पोलीस ठाण्यातील ज्यांचा वाढदिवस आहे त्या अधिकारी व कर्मचारी यांचा वाढदिवस साजरा करून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश हे संबंधितांना देतील, असेही पोलीस आयुक्तांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

पान १ वरून

## चार दिवसात ११ कोटी वसूल

६१२ रुपयांची थकबाकी वसूल केली आहे. तर २३ मिळकतींना टाळे लावले आहे.

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात २७०० कोटी रुपयांचा कर वसूल करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. १ एप्रिल ते ५ डिसेंबर या कालावधीत १४ लाख ८० हजार मिळकतींपैकी ८ लाख ७३ हजार २५७ मिळकतींनी १८०२ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी तीन महिने शिल्लक असून, या कालावधीत तब्बल ९०० कोटी रुपये वसूल करण्याचे आव्हान मिळकतकर विभागासमोर आहे.

तीन महिन्यात जास्तीत जास्त रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. अनेक व्यावसायिक इमारती, गोदाम, कार्यालये यासह निवासी मिळकतींची थकबाकी सुमारे साडेचार हजार कोटी रुपये आहे.

त्यात काही न्यायालयीन प्रकरणे आहेत. ते वगळून अन्य ठिकाणाची थकबाकी वसूल करण्यावर भर दिला जात आहे, असे उपायुक्त माधव जगताप यांनी सांगितले.

मिळकतकर विभागाने १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील थकबाकीदारांकडून कर वसुलीसाठी बँड पथक तयार केले आहे. त्यामध्ये वादक आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

थकबाकीदारांच्या मिळकतीपुढे जाऊन बँड वाजवून पैसे वसूल केले जात आहेत. १५४ मिळकतधारकानी ११ कोटी १९ लाख रुपये चार दिवसात महापालिकेकडे जमा केले आहेत. तर कारवाईच्या धास्तीने नागरिकांनी स्वतःहून २० कोटी रुपयांचा भरणा या चार दिवसात केला आहे, असे जगताप यांनी सांगितले.

## जावयाने सासरच्या घराला लावली आग

याप्रकरणी कविता किसन फेंगसे (वय ४१, रा. काळुबाई कॉलनी, सुतारदारा, कोथरुड) यांनी कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी साहील हनुमंत हाळंदे (वय २५, रा. भूगाव) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार सुतारदरा येथील काळुबाई कॉलनीमध्ये गुरुवारी मध्यरात्री पाऊण वाजता घडला.

दोघा पतीपत्नीत भांडणे झाल्याने सासुने सुनेला माहेरी पाठविले. पत्नी माहेरी गेल्याचा राग आल्याने जावयाने पाच मिनिटामध्ये घरी नाही आलीस तर तुझ्या आईचे घर जाळून टाकीन, अशी धमकी दिली. त्यानंतर त्याने खरोखरच आपल्या सासरच्या घराला आग लावून दिली. त्यात घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले.

याप्रकरणी कविता किसन फेंगसे (वय ४१, रा. काळुबाई कॉलनी, सुतारदारा, कोथरुड) यांनी कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी साहील हनुमंत हाळंदे (वय २५, रा. भूगाव) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार सुतारदरा येथील काळुबाई कॉलनीमध्ये गुरुवारी मध्यरात्री पाऊण वाजता घडला.

## राज्य सरकारला...

आता येत्या ५ तारखेपर्यंत म्हणजेच ५ जानेवारीपर्यंत या एक महिन्यात त्यांनी मराठा आरक्षणाचा विषय मार्गी काढावा, अन्यथा मराठे पुन्हा तुफान ताकदीने आंदोलनासाठी उभे राहून सरकारला परेशान करणार, सोडणार नाही."८३ क्रमांकाला मराठा आणि कुणबी एक आहे, २००४ चा अध्यादेशात दुरूस्ती करावी, सगेसोयरेची अंमलबजावीणी करावी, हैदराबादसह सातारा संस्थान आणि बॉम्बे सरकारचे गॅझेट, या तीनही गॅझेट संबंधीच्या मागण्या, लाखो पोरांवरील दाखल झालेले गुन्हे मागे घेणे अशा आपल्या आठ ते नऊ मागण्या याच सरकारकडे केलेल्या आहेत त्या त्यांनी मार्गी काढाव्या, अन्यथा त्यांना पुन्हा मराठ्यांना सामोरे जावे लागेल", असेही मनोज जरांगे यावेळी म्हणाले.

## टिंगरेंवर...

होता. विधानसभा निवडणुकीत टिंगरे दांपत्याने सुरुवातीला महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांना पाठिंबा दिला होता. निवडणुकीचा प्रचार सुरू असताना रेखा टिंगरे आणि चंद्रकांत टिंगरे यांनी पक्षांतर करून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश करून बापूसाहेब पठारे यांना पाठिंबा जाहीर केला होता.

# भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मधुकर पिचड यांचे निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मधुकर पिचड यांना ऑक्टोबरमध्ये ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना नाशिकमधील नाईन पल्स रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेंव्हापासून मधुकर पिचड यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, काल (६ डिसेंबर) वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



मधुकर पिचड यांच्या निधनामुळे अकोले तालुक्यावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मधुकर पिचड हे राज्याचे माजी मंत्री होते. अहिल्यानगर (अहमदनगर) अकोले विधानसभा मतदारसंघातून मधुकर पिचड हे तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तसेच मधुकर पिचड यांनी अनेक महत्वाची पदे भुषवली आहेत. तसेच आदिवासी विकास, वन व पर्यावरण मंत्री म्हणून देखील कार्यभार त्यांनी पाहिला होता.

# पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील पुरुष बार रूम येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून पाळला जातो. शुक्रवार, दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६८ वी पुण्यतिथी आहे. समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी झोपेतच अखेरचा श्वास घेतला आणि हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून गणला जातो.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायम शिक्षणाला महत्त्व दिले आणि समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला याचीच प्रेरणा घेत ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने पिंपरी चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मरकास हार अर्पण केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या 'एक वही, एक पेन' या अभियानात सहभागी होत अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यासाठी एक सामाजिक भान समजून संस्थेला पिंपरी - चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या वतीने वह्या व पेन देण्यात आल्या. यावेळी बारचे माजी अध्यक्ष ॲड. राजू माधवन, उपस्थित होते.

## दाखले रखडल्याने नागरिकांचा खोळंबा

# तहसील कार्यालयात अर्जदारांची गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** नागरिकांना शासकीय कामासह शालेय प्रवेशासाठी आवश्यक दाखले वेळेवर मिळत नसल्याने अर्जदारांनी तहसील कार्यालयात धाव घेतली. तहसीलदारांच्या दालनाबाहेर गर्दी झाल्यानंतर अखेर विविध प्रकारचे दाखले पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आले. गेल्या महिनाभरापासून तहसीलदार, नायब तहसीलदार इलेक्शन ड्युटीवर होते त्यामुळे शेकडो दाखले प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे.

### दाखले रखडले

- तहसील कार्यालयात दररोज जवळपास दीडशे ते दोनशे विविध प्रकारचे अर्ज येतात. गेल्या महिन्याभरापासून हे दाखले रखडल्याने तो आकडा जवळपास हजारांच्या घरात गेला असल्याचे निदर्शनास आले आहे.



पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयांतर्गत उत्पन्न, डोमीसाइल त्याचप्रमाणे विविध दाखल्यांचे वाटप करण्यात येते. त्याचप्रमाणे सातबारा, विविध प्रकारच्या सुनावणी आणि योजनांचा परतावाही अर्जदारांना मिळाला नव्हता. दरम्यान, गृह प्रकल्पासाठी लागणारा उत्पन्न दाखला, डोमीसाइल सर्टिफिकेट यासह विविध प्रमाणपत्रे देण्यात येतात. मात्र, गेल्या महिन्याभरापासून तहसीलदार निवडणुकीच्या कामामुळे व्यस्त असल्याने हे दाखले रखडले होते. त्याचप्रमाणे इतर दाखल्यांची संख्या देखील वाढली होती. नागरिक यासाठी हेलपाटे मारत होते. मात्र, निवडणुकीचे कारण त्यांना दिले जात होते. #रा

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची संसदेत माहिती

# रस्ते अपघातात वर्षभरात 1 लाख 68 हजार लोकांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत रस्ते अपघातांबाबत धक्कादायक माहिती सांगितली. वर्षभरात देशामध्ये १ लाख ६८ हजार लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली.

नितीन गडकरी म्हणाले की, देशात २०२२ मध्ये एकूण ४ लाख ६१ हजार ३१२ रस्ते अपघात झाले आहेत. या लोकांचा मृत्यू कोणत्याही दंगलीत किंवा लढाईत झाला नाही तर रस्ते अपघातात झाला आहे. केंद्र सरकारने रस्ता सुरक्षा समिती नेमली आहे आणि ब्लॅक स्पॉट्ससाठी ४० हजार कोटी रुपये दिले आहेत. तरीही रस्ते अपघातात वाढ झाली असल्याचं त्यांनी सांगितले. खासदार हनुमान बेनिवाल यांनी रस्ते अपघातासंबंधी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, रस्ते अपघात एक अतिशय गंभीर समस्या आहे. यामागे वेगवेगळी कारणे आहेत. अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये १८ ते ३४ वर्षे वयोगटातील मुले-मुलींचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितले. तसेच, २०१८ ते २०२२ या काळात देशात ७ लाख ७७ हजार ४२३ लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.

> संसदेच्या पुढील अधिवेशनापूर्वी टोल वसुलीसाठी नवीन प्रणाली येणार आहे. महामार्गांवर कोणताही टोलनाका नसेल, वाहनांना कुठेही थांबावे लागणार नाही. अशी नवीन प्रणाली येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जेवढा प्रवास केला जाईल, तेवढाच टोल वसुल केला जाईल.
> -नितीन गडकरी, रस्ते आणि वाहतूकमंत्री

मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०१८-२०२२ दरम्यान रस्ते अपघातात ७,७७,४२३ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. केंद्र सरकारने रस्ता सुरक्षा समिती नेमली आहे आणि ब्लॅक स्पॉट्ससाठी ४० हजार कोटी रुपये दिले आहेत. तरीही रस्ते अपघातात वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले

नितीन गडकरी म्हणाले की, हेल्मेट न घातल्यामुळे ३० हजार लोकांचा मृत्यू होतो. देशातील नागरिकांनी रस्त्याचे नियम पाळले पाहिजे. नियमांचे पालन न केल्यास वसूल केल्या जाणाऱ्या दंडाच्या रक्कमेत वाढ केली. तरीही लोक नियम मोडतात. यामुळे अपघातांची संख्या वाढत जात आहे. यापूर्वी दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोकांचा मृत्यू होत होता. मात्र, यामध्ये वाढ झाली आहे. सरकारच्या प्रयत्नांनतरही रस्ते अपघातात वाढ झाल्याचे दु: ख असल्याचे गडकरी म्हणाले.

## » Selected

## डॉ. आंबेडकर यांना पंतप्रधान मोदी यांनी वाहिली श्रद्धांजली

**नवी दिल्ली** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ६९ वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे निर्माते आणि सामाजिक न्यायाचे प्रतिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्रध्दांजली वाहिली. त्यांनी समाज माध्यम, एक्सवर याविषयीचे एक ट्वीट केले आहे. मोदींनी भाररत्न बाबासाहेब आंबडेकर यांना नमन करत असल्याचे म्हटले. समानता आणि मानवी मूल्य जपण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, जेव्हा आम्ही त्यांच्या योगदानाची आठवण करतो, तेव्हा त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्या वचनबद्धतेचा सुद्धा पुनरुच्चार करतो. जय भीम! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये यावर्षाच्या सुरुवातीला मुंबईतील चैत्यभूमीला भेट दिल्यानंतरचा फोटो शेअर केला.

## पतधोरणात बदल नाही; रेपो दर राहिला कायम

**मुंबई** : भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतविषयक धोरण समितीने आज शुक्रवारी तीन दिवसांच्या बैठकीनंतर रेपो दराबाबतचा निर्णय जाहीर केला.



आरबीआयच्या समितीने सलग अकराव्यांदा रेपो दर ६.५ टक्के एवढा कायम ठेवला आहे. "पतविषयक धोरण समितीने पॉलिसी रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय ४:२ च्या बहुमताने घेतला आहे." असे आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले. "स्थायी ठेव सुविधा दर ६.२५ टक्के एवढा कायम आणि मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी दर आणि बँक दर ६.७५ टक्के ठेवण्याचा निर्णय घेतला आहे," असे दास यांनी सांगितले. दरम्यान, आरबीआयने जीडीपी वाढीचा सुधारित अंदाज जाहीर केला आहे. २०२४-२५ साठी जीडीपी वाढ ६.६ टक्के राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

## नाशिकमध्ये अवकाळीचा फटका

**नाशिक** : नाशिक जिल्ह्यातील येवला, सिन्नर, निफाड, देवळा आदी भागामध्ये अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसामुळे काढणीला आलेला कांदा, मका यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुंबईत एकीकडे राजकीय घडामोडी गतिमान होत्या, सरकार स्थापनेची लगभग सुरू होती आणि दुसरीकडे बळी राजावर नैसर्गिक संकट कोसळलेल होतं, अवकाळी पावसामुळे पुन्हा एकदा नाशिक मधल्या शेतकऱ्याच कंबरडे मोडलेले आहे. नाशिक जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन ते तीन दिवसापासून अवकाळी पाऊस सुरू असून, यामुळे कांदा, द्राक्ष, भाजीपाला अशा वेगवेगळ्या पिकांना याचा फटका बसला आहे. सरकारने लवकरात लवकर पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत तसेच कृषी अधिकारी, कर्मचारी यांनी शेताच्या बांधावर येऊन पंचनामे करून, नुकसान भरपाई तात्काळ मिळावी, अशीच अपेक्षा शेतकरी बांधवांकडून व्यक्त केली जात आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

# संविधानाला आदर्श मानून शासनाचा कारभार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि भारतीय संविधानाला आदर्श मानून शासनाचा कारभार सुरू आहे. राज्यातल्या दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजे, याची काळजी शासनाने कायम घेतली आहे. भविष्यातही वंचित, दुर्बल घटकांच्या जीवनात आनंद निर्माण होईल, यासाठी काम केले जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मानवतेच्या कल्याणाचा मार्ग भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला दाखविला आहे. बाबासाहेबांच्या विचारात देशाला एकता, बंधुता व समतेमध्ये बांधून ठेवण्याची ताकद आहे. अशा या महामानवाच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी देशभरातून लाखो अनुयायी येत असतात. येथे आलेला हा अथांग जनसागर त्याचेच प्रतिक आहे.

मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी यावेळी मान्यवरांना संविधानाची प्रतिमा भेट दिली. तसेच मान्यवरांच्या हस्ते माजी खासदार नरेंद्र जाधव यांच्या 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करुन डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. त्यानंतर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

## जस्टिन ट्रुडोंमुळेच संबंध बिघडले

**नवी दिल्ली :** खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंग निज्जरच्या हत्येनंतर भारत आणि कॅनडामधील संबंध बिघडले असून, निवडणूक जिंकण्यासाठी खलिस्तानवाद्यांना आकर्षित करण्यासाठी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी भारतावर बिनबुडाचे आरोप केले. त्यानंतर भारतानेही त्याला चोख प्रत्युत्तर दिले. भारताविरोधात बोलणारे जस्टिन ट्रुडो यांना आता त्यांच्या देशातील जनतेने आरसा दाखवला आहे. जस्टिन ट्रुडो यांच्यामुळेच भारतासोबतचे संबंध नीट नाहीत, असे ३९ टक्के कॅनेडियन नागरिकांचे मत असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे.

जस्टिन ट्रुडो जोपर्यंत कॅनडाचे पंतप्रधान आहेत, तोपर्यंत भारत आणि कॅनडायांच्यातील संबंध चांगले राहणार नाहीत, असेही ३९ टक्के लोकांनी म्हटले आहे. कॅनडात पुढील वर्षी सार्वत्रिक निवडणुका होणार असून ट्रुडो यांना त्यांच्याच खासदारांनी घेरले आहे.

# मुख्यमंत्र्यांना माझ्या शुभेच्छा : खा. सुळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर २ आठवड्यांनी महायुती सरकारचा शपथविधी झाला. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. पुढची पाच वर्ष त्यांनी राज्याची सेवा करावी. महाराष्ट्राचा हक्क दुसऱ्या कुठल्या राज्याला त्यांनी देऊ नये, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज लगावला.

खा. सुळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरूवारी म्हणाले लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये सुरू करणार आहे. शक्य असेल तर १ जानेवारी २०२५ पासून ती सुरू करावी. आमची अपेक्षा ३ हजार द्यावेत अशी आहे. विरोधकांची सशक्त लोकशाहीमध्ये गरज असते. आम्ही देशाच्या हितासाठी सहकार्य करत असतो, व्यक्ती हितासाठी आम्ही सहकार्य करत नाही.

महाराष्ट्र विधानसभेचा निकाल आम्ही १०० टक्के मान्य करत नाही. या निकालाविरूद्ध आम्ही निवडणूक आयोगात गेलो आहोत. माजी आमदार संग्राम थोपटे यांना भोर मतदारसंघातील एका बूथवर १ मत मिळाले आहे, हे अशक्य आहे. दिल्ली बॉर्डरवर शेतकरी आंदोलन सुरू आहे. हे शेतकरी विरोधी सरकार आहे, हे आम्ही सांगत आहोत. कपाशी, सोयाबीनला भाव नाही, हे आम्ही सांगत आलो आहे, असेही त्यांनी सांगितले.

# संविधानामुळेच केला थोरातांचा पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**मुंबई :** "माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाला आमदार बनण्याची संधी मिळाली ते केवळ संविधानामुळेच, आज संविधानामुळेच आठ वेळा आमदार झालेले बाळासाहेब थोरात यांना पराभूत करु शकलो", असे वक्तव्य संगमनेरचे नवनिर्वाचित आमदार अमोल खताळ यांनी केले आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त खताळ हे चैत्यभूमीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आले होते. विरोधकांनी लोकसभेला संविधानाबाबत फेक नरेटिव्ह चालवले होते, मात्र जनतेने त्यांना या विधानसभेत उत्तर दिले असल्याचेही खताळ म्हणाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर विधानसभा मतदारसंघावर आतापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी गेली ४० वर्षे सलग आठवेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे.

मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या अमोल खताळ यांनी काँग्रेसच्या एकहाती वर्चस्वाला सुरुंग लावला. खताळ यांनी बाळासाहेब थोरातांचा १० हजार ५६० एवढ्या मतांनी पराभव केल्याने ते 'जायंट किलर' ठरले.

## चाहूल ख्रिसमसची

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**न्यू यॉर्क** : येथील रॉकफेलर सेंटर येथे ख्रिसमस ट्री लावण्यात आला आहे. ख्रिसमस जवळ आल्याची चाहूल त्याने दिली आहे.

# विरोधक ईव्हीएम विरोधात अकारण त्रागा करतात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत मविआचा दारुण पराभव झाल्याने, निकालानंतर विरोधकांकडून आणि विशेषतः काँग्रेस पक्षाकडून ईव्हीएमच्या विरोधात आक्षेप घेण्यात येत आहे. या आक्षेपांवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे. विरोधक विनाकारण त्रागा करत असल्याचे ते म्हणाले. यासाठी त्यांनी लातूर आणि नांदेड जिल्ह्याचे उदाहरण दिले.

माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधक पराभवाचे आत्मचिंतन न करता जोपर्यंत स्वतः सत्य स्वीकारत नाही, तोपर्यंत त्यांचा पक्ष पुढे येणार नाही. फडणवीस यांनी त्यासाठी लातूर जिल्ह्यातील देशमुख बंधूंच्या लढतीचा आणि नांदेडमधील लोकसभा पोटनिवडणुकीचा हवाला दिला. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लातूर जिल्ह्यात लातूर शहर विधानसभेत अमित विलासराव देशमुख आणि लातूर ग्रामीणमध्ये धीरज विलासराव देशमुख निवडणूक लढवत होते. त्यापैकी धीरज देशमुख यांचा पराभव झाला. तर अमित देशमुख यांचा विजय झाला. म्हणजे लातूर ग्रामीणमध्ये ईव्हीएम हॅक झाले, पण लातूर शहरात ते झाले नाही का? अशाच प्रकारे ते लोकसभेला जिंकले, तेव्हा ईव्हीएममध्ये काहीच अडचण नव्हती का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

# काश्मीरमध्ये कडाक्याची थंडी; तापमान उणे ६ अंशांपर्यंत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील काश्मीर खोऱ्यात पारा घसरत चालला आहे. श्रीनगरमध्ये शुक्रवारी मोसमातील सर्वात थंड रात्र नोंदवली गेली आणि तापमान उणे ४.१ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, श्रीनगरमध्ये एक दिवसापूर्वी उणे २.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती आणि शुक्रवारी ते उणे ४.१ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. या हंगामात हे तापमान सरासरीपेक्षा २.९ अंश सेल्सिअसने कमी आहे.

पहलगाम, गुलमर्ग आणि कोनिबल सारख्या लोकप्रिय पर्यटन स्थळांवर थंडीचा कडाका कायम आहे. किमान तापमान अनुक्रमे उणे ६.५ अंश सेल्सिअस, उणे ४.३ अंश सेल्सिअस आणि उणे ६.० अंश सेल्सिअस नोंदले गेले.

पहलगाममधील पर्यटन स्थळ आदल्या रात्रीपेक्षा थंड तर होतेच, पण दक्षिण काश्मीरमधील लोकप्रिय हिल स्टेशनसाठी हंगामी सरासरीपेक्षा ३.२ अंश सेल्सिअस कमी होते. गुलमर्गच्या प्रसिद्ध स्की रिसॉर्टमध्ये उणे ४.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, तर आदल्या रात्री ते उणे ३.६ अंश सेल्सिअस होते. या कालावधीत उत्तर काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातील गवताळ प्रदेशात हे तापमान सरासरीपेक्षा १.२ अंश सेल्सिअसने कमी होते. श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्गावरील काश्मीरचे प्रवेशद्वार असलेल्या काझीगुंडमध्येही रात्रीच्या तापमानात घट झाली.

# शेतकरी आंदोलनाला हिंसक वळण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाबहून हरियाणामार्गे दिल्लीत प्रवेश करू पाहणाऱ्या शेतकऱ्यांनी आपला पदयात्रा रविवारपर्यंत पुढे ढकलली आहे. शेतकरी नेते सरवनसिंह पंढेर यांनी सांगितले की, सुरक्षा रक्षकांनी सोडलेल्या अश्रुधुराच्या गोळ्यांमुळे अनेक शेतकरी जखमी झाले. यामुळे शेतकऱ्यांनी दिल्लीकडे जाणारा पायी मोर्चा रविवारपर्यंत पुढे ढकलला आहे. काही शेतकरी जखमी झाले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

हरियाणात सुरक्षा रक्षकांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्याने, पाच ते सहा आंदोलक जखमी झाल्याचा दावा शेतकरी नेत्याने केला आहे. ११ महिन्यांपासून सीमेवर उभे असलेले शेतकरी आज दिल्लीच्या दिशेने कूच करू लागले. अंबालाच्या शंभू सीमेवरून १०१ शेतकऱ्यांची तुकडी दिल्लीला रवाना झाली होती. मात्र, त्यांना पोलिसांनी त्यांना रोखले. शेतकऱ्यांनी बॅरिकेड्स आणि तारेचे कुंपणू उखडून टाकले. यावर पोलिसांनी त्यांना इशारा देत अश्रुधुराचे गोळे सोडले, ज्यात ७ शेतकरी जखमी झाले.

भारतीय नागरी संरक्षण संहितेच्या कलम १६३ अंतर्गत जमावबंदी लागू करण्यात आली.

### बिश्नोई टोळीचा धक्कादायक दावा

# सलमान खानच निशाण्यावर होता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** बाबा सिद्दीकी प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून आता मोठा आणि धक्कादायक खुलासा करण्यात आलाय. आरोपीने सांगितले की, बाबा सिद्दीकी यांच्या अगोदर सलमान खान हाच त्यांच्या निशाण्यावर होता. मात्र, कडक सुरक्षा असल्याने त्यांना सलमान खान याच्यावर गोळीबार करता आला नाही. त्यांनी अनेकवेळा सलमान खानवर गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सलमान खानच्या आजूबाजुला जास्त सुरक्षा असल्याने ते शक्य झाले नाही, असे त्याने म्हटले आहे.

बाबा सिद्दीकी गोळीबारप्रकरणात अनेक खुलासे समोर येत असून, सततच्या धमक्यांमुळे सलमान खानची सुरक्षा वाढवण्यात आलीये. बॉलीवूड अभिनेता सलमान खान हे कायमच चर्चेत असणारे एक नाव आहे. सलमान खान नेहमीच त्याच्या वेगवेगळ्या चित्रपटांसाठी चर्चेत असतो. सलमान खानचे अनेक चाहते आहेत. गेल्या काही दिवसांपासून सलमान खान बिश्नोई प्रकरणात चर्चेत आहे. सलमान खानला लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळताना दिसत आहेत. फक्त हेच नाही तर सलमान खानच्या घरावर बिश्नोई टोळीकडून गोळीबार देखील करण्यात आला होता.

सलमान खानचे अत्यंत जवळचे मित्र बाबा सिद्दीकी यांच्यावर बिश्नोईच्या तीन शूटरकडून गोळीबार करण्यात आला.

### अल्पवयीन मुलाला ईशनिंदेच्या आरोपाखाली अटक

# बांगलादेशात हिंदूंवर अन्याय सुरूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशात हिंदूंवरील अन्याय अत्याचाराचे सत्र सुरूच आहे. बांगलादेशातील दिनाजपूर येथे एका अल्पवयीन हिंदू मुलाला अटक करण्यात आली आहे. मुलावर धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली आहे. त्याला न्यायालयाने बालकारागृहात राहण्याची शिक्षी दिली आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, बांगलादेशात दिनाजपूर येथून हिंदू अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली आहे. तो इयत्ता आठवीचा विद्यार्थी आहे. अर्पण दास असे त्याचे नाव सांगण्यात आले आहे.

मोहम्मद अब्दुल मतीन यांनी ईशनिंदा प्रकरणात त्यांच्याविरोधात एफआरआय दाखल केली आहे. याप्रकरणात सायबर सुरक्षा कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. यानंतर न्यायालयाने बालसुधागृहात रवानगी केली असे सांगण्यात येत आहे. दरम्यान बांगलादेश ईशनिंदाने केलेल्या आरोपाखाली हिंदूंना अटक करण्यात आल्याची ही पहिलीच घटना नाही. याआधीही अशीच एक घटना चितगावा येथे घडली होती. युनूस सरकार सत्तेवर आल्यानंतर बांगलादेशात इस्लामिक कट्टरतावादात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याची माहिती आहे.

### मुजीबूर रहमान यांचे छायाचित्र हटवले

● बांगलादेशातून शेख हसीना यांना हद्दपार करुन मोहम्मद यूनुस सरकारचा मोर्चा आता राष्ट्रपिता मुजीबुर रहमान यांच्याकडे वळलेला दिसून येतोय. राष्ट्रपिता मुजीबुर रहमान यांच्या सर्व निशाण्या



मिटवण्याकडे यूनुस सरकारचा कल आहे. इस्लामी कट्टरपंथी आणि पाकिस्तानच्या विचारधारेवर चालत यूनुस सरकारने आता बांग्लादेश चलनावरुन बंगबंधु मुजीबुर रहमान यांचा फोटो हटवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. त्यांच्या जागी जुलै महिन्यातील सत्तापालटाची छायाचित्रे नोटांवर छापली जातील. याआधीही बंगबंधु यांचा इतिहास मिटवण्याचा प्रयत्न यूनुस सरकारने केलेला आहे.

#रा

## सोशल मीडियात शेतकरी जोरात

# खेडमध्ये केली कांद्याने शंभरी पार..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** देश तसेच राज्यातील बाजारांमध्ये नव्यासह जुन्या कांद्याची आवक होत आहे. प्रमुख घाऊक बाजारांत कांद्याला साठ, सत्तर तसेच ऐंशी रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळत आहे. खेडमध्ये किरकोळ बाजारात पन्नास ते शंभर रुपये प्रतिकिलोला ग्राहकांना मिळत आहे. त्यामुळे उत्साही शेतकरी पोरांनी सोशल मीडियात केलेल्या पोस्ट्स चर्चेचा विषय ठरत आहे.

ही भाववाढ शेतकरी व व्यापाऱ्यांसाठी समाधानकारक आहे. यामुळे येत्या काळात घाऊक बाजारातही कांदा शंभरी पार करेल का ? याबाबत ग्राहक, शेतकरी तसेच व्यापाऱ्यांत चर्चा सुरू आहे. परिणामी 'कही खुशी, कही गम' असे चित्र निर्माण झाले आहे.



श्रीलंकेच्या सरकारने आयात शुल्क कमी केल्याने देशातून कांद्याची निर्यात वाढू शकते. यापूर्वी बांगलादेशाने आयात शुल्क रद केली आहे. यामुळे बाजारभाव वाढतील. ते शंभरी गाठतील शक्यता शेती तज्ज्ञांसह व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. देशात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात, राजस्थान, हरियाना, उत्तरप्रदेश या राज्यात प्रामुख्याने कांद्याचे पीक घेतले जाते.

> **श्रीलंकेनेसुद्धा निर्यातशुल्क कमी केल्याने कांद्याची निर्यात वाढेल. श्रीलंकेच्या दराप्रमाणे कांद्याचे भाव तिथे तीनशे रुपये तेथील चलनानुसार प्रतिकिलोला आहे. केंद्र सरकारने कांदा निर्यातशुल्क वीस टक्के ठेवलेले आहे ते पूर्णपणे हटवावे, अशी मागणी निर्यातदार व्यापारी यांची आहे.**

जगात कांद्याच्या उत्पादकतेत, कांदा लागवडीच्या क्षेत्रात भारत हा पहिल्या स्थानावर आहे. परंतु उत्पादन कमी निघते असे वास्तव आहे. महाराष्ट्र हे देशात सर्वात जास्त कांदा उत्पादन घेणारे राज्य समजले जाते. राज्यात नाशिक, पुणे, सोलापूर, अहिल्यानगर या जिल्ह्यात कांद्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते त्या खालोखाल इतर जिल्ह्यातही अल्प प्रमाणात ऊत्पादन घेतले जाते. राज्यात नाशिक, लासलगाव तसेच चाकण ही कांदा निर्यातीसाठी व देशांतर्गत खरेदी विक्रीसाठी कांद्याची मोठी बाजारपेठ समजली जाते.

श्रीलंका सरकारने आयात शुल्क तीस टक्क्यावरून दहा टक्के केल्याने निर्यातदारांनी समाधान व्यक्त केले आहे. देशातील कांदा श्रीलंकेच्या बाजारात जाण्यास त्यामुळे मदत होणार आहे व कांद्याला चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा आहे.

## डंपरच्या धडकेत एक जण ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** रस्त्याच्या कामावर असताना मुरूम घेऊन आलेल्या डंपर चालकाने डंपर मागे घेत असताना, एका इसमाच्या अंगावर घातल्याने झालेल्या अपघातामध्ये हा इसम गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. याबाबत जिजाभाऊ प्रभाकर उतळे या डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत चिंतामण विठ्ठल जोगदंड (रा. परीटवाडी, जुन्नर) यांचा मृत्यू झाला.

कुमशेत येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामावर चिंतामण हे असताना डंपर चालक तेथे मुरूम घेऊन आला असताना, डंपर मागे घेताना कोणतीही काळजी न घेतल्याने त्याची ठोकर चिंतामण यांना बसल्याने ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. प्रकाश जोगदंड यांनी फिर्याद नोंद केली

## Selected

## राजगुरुनगर येथे डॉ आंबेडकर यांना पुष्पहार घालून अभिवादन



राजगुरुनगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना आमदार बाबाजी काळे व इतर.

**खेड :** ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी राजगुरुनगर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पूर्वसंध्येला पुतळा परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सकाळी पोलिस निरिक्षक प्रभाकर मोरे यांच्या पोलिस पथकाने सामुहिक सलामी देऊन अभिवादनाला सुरुवात झाली. आमदार बाबाजी काळे , प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार ज्योती देवरे, राजगुरुनगरचे माजी सरपंच शांताराम घुमटकर , जी रं शिंदे, काँग्रेसचे विजय डोळस, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले, जीवन कोकणे, डॉ नीता आल्हाट, पल्लवी नाईक, संतोष डोळस, अँड भीमराव थोरात, प्रशांत तुळवे, अनिल जाधव, सुदाम देखणे, महेंद्र थोरात, यश गायकवाड, अशोक कडलक, विद्याधर साळवे, विजय घेगडमल आदी मान्यवर आणि नागरिक यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

## श्री चक्रधरस्वामी व दत्तप्रभू यांचे स्थान

# सौरंग्या डोंगर घालतोय पर्यटकांना साद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुक्याच्या उत्तर सीमा भागातील धार्मिक, ऐतिहासिक श्री क्षेत्र सुवर्णगड अर्थात सौरंग्या डोंगर पर्यटकांना साद घालत आहे. महानुभव पंथाचे अवतारस्वरूप व प्रवर्तक श्री चक्रधरस्वामी व दत्तप्रभु यांचे सौरंग्या हे स्थान आहे.

काळेची वाडी गावापासून काही अंतरावर आणि ३०० मीटर पेक्षा जास्त उंच असा सौरंग्या आहे. सौरंग्यावरील महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे मंदिरात एकमुखी दत्तप्रभूची स्थित असलेली मूर्ती. सहसा आपण तीन शीर असलेली दत्तप्रभूची मूर्ती अनेक ठिकाणी पाहतो परंतु एकमुखी दत्तप्रभूची मूर्ती फार कमी ठिकाणी पहायला मिळते.



सौरंग्या डोंगरास फार पुरातन असा धार्मिक इतिहास लाभला आहे. सौरत्नगिरी हे डोंगराचे मूळ नाव आहे. नानाशास्त्री पंडित महानुभाव यांनी सौरंग्या डोंगरावर दत्तप्रभूची आराधना केल्याने दत्तप्रभु सौरंग्या डोंगरावर प्रकट झाल्याचा उल्लेख पुरातन ग्रंथात आढळतो. पर्यटनाच्या दृष्टीने सौरंग्या डोंगराच्या आसपासचा परिसर तितकाच नेत्रदीपक आहे. मनमोहक निसर्गाचे सौंदर्य हे सौरंग्याचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून मंदिराकडे जाण्यासाठी पक्का रास्ता तयार करण्यात आल्याने हा मार्ग सुगम झाला आहे. दरवर्षी मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंती निमित्त यात्रा भरते. एकंदरच निसर्गरम्य परिसर व भक्तांची दत्तप्रभूवर असणारी श्रद्धा या देवस्थानाला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवते यात शंकाच नाही.

## बांगलादेशप्रकरणी सरकारने हस्तक्षेप करावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** बांगलादेशातील इस्कॉनचे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्या अन्याय्य अटकेविरोधात भारत सरकारने त्वरित हस्तक्षेप करण्याची आणि हिंदू अल्पसंख्याकांवरील अन्याय रोखण्याबाबत कारवाई करावी, अशी मागणी हिंदू जन जागृती समितीकडून करण्यात आली. याबाबतचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह तसेच जिल्हाधिकारी पुणे यांना दौंड तहसीलदार अरुण शेलार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.



चिन्मय कृष्णदास यांची बांगलादेश सरकारवर दबाव आणून सुटका करण्यात यावी, तसेच त्यांना आवश्यक ती सुरक्षा देण्यात यावी. तेथील हिंदू अल्पसंख्यांकांचे संरक्षण करण्यासाठी तसेच हिंदू मंदिरांचे रक्षण करण्यासाठी सरकारने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर बांगलादेश सरकारला जबाबदारीची जाणीव करून द्यावी, हिंदू समाजाच्या सुरक्षेसाठी तसेच मानवी हक्कांसाठी संयुक्त राष्ट्रांसह अन्य आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत घेऊन योग्य ती पावले उचलावीत या प्रमुख मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे. निवेदन देताना भूषण ताकवले, संकेत ताकवणे, गणेश शितोळे, निलेश ताकवले, गणेश ताकवणे, प्रकाश ताकवणे, शुभम ताकवणे, संदेश ताकवणे, प्रजोत ताकवणे, प्रणव ताकवले, अनिकेत ताकवणे आदी उपस्थित होते.

## खेडमध्ये 'जागतिक मृदा दिन' श्री क्षेत्र कनेरसर येथे साजरा



**राजगुरूनगर :** खेड कृषी विभागातर्फे जागतिक मृदा दिन गुरुवारी श्री क्षेत्र कनेरसर येथे साजरा केला गेला. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी नंदू वाणी, कृषी सहाय्यक उषा गर्जे, प्रभारी कृषी मंडळ अधिकारी प्रविण शिंदे, सरपंच सुनिता केदारी यांच्यासह शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

अन्नाची वाढती गरज भागविण्यासाठी रासायनिक खते, औषधांचा वापर वाढला. भारतासारख्या देशात शेतकरी एका वर्षात तीन पिके घेऊ लागले. याचा परिणाम म्हणून मातीचा कस कमी झाला. मातीचे आरोग्य बिघडले. त्यामुळे लाखो हेक्टर जमीन नापिक झाली. खारट (क्षारपड) झाली. जगभरात जमीन नापिक होण्याचे प्रमाण वाढले आहे. जमिनीचा कस सुधारला नाही तर वाढलेल्या लोकसंख्येचे पोट कसे भरायचे, हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी भारतातच नाही तर जगभरात मातीचे आरोग्य जपण्यासाठी, मातीचा कस सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सूत्रसंचालन उषा गर्जे यांनी केले तर प्रविण शिंदे यांनी आभार व्यक्त केले.

# निफ्टेम संस्थेने दौंदेतील महिलांना केले सक्षम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुक्यातील दोंदे गावातील लहान मोठ्या महिला उद्योजक व बचत गटांच्या महिलांना घरगुती उत्पादने बनवण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यासाठी आवश्यक सर्व परवाने काढून देणे, पॅकेजिंग, लेबलिंग करून देणे आणि मार्केटिंग साठी ई कॉमर्स मार्केट लिंकेजस अशा सर्व प्रकारची मदत विनामूल्य केंद्र शासनाच्या हरियाणा येथील राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान उद्योजकता आणि व्यवस्थापन संस्था संस्थेच्या वतीने मदत करण्यात येते. संस्थेने हे गाव दत्तक घेतले असून, दर वर्षी संस्थेचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांची टिम तब्बल दहा दिवस गावात येऊन राहाते व महिला उद्योजकांच्या सर्व अडचणी दूर करते. यामुळेच आज दौंदे गावातील अनेक महिला आर्थिक सक्षम झाल्या असून, ऑनलाईन मार्केटिंग लिंकेजसमुळे महिन्याला लाखो रूपयांचा टर्नओव्हर करत आहेत.



राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान उद्योजकता आणि व्यवस्थापन संस्थेच्या वतीने विविध राज्यातील गावे दत्तक घेऊन अशा गावातील महिलांना सक्षम करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाते. संस्थेची दहा-बरा विद्यार्थ्यांची टिम व प्राध्यापक नुकतेच गावात दहा दिवस मुक्काम करून गेले.

याबाबत संस्थेचे प्राध्यापक डॉ. प्रारब्ध सी. बडगुजर यांनी सांगितले की, गेले दहा दिवसात दौदे गाव व कांदा व लसूण संशोधन संस्थेतील विविध स्टार्टअप सुरू केलेल्या शेतकरी उद्योजकांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक प्लॅन्टवर जाऊन येणा-या अडचणी दूर केल्या, मोरांना टॅब्लेट, निर्जलित जामुन बाइट उत्पादनांसाठी फॉर्म्युलेशन देण्यात आले. येथील इनक्युबेशन सेंटरमध्ये प्रायोगिक चाचण्या घेऊन शेतकऱ्यांसाठी उत्पादन विकास आणि सर्वोत्तम पद्धतींबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यात नव्याने सुरू केलेल्या स्टार्टअपचा तर मेकओव्हर करून टाकला.

# नीरेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** येथे शुक्रवारी ग्रामपंचायत कार्यालयात व लिलावती रिखवलाल शहा कन्याशाळेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिना निमित्त अभिवादन करण्यात आले. नीरा ग्रामपंचायत कार्यालयात सदस्य सुनिल चव्हाण, वैशाली काळे, राधा माने, बौध्द महासभेचे अध्यक्ष दादा गायकवाड, कुमार मोरे, अमोल साबळे, योगेंद्र माने, दयानंद चव्हाण, सागर शिंदे, सुनिल पाटोळे, अनिल धायगुडे, आप्पा लकडे यांच्यासह ग्रामस्थांनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले. लिलावती रिखवलाल शहा कन्या विद्यालयामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निर्मला नायकोडी व इतर शिक्षकवृंद यांच्या हस्ते करण्यात आले.

## 'आपलं कर्तव्य'ने दिली मायेची ऊब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** येथील 'आपलं कर्तव्य' ही संस्था समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी कार्यरत आहे. या सामाजिक संस्थेमार्फत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सुमारे २०० विद्यार्थ्यांना नुकतेच स्वेटर व कानटोपीचे वाटप करण्यात आले. येथील शगुन कलेक्शन व श्रीराम क्लॉथच्या वतीने 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर हे साहित्य दिले. खेड तालुक्यातील जऊळके बुद्रुक, राजगुरुनगर व इतर काही जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर व कानटोपीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी गणेश पाटोळे, विशाल वाळुंज, अविनाश सैंदाणे, नवनाथ पाचारणे, प्रशांत कुंभार, सागर सांडभोर, श्रीकांत नाईकरे, नितीन फदाले, उपस्थित होते..

## सायकलवीरांचे चाकणमध्ये स्वागत



**म्हाळुंगे :** काश्मिर ते कन्याकुमारी सायकलवर स्वार होऊन पूर्ण करण्याचा मानस मनात ठेवून तसेच राष्ट्रीय एकात्मता, निरोगी भारत, निरोगी स्वास्थ व प्रदुषणमुक्त भारत असा संदेश काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंत देत या सायकल वीरांनी काश्मिरच्या श्रीनगर मधील लालचौक पासून या मोहिमेला सुरुवात करून पुढे कन्याकुमारी पर्यंत ३,९०० किमीचा प्रवास सायकलवर करणारे हँटर्स ट्रेकिंग ग्रुपचे चाकणचे राजेश शेवकरी, सचिन मेहंदळे, तुषार टावरे ,अविनाश पाटील, सुशील कदम, दयानंद शिंदे, संदेश दिगे आणि एकमेव महिला कुमारी रोहिणी पोटे हे ८ सदस्य २,३०० किमीचा प्रवास करून चाकण येथे दाखल झाले. त्यावेळी त्यांचे स्वागत महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, रोनक गोरे, प्रीतम परदेशी, विजू रत्नपारखी, निलेश जाधव, सुशील खोले, शुभम गोरे, हर्षवर्धन गोरे आणि विशाल बारवकर यांनी केले. तसेच त्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्या दिल्या.

## चैतन्य विद्यालयात महापरिनिर्वाण दिन संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** येथील ग्राम विकास मंडळाच्या चैतन्य विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक संजय हिरे, पर्यवेक्षक अनिल उकिरडे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, एम एम तांबे, राजाराम शिंदे, विजया गडगे, प्रमोद कुमार जाधव, देवचंद नेहे, अजित डांगे, संतोष कांबळे, मिलिंद खेत्री, बाळासाहेब साबळे, संतोष सोनवणे, वनिता भोर, आसावरी गायकर, सोनाली माळवे, सोनाली कांबळे, आशा गाडेकर, विशाल चौधरी, लक्ष्मण दुडे, अमित झरेकर, दिनेश ताठे, अनिल जवरे, विजय खरात, मयूर जाधव, प्रसन्न तांबे,आशा डुंबरे, अश्विनी नलावडे, तनुजा थोरात, हर्षल हर्षल शितोळे, सुजाता राऊत, निर्मला डोंगरे, साक्षी देशमुख, अनुराधा इसकांडे, योगेश फापाळे, ईश्वर ढमाले, अरविंद आंब्रे, तेजस ढमाले, दीपक हांडे इ.उपस्थित होते.



## केडगावमध्ये कांद्याची आवक वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** दौंड बाजार समितीच्या केडगाव येथील उपबाजारात कांद्याची आवक वाढली. दरात प्रति क्विंटल पाचशे रुपयांची वाढ झाल्याने कांदा उत्पादकांना दिलासा मिळाला असून, कांद्याची १.१८५ क्विंटल आवक झाली. प्रतवारीनुसार किमान ८०० रुपये, तर कमाल ७००० प्रति क्विंटल असा बाजारभाव मिळाला. मागील आठवड्यात कांद्याची १,०१० क्विंटल आवक झाली होती. त्यास प्रतवारीनुसार किमान ८०० रुपये तर कमाल ६,५०० प्रति क्विंटल असा बाजारभाव मिळाला होता.



दौंड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दौंड मुख्य बाजारासह केडगाव, यवत व पाटस येथील उपबाजारांमध्ये भुसार मालाची आवक आवक स्थिर असून, बाजारभाव तेजीत आहेत. दौंड मुख्य बाजारात भाजीपाल्याची आवक वाढली. लग्नसराईमुळे मागणी वाढल्याने सध्या बाजारभाव तेजीत आहे. दौंड मुख्य बाजारात कोथिंबिरीची १३,११० जुडी आवक होऊन त्यास शेकडा किमान ३०० रुपये, तर कमाल १,२०० रुपये जुडी असा बाजारभाव मिळाला. मेथीची ६,८९० जुडी आवक होऊन त्यास शेकडा किमान ५०० रुपये, तर कमाल १,३०० रुपये जुडी असा बाजारभाव मिळाला. केडगाव येथे लिंबाची ११६ डाग आवक झाली, प्रतवारीनुसार किमान २०१ व कमाल ४६१ रुपये प्रति डाग असा भाव मिळाला आहे. थंडीमुळे निंबाला मागणी कमी होती. मागील आठवड्यात लिंबाची ६८ डाग आवक होऊन प्रतवारीनुसार किमान ४०० व कमाल ६०१ रुपये डाग असा भाव मिळाला होता.

## ग्रामपंचायतीची गतिरोधक बसविण्याची मागणी

# पाडेगांव येथे गतिरोधक उभारा अन्यथा रास्ता रोकोचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** आळंदी- पंढरपूर पालखीमार्गावरील पुणे - सातारा जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या पाडेगांव (ता. खंडाळा) हद्दीत नीरा नदीवरील पुलावरील धोकेदायक अवघड वळणासह विविध ठिकाणी वाहनांच्या अतिवेगाने झालेल्या अपघातात अनेकांना आपला जीव गेला आहे. तर काही जणांना गंभीर दुखापत झालेली आहे. याकरिता पाडेगांव ग्रामपंचायतीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करून पाडेगांव परिसरात चार ते पाच ठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी केली आहे. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पाडेगांव हद्दीत गतिरोधक न उभारल्यास लवकरच रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

पुणे - सातारा राज्यमार्गावरील तसेच पालखी मार्गावरील नीरा - लोणंद रोडवर असलेल्या पाडेगांव (ता. खंडाळा) गावच्या हद्दीत गतिरोधक नसल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. नीरा नदीच्या पुलावरील धोकेदायक अवघड वळणावर ८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडे चारच्या सुमारास दुचाकीस्वाराला धडक देऊन ट्रकचालक पसार झाला. या अपघातात दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला. तर २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर संध्याकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास पाडेगांव येथील समता आश्रम शाळेच्या परिसरात व ऊस संशोधन केंद्राच्या ऑफिस समोर एका तरूणाच्या अंगावरून भरधाव ट्रक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातात मृत्यू पावलेल्या कुटूंबाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. अशा संवेदनशील घटनांकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण दुर्लक्ष करीत असल्याने पाडेगांव, नीरा परिसरातील नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



पाडेगांव येथील पालखीमार्गावरील नीरा नदीवरील धोकादायक वळण.

याबाबत पाडेगांव ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिका-याची भेट घेऊन गतिरोधक बसविण्याबाबत लेखी मागणी करूनही एनएचआय दुर्लक्ष करीत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने पाडेगांव परिसरात गतिरोधक न बसविल्यास पाडेगांव ग्रामस्थ आंदोलन करणार असल्याचा इशारा पाडेगांवचे माजी सरपंच

विजयराव धायगुडे यांनी दिला आहे.

### अवजड वाहनांची सुसाट वाहतूक

● पाडेगांव हद्दीतून जाणारा पुणे - सातारा व पुणे - पंढरपूर पालखीमार्ग या मार्गावरून अवजड वाहनांसह मोठी वाहतूक सुसाट वेगाने होत असते. तसेच पाडेगांव हद्दीतील नीरा नदी ते बाळू पाटलाचीवाडी इथपर्यंतच्या परिसरात आजुबाजूच्या गावांना जोडणारे रस्ते असल्याने मोठी गर्दी होत असते. तसेच समता आश्रमशाळेत सातशे ते आठशे विद्यार्थी शिकत असल्याने शाळा सुटल्यानंतर पालखी मार्गावर प्रचंड गर्दी होत असते. त्यामुळे नीरा नदी जवळ, समता आश्रम शाळेजवळ, पाडेगांव कॅनॉल जवळ, हॉटेल रजतसागरजवळ व बाळूपाटलाचीवाडी चौकात गतिरोधक बसविण्याची मागणी पाडेगांव ग्रामस्थांची आहे.

> राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाडेगांव परिसरात तातडीने गतिरोधक बसविण्याची वेळोवेळी मागणी केली आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने गतिरोधक बसविण्यास विलंब केला तर पाडेगांव ग्रामस्थ रास्ता रोको आंदोलन करतील.
>
> **- विजयराव धायगुडे,**
> माजी सरपंच, पाडेगांव

#रा

## आंबेगाव-शिरूरमध्ये प्रचंड उत्सुकता

# दिलीप वळसे पाटील राज्यपाल ?



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** आंबेगाव - शिरूर विधानसभा मतदारसंघातून सलग आठव्यांदा निवडून गेलेले आमदार दिलीप वळसे पाटील यांना राज्यपाल म्हणून संधी देण्यात येणार असे वृत्त काही वृत्तवाहिन्यांनी दखविले. मात्र, आता वळसे पाटील यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळणार का राज्यपाल पद मिळणार? अशी चर्चा देखील मतदारसंघात रंगली आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील हे सलग आठव्यांदा आंबेगाव - शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडून गेले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर दिलीप वळसे पाटील यांनी शरद पवारांची साथ सोडली आणि त्यांनी अजित पवार गटातून निवडणूक लढवली आणि सलग आठव्यांदा निवडून आले. त्यामुळे मंत्रिमंडळात निश्चितच वळसे पाटील यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळेल, असे निश्चित झाले. तथापि, काही वृत्तवाहीन्यांनी वळसे पाटील यांना राज्यपाल पद मिळणार, असे वृत्त दाखविल्याने राज्यपाल की कॅबिनेट मंत्री अशी चर्चा आता मतदारसंघात रंगली आहे. दिलीप वळसे पाटील यांनी मंत्रिमंडळातील उर्जा, अर्थ, उच्च तंत्र शिक्षण, कामगार, गृह, सहकार अशी खाती सांभाळली असून, कॅबिनेट मंत्रीपदी काम करताना त्यांनी चांगले निर्णय देखील घेतले आहेत.

विधानसभेचे अध्यक्षपद देखील त्यांनी उत्कृष्टरित्या भूषवले. सुसंस्कृत, उच्चशिक्षित, संयमी, शांत अशी वळसे पाटील यांची ओळख आहे. राज्यात विविध मंत्री पदांवर काम करताना त्यांनी मतदार संघातही कोट्यावधी रुपयांची विकास कामे केलेली आहेत. वळसे पाटील यांना मिळालेल्या सर्वच मंत्रीपदांचा तालुक्यातील विकास कामांसाठी निश्चित फायदा झालेला आहे. त्यामुळे या महायुतीच्या सरकारमध्ये देखील वळसे पाटील यांना कॅबिनेट दर्जाचेच मंत्रीपद मिळावे, अशी मतदारसंघातील जनतेची इच्छा आहे.

### पाणी प्रश्न बाकी आहे...

● आंबेगाव शिरूर मतदार संघातील अजूनही काही भागातील पाणी प्रश्न सुटणे बाकी आहे. आदिवासी भागातील काही भाग, सातगाव पठार भागातील कलमोडी प्रकल्प, लोणी धामणी परिसरातील म्हाळसाकांत प्रकल्प, शिरूर तालुक्यातील बारा गावांच्या पाण्याचा प्रश्न सुटणे आवश्यक आहे. निवडणुकीत प्रचारांमध्ये वळसे पाटील यांनी निवडणुकीनंतर ही कामे प्राधान्याने सोडवली जातील, असे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे आता वळसे पाटलांनी कॅबिनेट दर्जाचे मंत्री पद घेऊन तालुक्यातील उर्वरित पाणी प्रश्न मार्गी लावावेत, अशी भावना मतदारसंघात आहे.

## झेंडूच्या फुलांचे बाजारभाव घसरले उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रांजणी :** झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने, झेंडू उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. झेंडूच्या फुलांच्या पिकासाठी लाखो रुपयांचे भांडवल गुंतवून, आता फुलांना कवडीमोल बाजारभाव मिळत असल्याने, शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात झेंडू उत्पादक शेतकरी अधिक आहेत. यंदा गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, दसरा, दिवाळी या सणांमध्ये झेंडूच्या फुलांना चांगला बाजारभाव मिळाला. मात्र, दिवाळीनंतर आता झेंडूच्या फुलांच्या बाजारभावात प्रचंड घसरण झाली आहे. महिन्यापूर्वी झेंडूच्या फुलांना किलोला ५० ते ६० रुपये बाजारभाव मिळत होता. तथापि, आता त्याला कवडीमोल बाजारभाव मिळत आहे.

झेंडूच्या पिकासाठी शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचे भांडवल गुंतवले आहे. अनेक शेतकऱ्यांनी झेंडूचे पिक मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन केले आहे. रोपवाटिकांमधून महागडी रोपे, खते, औषधे, मजूरी यासाठी मोठे भांडवल गुंतवले आहे. परंतू आता बाजारभावात मोठी घसरण झाली असून, पिकासाठी गुंतवलेले भांडवल देखील वसूल होत नाही, अशी परिस्थिती आहे.

## चंपाषष्ठी निमित्त श्री मल्हारस्वर ज्योतिर्मय शाम कार्यक्रम

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**जेजुरी :** श्रीमार्तंड देव संस्थान जेजुरी आयोजित श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट प्रायोजित तसेच मनीषा राजेंद्र खेडेकर संकल्पित सांस्कृतिक कार्यक्रम श्री मल्हार स्वर ज्योतिर्मय शामा हा गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कुलदैवत श्री खंडोबा देवाचा चंपाषष्ठी उत्सव जेजुरी गडावर सुरू असून, पंडित सुरेश वाडकर यांच्या शिष्या ज्योती गोराणे, राधिका साकोरे, भक्ती कापसे, पूजा वाणी यांच्या मल्हारमय स्वरांनी संपूर्ण मल्हार गड व जेजुरी परिसर भारला गेला. लक्ष्मी कुडाळकर यांनी ढोलकीची साथ दिली. निवेदन अॅड शोभा कदम यांनी केले. सर्व कलावंतांचा स्मृतिचिन्ह व खंडोबा देवाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

## दिपक म्हस्के यांना मी ओळखत नाही


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** दिपक म्हस्के या इसमाबरोबर माझा जमिनीचा कसलाही व्यवहार झाला नाही. त्याला मी ओळखतही नाही. केवळ जमीन माझी असल्याने या फसवणुकीच्या प्रकरणात माझे नाव टाकण्यात आले असल्याचे स्पष्टीकरण कारेगावचे माजी सरपंच अनिल उर्फ किसन नवले यांनी केले आहे.

सदर ठिकाणी जमिनीचे व्यवहार आमच्या परस्पर करू नयेत व सदर जागा विक्रीसाठी उपलब्ध नाही, अशा मजकुराचे बॅनर आम्ही फोन नंबरसहीत जमिनीच्या जवळ लावले आहेत. मात्र, सदर बॅनर फाडून आमच्या परस्पर व्यवहार करण्यात येतात. त्यामुळे दीपक भास्कर म्हस्के यांनी माझ्यावर केलेली फसवणुकीची तक्रार चुकीची असल्याचे अनिल उर्फ किसन नवले यांनी सांगितले.

सागर पाचर्णे व त्याच्या साथीदारांना, मी २०२० मध्ये केवळ एक वर्षासाठी जमिनीचे व्यवहार करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. त्यानंतर त्यांना या ठिकाणी जमिनीचे व्यवहार करू नका, असे सांगितले होते. मात्र, सागर पाचर्णे, अक्षय पाचर्णे, संतोश गर्जे यांनी आमच्या परस्पर सदर जागा दाखवून कोणाकोणाची फसवणूक केली आहे, याची पोलिसांनीच शहानिशा करून घ्यावी, असे अनिल उर्फ किसन नवले यांनी म्हटले आहे.

## निमगाव केतकीत महिलेचा खून



**इंदापूर :** तालुक्यातील निमगाव केतकी येथे तेहेतीस वर्षीय विवाहित महिलेचा अज्ञात कारणावरून खून झाल्याची घटना बुधवारी रात्री आठ ते साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. सुनिता दादाराम शेंडे (वय ३३ वर्षे,रा.निमगाव केतकी ता. इंदापूर) असे खून झालेल्या महिलेचे नांव आहे. ज्ञानेश्वर बबन रासकर (रा. सुरवड ता. इंदापुर) असे आरोपीचे नाव असून, सदर प्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर बबन रासकर हा स्वतःहून इंदापूर पोलीस ठाण्यात हजर झाला होता. पोलिसांनी आरोपीस इंदापूर न्यायालयात हजर केले असता त्यास एक दिवसाची पोलीस कोठडी सुनवण्यात आली. सुनिता शेंडे या निमगाव केतकीतील जानाई लक्ष्मी महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा होत्या.

## दिव्यांग जनजागृती रॅली संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयच्या वतीने दिव्यांग सप्ताहच्या निमीत्ताने गावामध्ये दिव्यांग जनजागृती रॅली चे आयोजन करत हातामध्ये हात घ्या - दिव्यांगांना साथ द्या, असा संदेश नागरिकांना देण्यात आला. पिंपळे जगताप येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयाच्या वतीने दिव्यांग सप्ताहच्या निमीत्ताने सेवाधामच्या विशेष विद्यार्थ्यांसह जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालयातील विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. सरपंच सोनल नाईकनवरे, ग्रामविकास अधिकारी रविंद्र शिंदे, पंडीत थिटे, माजी उपसरपंच अशोक नाईकनवरे, माजी चेअरमन अशोक जगताप, जनसेवा ग्रामविकास संस्थेचे संचालक रामचंद्र टाकळकर, मुख्याध्यापक वसंत रणसिंग, विलास भोंगळे, सेवाधामचे मुख्याध्यापक पवन कट्यारमल, अधिक्षिका भाग्यश्री चिलात्रे, संदीप जगताप, गणेश जगताप, संदीप सोंडेकर आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नृसिंह कुलकर्णी यांनी केले तर संदीप जगताप यांनी आभार मानले.

## सोयाबीन पोत्यांवर चोरट्यांचा डल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :**जुन्नर मधील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या तयार सोयाबीन पोत्यांवर चोरट्यांनी डल्ला मारला असून, पिंपळगाव सिद्धनाथ आणि कबाडवाडी येथिल शेतकऱ्यांची सुमारे १५ पोती सोयाबीनची चोरी झालेली आहे.

संतोष खंडागळे यांच्या राहत्या घराच्या ओट्यावर असलेली सोयाबीनची सात पोती, ५० किलो गव्हाचे पोते आणि एक मोबाईल अनोळखी चोरट्यांनी लंपास केला, तर नवनाथ कबाडी यांनी आपल्या बराकीमध्ये ठेवलेली आठ पोती सोयाबीन चोरट्यांनी पळवून नेले. अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक फौजदार भगवान गिजरे, पोलीस अंमलदार संतोष पवार करीत आहेत.

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबन क्लब व चांडोली ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश एड्स प्रतिबंध, तंबाखूच्या धोक्यांविषयी जागरूकता व आरोग्य विषयक जनजागृती करणे हा होता.

यावेळी चांडोली ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. तेजश्री रानडे यांनी एड्स जागरूकतेचे महत्त्व, चाचणी करण्याचे फायदे आणि एड्सशी संबंधित गैरसमज दूर करण्याची गरज यावर मार्गदर्शन केले. डॉ. सारिका खाडे (दंतचिकित्सक) यांनी तंबाखूमुळे होणाऱ्या कर्करोगाचे धोके आणि त्याची लक्षणे याविषयी मार्गदर्शन केले. चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक मुख्तार शेख यांनी रेड रिबन क्लबचे उद्दिष्ट आणि त्याच्या उपक्रमांची माहिती दिली.

## वैशाली मोरे यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**राजगुरूनगर :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील आदर्श शिक्षिका वैशाली मोरे यांचे दिर्घ आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा,एक मुलगी, सुन, जावई असा परिवार आहे. राज्य शिक्षक नेते मुगुटराव मोरे यांच्या त्या पत्नी तर डॉ. स्नेहल सचिन ओहोळ यांच्या त्या मातोश्री होत. खेड किसान सभेचे सचिव अमोद गरुड आणि उद्योजक प्रमोद गरुड यांच्या त्या जेष्ठ भगिनी होत्या.

## केंद्रस्तरीय स्पर्धा वसईवाडीला उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागात वसईवाडी गुरुवारी पंचायत समिती जुन्नर यशवंतराव कला क्रीडा महोत्सव अंतर्गत केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन जिप प्राथमिक शाळा वसईवाडी येथे करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन गोविंद साबळे - सरपंच तळेरान, मोहन घोडे - ग्रामपंचायत सदस्य, भाऊ कारभळ -अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, शंकर गोडे - तंटामुक्ती अध्यक्ष, दादाभाऊ मेने - तंटामुक्ती उपाध्यक्ष यांचे हस्ते करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना ग्रामविकास प्रतिष्ठान तळेरान यांच्या वतीने ट्रॉफी देण्यात आली. स्पर्धा संयोजनात संगीता बेल्हेकर, श्यामल पाटे, विवेकानंद दिवेकर, राहुल कोरडे या शिक्षकांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

## कासारीचे मुख्याध्यापक अशोक सरोदेंचे निलंबन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** कासारी येथील हिराबाई गोपाळराव गायकवाड विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक सरोदे यांच्यावर तब्बल अठरा गंभीर आरोप ठेवून त्यांचे निलंबन करण्यात आले असल्याने, सदर कारवाई करण्याबाबत संस्थेकडून आपल्याकडे शिफारस पत्र प्राप्त झाले आहे. संस्था स्तरावर सदर कारवाई करण्याच्या अधिकारानुसार अशोक सरोदेंचे निलंबन झाल्याची माहिती जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी दिली आहे.

कासारी येथील हिराबाई गोपाळराव गायकवाड विद्यालय या शाळेचे मुख्याध्यापक अशोक सरोदे यांनी संस्था लेटरहेड, शिक्का व सह्यांचा गैरवापर करणे, शंभर टक्केपेक्षा कमी अनुदानित कर्मचाऱ्यांची मेडिकल बिले काढून शासनाची फसवणूक करणे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बोगस रजा मंजुर करणे, गोपनिय अहवालाशिवाय चुकीची वेतनवाढ घेवून शासनाची फसवणूक करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून पैसे घेणे व त्यांना वेठीस धरणे, विद्यार्थ्यांकडून पैसे गोळा करुन ते गहाळ करणे, तुकडीवाढीचे प्रस्ताव न देणे, संस्था पदाधिकारी व संचालक यांना धमकावणे, खाजगी शिकवनी व उन्हाळी वर्गाचे हिशोब न ठेवणे, शाळा व्यवस्थापन समिती बैठका न घेणे, शालेय आर्थिक व्यवहार नोंदी व विनियोगपत्र संस्थेकडे न देणे, गुणवत्ता वाढीबाबत संस्थेला प्रतिसाद न देणे, दप्तर अद्ययावतीकरण न करणे, शालेय पोषण आहार अनियमितता, रोजकिर्द व कॅशबुक अद्ययावत नसणे, रजा मंजुर नसताना शाळा सोडून जाणे, शाळा परिसर अस्वच्छ ठेवणे अशा स्वरूपाचे अठरा आरोप ठेवून संस्थेकडून मुख्याध्यापक अशोक सरोदे यांचे निलंबन करण्यात आले आहे.

### बांधावर मिळतोय दहा किलोला २३० ते २५० रुपये भाव

## आंबेगावच्या पूर्वभागात बटाटा काढणीला सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्वभागात रब्बी हंगामातील बटाटा काढणीला सुरुवात झाली आहे. वरुणराजाच्या कृपेमुळे बटाटा पिकाची चांगली वाढ झाली. परिणामी उत्पादनात चांगली वाढ झाली आहे. काढणी झालेल्या बटाट्याला बांधावरच प्रति दहा किलोला २३० ते २५० रुपये बाजारभाव मिळत आहे. चांगले उत्पन्न मिळत असल्याने बटाटा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

तालुक्याच्या पूर्वभागातील काठापुर बुद्रुक, पोंदेवाडी, अवसरी बुद्रुक, टाव्हरेवाडी, मेंगडेवाडी, जारकरवाडी, पारगाव, लाखणगाव, देवगाव व खडकवाडी, लोणी, धामणी परिसरात रब्बी हंगामासाठी बटाटा लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. बटाटा पीक नगदी पीक म्हणूनही पाहिले जाते. बटाटा पीक घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च येतो. बटाटा काढणीला नुकतीच सुरुवात झाली आहे. काठापुर बुद्रुक येथील शेतकरी किसन जनाजी करंडे या शेतकऱ्याने दिड एकर क्षेत्रात २० पिशवी बटाटा बियाण्याची लागवड केली होती. बटाटा बियाणांच्या एका कट्ट्यापासून १५ ते १६ पिशवी गळीत निघत आहे. दीड एकर क्षेत्रावर ३१० पिशवी बटाटा उत्पादन निघाले. एका पिशवीचे ५० ते ५५ किलो वजन भरत आहे. करंडे यांच्या बटाट्याला पुणे मार्केट मधे प्रति दहा किलोला २३० रुपये बाजारभाव मिळाला आहे. दिड एकारात ६२ हजार उत्पादन खर्च वजा जाता किसन करंडे यांना ३ लाख रुपये असा चांगला नफा झाला.

बटाट्याचे पीक घेत असताना, लागवडीपूर्वी नांगरट करून प्रती एकरी दोन ट्रॉली कोंबड खत, शेणखत टाकून सरी पद्धतीने बटाटा लागवड केली. दीड एकरसाठी त्यांना बटाटा बियाण्याचे २० कट्टे लागले. एक कट्टा ५० किलोचा असतो. बटाटा बियाणांच्या प्रतिक्विंटल ३६०० रुपये या बाजारभावाने मिळाले. औषधाच्या चार फवारण्या केल्या. लागवडीनंतर ९० दिवसाने बटाटा काढणीला सुरुवात झाली. सध्या चांगले उत्पादन व बाजारभाव मिळत असल्याने बटाटा उत्पादक शेतकरी समाधानी आहेत, असे बाबाजी करंडे यांनी सांगितले.

#रा

## Selected

### वळतीत डॉ. आंबेडकर यांना अभिवादन



**रांजणी :** वळती (ता. आंबेगाव ) भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन वळतीचे सरपंच आनंद वाव्हळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अर्जुन अजाब, निलेश भोर, बाबाजी भोर, सुषमा भालेराव, गोपीनाथ भोर, संतोष लोंढे, हनुमंत बेनके, बाळु गायकवाड, पंढरीनाथ शिंदे, नवनाथ अजाब आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

### लग्नातील अनावश्यक खर्च टाळून अनाथालयाला आर्थिक मदत



**रांजणी:** लग्न समारंभात आहेर, मानपानाच्या अनावश्यक खर्च टाळून ती रक्कम अनाथालयाच्या आश्रमाच्या बांधकामासाठी सुपूर्द करून पारगाव (ता. आंबेगाव ) येथिल पोंदे कुटुंबियांनी समाजात आदर्श घालून दिला आहे. पोंदे कुटूंबियांचे सर्व स्तरांतून कौतूक होत आहे. पारगाव मधिल भागचंद पोंदे यांच्या मुलीचा विवाह शुक्रवारी पार पडला. त्यांनी लग्नातील मानपान, आहेराचा अनावश्यक खर्च टाळून जुन्नर तालुक्यातील मंगरुळ (पारगाव ) येथिल अनाथालयाच्या आश्रमाच्या बांधकामासाठी ११ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. मंचर येथील अनुसया महिला उन्नती केंद्राच्या अध्यक्षा किरणताई दिलीप वळसे पाटील व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांच्या हस्ते अनाथालयाचे संस्थापक सचिन भोजणे यांनी मदत स्विकारली. यावेळी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे, भीमाशंकर साखर कारखान्याचे संचालक रामहरी पोंदे, मुक्ताबाई पायी दिंडी साहळ्याचे अध्यक्ष भागचंद पोंदे, शिवाजीराव ढोबळे, रामचंद्र ढोबळे, बाबासाहेब खालकर, प्रिया बाणखिले, प्रज्ञा कुलकर्णी, रोहिदास भागवत, रामकृष्ण पोंदे, स्वप्नील पोंदे, आदर्श पोंदे यांच्यासह अनाथालयातील मुले उपस्थित होते.

### निरगुडसर विद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा.



**लोणी- धामणी :** निरगुडसर (ता.आंबेगाव ) येथे पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य कांताराम टाव्हरे, पर्यवेक्षक संतोष वळसे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### दिव्यांगांना पाहून कामात उत्साह येतो



**शिक्रापूर :** दिव्यांग व्यक्तींचे कष्ट व दिव्यांग व्यक्तींचा संघर्ष पाहून कामामध्ये उत्साह व शक्ती येत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका लुसि कुरियन यांनी केले आहे. वढू बुद्रुक येथील माहेर संस्थेत दिव्यांग सप्ताह निमित्त दिव्यांग मेळावाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना माहेर संस्थेच्या संस्थापिका ज्येष्ठ समाजसेविका लुसि कुरियन बोलत होत्या. संस्थेच्या अध्यक्षा हिराबेगम मुल्ला, व्यवस्थापक रमेश दुतोंडे, विजय तवर, प्रहार संघटना शिरुर तालुकाध्यक्ष ज्योती हिवरे, खेड तालुकाध्यक्ष जीवन बळवंत टोपे, डॉ. सुधाकर मोरे, पोलीस पाटील जयसिंग भंडारे, सामाजिक कार्यकर्ते ताराचंद खंडागळे, तेजस्विनी पवार, नेहा पोहेकर, प्रशांत गायकवाड, स्वाती पाटील, समीक्षा मूळे, अंजना पवार, प्रसेंजीत गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश दुतोंडे यांनी केले, तर प्रास्ताविक सुमित इंगळे यांनी केले आणि सुशील पोहेकर यांनी आभार मानले.


१) 'ऑल दॅट कुड हॅव बीन' या पुस्तकाचे लेखक कोण?
२) भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये विद्यार्थ्यांची देवाणघेवाण वाढवण्यासाठी नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या योजनेचे नाव काय?
३) आरोग्य अदालत योजना सुरू करणारे भारतातील पहिले राज्य कोणते?
४) गुजरातमधील गीर अभयारण्यानंतर कोणते अभयारण्य आशियायी सिंहांसाठी तयार केले जाणार आहे?
५) पाँगाँग हा भारत आणि कोणत्या देशामधील वादग्रस्त भूमाग आहे?

## वाढवा जीके

उत्तर – १) महेश भट्ट. २) न्यू कॉलंबो प्लॅन. ३) कर्नाटक. ४) कुनो पालपूर, मध्य प्रदेश. ५) चीन.

## मोलाचे विचार

कोणाला काही शिकवणे मला शक्य नाही, पण त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे मला शक्य आहे.
– सॉक्रेटिस



## फॅशनविश्व

# मोबाईल पाऊचची दुनिया

कोणत्याही अडचणीच्यावेळी मोबाईल धावून येणारा चांगला मित्र, सखाच झालाय. पण या मोबाईलला ठेवण्यासाठी खिसा, सॅक किंवा पर्समधील कप्पा योग्य असला तरी मोबाईल पाऊच मात्र वेगळाच लूक देऊन जातो.

वेगवेगळ्या रंगात आणि आकर्षक डिझाईनने सजवलेला मोबाईल पाऊच बाजारात मिळतो. बाईकवरुन जाताना मुलांना खिशात मोबाईल ठेवून कानामध्ये इयरफोन घालून मस्त सैर करता येते. परंतु मुलींना जरा हा प्रॉब्लेमच पडतो. मग यासाठी गळ्यामध्ये अडकवता येईल असा लेसचा पाऊच उपयोगी पडतो. हे पाऊच आता एक फॅशन ॲक्सेसरीज ठरले आहेत. बहुतेकवेळा हे पाऊच जाड



कापडाचेच असतात. सॅटिन, कॉटन किंवा ज्यूटचे पाऊच छान दिसतात. त्यावर आता भरजरी एम्ब्रॉडरी, पॅचवर्क, जरदोशी वर्क केले जाते. कार्टून्सच्या आकाराचे पाऊचही मुलींची पसंती वाढवत आहे. कॉलेज स्टुडंटस किंवा नोकरी करणाऱ्या तरुणींमध्येसुद्धा या कार्टूनच्या पाऊचची मागणी वाढली आहे. कॉलेजमध्ये किंवा ऑफिसमध्ये काही फंक्शन असेल आणि साडी परिधान केली असेल तर साडीवर वापरण्यासाठी खास कमरेला अडकवण्यासाठी हूक असणारे पाऊस मिळतात. हे पाऊच तर वेगवेगळ्या रंगात मिळतात आणि तुम्हाला स्टाईलिशही बनवून टाकतात. काही वेळा तर याच पाऊचला की चेनची सोयदेखील असते. स्त्रियांसाठीच्या मोबाईल पाऊचमध्ये लेदरचे प्रकार विरळेच. कापडी पाऊच हातात धरण्यासाठी सोपे ठरतात. अलीकडे तर बटणाच्या आकाराचे पाऊचही उपलब्ध आहेत. आपला स्टायलिश फोन ज्यात ठेवायचा तो पाऊचही स्टायलिश असायला हवा, असा प्रत्येकाचा हट्ट असतोच. त्यामुळे व्यक्तिमत्व आणखीन खुलून तर दिसतेच पण मोबाईल वापरताना गैरसोय मात्र होत नाही अन् तुमचा मोबाईल सुरक्षितही राहातो.

# ट्रेंड प्रिंटेंड पँटचा

एखादी फॅशन बाजारात आली की त्याच फॅशनची क्रेझ सर्वत्र दिसून येते. खरे तर आज काल कॉलेज कँपस असो किंवा नोकरी करणाऱ्या महिला, मुली कोणतीही फॅशन लगेच फॉलो करतात. आवडीने त्यामध्ये थोडा बदल करुन नवीन लूक देतात. प्रत्येकजण आपआपल्या स्टाईलनुसार स्वत:ला नवीन लुक द्यायचा प्रयत्न करतात. नवीन फॅशन जन्माला घालतात. आता पँटचेच उदाहरण घ्या. पँटमध्ये जीन्स पँट किंवा फॉर्मल असे दोन प्रकार असतात.अगदीच म्हटले तर रंगात इकडे तिकडे फरक असतात.



पण आता मात्र प्रिंटेंड पँटने बाजारात प्रवेश केला आणि सर्वांनाच नाविन्याचा नवा नवा प्रकार पहायला आणि अनुभवायला मिळू लागला. आता प्रिंटेड पँट त्यावर साजेसा प्लेन टॉप आणि जॅकेट असा पोशाखा युज करायची क्रेझ दिसून येते. मात्र हीपँट स्कीनला थोडी फिट असते. त्यामध्ये पांढऱ्या, निळ्या, हिरव्या पँटवर पिवळी, गुलाबी अशी विविधरंगी फुले आढळतात.

ज्या मुलींना जीन्स घालणे आवडत नाही,अशा मुलींना हा वेगळा पर्याय आहे. ही पँट थोडी फिट असल्यामुळे लाँग टॉप घातला तर काही ऑड दिसत नाही. त्यात तब्येतीने जाडमुलांनाही हा पोशाखा सुंदर लूक देऊन जातो. सहलीच्या ठिकाणी किंवा घरच्यांबरोबर वन डे ट्रिपसाठी जात असताना ही पँट म्हणजे कंफर्टेबल पोशाख वाटेल.पण काहीजणी याचा वापर कॉलेज, बाजारात किंवा घरी वापरण्यासाठीच करतात. याची किंमत ३५० पासून ५०० रुपयांपर्यंत आहे. या पँटवर तुम्हाला इनर जॅकेट घालायचे नसेल तर शॉर्ट फॉर्मल शर्टही घालू शकता. पण यासाटी तुमचा बांधा शिडशिडीत असायला हवा.

या पँटमध्ये अजून एक पर्याय आहे. तो म्हणजे लेगिग्ज. लेगिंग्ज ही इलेस्टीक किंवा जीन्ससारखी असते.ती डेली युजसाठी एकदम हलकी असते.या लेगिग्जंच्या खिशाला किंवा पायाला खाली चेन असते. आजच्या तरुणाईसाठी ही जरा हटके फॅशनच ठरेल.

# क्लाउड कॉम्प्युटिंगमधील करिअरसंधी

**क्लाउड कॉम्प्युटिंगचे क्षेत्र युवकांसाठी एक सुवर्णसंधी ठरत आहे. परंतु काही वर्षांपूर्वी मात्र या क्षेत्रावर मंदीचे सावट होते. यासाठी अनेक कारणे सांगता येतील जसे की डॉलरच्या तुलनेत घसरत जाणारी रुपयाची किंमत यामुळे देखील हे क्षेत्र कमकुवत झाले. परंतु, २०१४ मध्ये या क्षेत्रात काही सुधारणा झाल्या. नेटवर्किंग इंन्फ्रास्ट्रक्चर बाजाराच्या दरवषीच्या कारभारात २०% इतकी प्रगती झाली. ज्यामुळे या क्षेत्राला पुन्हा सुगीचे दिवस आले. पुढील पाच वर्षांत प्रत्येकी बावीस टक्क्यांची वाढ होण्याचा अंदाज आहे. याबाबीकडे देशातील आयटी कंपन्यांचे लक्ष लागून राहीले आहे. मायक्रोसॉफ्ट सारख्या कंपन्यांना यामुळे बरीच आशा वाटते आहे. या कंपनीच्या म्हणण्यानुसार पुढील काही वर्षात या क्षेत्रामध्ये वीस लाख संधी निर्माण होतील.**



### काय आहे क्लाउडिंग कॉम्प्युटिंग?

क्लाउडिंग कॉम्प्युटिंगच्या बाबतीत लोकांमध्ये बरेच गैरसमज आहेत. म्हणूनच ही संकल्पना काय आहे ते समजून घेणे गरजेचे आहे. इंटरनेटवर आधारित एक कॉम्प्युटिंग पॉवर आहे, ज्याचे केंद्र क्लाउड असते. ढगांप्रमाणे असणाऱ्या जटिल संरचनेमुळे याचे नाव क्लाउडिंग कॉम्प्युटिंग पडले आहे. यूजर्स, डाटा इत्यादी प्रोग्रॅम सर्व्हरवर स्टोअर झालेला असतो ज्याला क्लाउड म्हणतात. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीनंतर क्लाउडिंग कॉम्प्युटिंग चा वापर मोठ्या प्रमाणात होतो आहे. आता कंपन्या आपआपल्या सोयीनुसार हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर बनवून घेत आहेत. समजा एखाद्याला सहा महिन्यांसाठी सर्वर, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरची गरज आहे. या साऱ्या गोष्टींसाठी किमान लाखभर रुपये तरी खर्च होतात. पण, क्लाउड कॉम्प्युटिंग वापरल्याने कमी खर्चामध्ये आणि ठराविक अवधीमध्ये या सुविधा चटकन मिळू शकतात.

### संधी आहेत उदंड

क्लाउड कॉंप्युटिंगसोबत बिग डाटा आणि डाटा ॲनॅलिसिसमध्येही करिअर बनू शकते. बिग डाटा संकल्पनेत मोठमोठ्या कंपन्यांचा डाटा सुरक्षित ठेवणे आणि त्यांचे ॲनॅलिसिस करणे याचा समावेश असतो. भविष्यात बिजनेस फोरकास्टिंगसाठी देखील बिग डाटा आणि डाटा ॲनॅलिसिसची गरज भासू शकते. क्लाउड कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रात क्लाउड आर्किटेक्ट, क्लाउड सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर, क्लाउड प्रॉडक्ट मॅनेजर अशा विविध संधी मिळू शकतात. अर्थातच यासाठी अद्यायावत राहणे आणि नवनव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

### सरकारी धोरणांमुळे रोजगारसंधी वाढणार

केंद्र सरकारने सध्या डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी, ई–गव्हर्नन्ससारख्या योजना हाती घेतल्या आहेत. ग्रामीण भागामध्ये डिजिटल इंन्फ्रास्ट्रक्चर उभारण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे आगामी काळात रोजगाराच्या संधी निश्चितच वाढणार आहेत. इतकेच नाही तर सरकारच्या या योजनेमध्ये विदेशी कंपन्या देखील रस घेत आहेत. मायक्रोसॉफ्ट आणि आयबीएमसारख्या विदेशी कंपन्या आणि टीसीएस, विप्रो, इन्फोसिससारख्या कंपन्यादेखील यामध्ये सक्रिय होत आहेत. एका सर्व्हेनुसार देशातील मध्यम आणि छोट्या स्वरुपाच्या ९० टक्के कंपन्या या क्लाउड कंपन्यांचा स्वीकार करत आहेत. सरकार स्टार्टअप कंपन्याना सवलत देत आहे त्यामुळे या कंपन्यादेखील क्लाउड कंपन्यांचा स्विकार करतील. या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी कॉँप्युटर सायन्स आणि आयटी क्षेत्रातील डिग्री आवश्यक आहे. या व्यतिरिक्त क्लाउड कॉम्प्युटिंगशी संबंधित सर्टिफिकेट कोर्स करण्याचा फायदा होऊ शकतो. यासाठी आयबीएम, एनआयआयटी, ॲपटेक यांची मदत घेता येईल. क्लाउड कॉम्प्युटिंगशी संबंधित काही टॉप प्रोग्रॅम आहेत. यामध्ये क्लाउड कॉम्प्युटिंग आर्किटेक्चर, आयबीएम सर्टिफाइड सोल्युशन ॲडवायजर, आयबीएम सर्टिफाइड आर्किटेक्ट, क्लाउड कॉम्प्युटिंग इन्फ्रास्ट्रक्चर, सर्टिफाइड क्लाउड प्रोफेशनल्स इत्यादींचा समावेश होतो.

**पगार :** या क्षेत्रात एंट्री लेवलवरच चार ते सहा लाख रुपये दरवर्षी मिळू शकतात. अन्य क्षेत्रांच्या तुलनेत हे क्षेत्र नवे आहे. यामुळे या क्षेत्रात ट्रेंड प्रोफेशनल्सची आवश्यकता फार आहे. कदाचित म्हणूनच अन्य इंजिनिअरिंगच्या क्षेत्रापेक्षा या क्षेत्रामध्ये मिळणारे पॅकेज जास्त आहे. आयटी क्षेत्राशी संबंधित असल्याने परदेशात देखील पगाराचे चांगले पॅकेज मिळते. या क्षेत्रातील अनुभव जसजसा वाढत जाईल तसतसे वेतन वाढत जाते.

# ताणतणावातून जाताना...



एका मराठी गाण्यामध्ये सोळावं वरीस धोक्याचं असं म्हटलं आहे. त्या काळात सोळा वर्षाच्या तरुणाईला सांभाळण्यासाठी पुढील धोके ओळखून पावले जपून टाकण्यासाठी हा संदेश देणारे हे गाणे होतं.

पण आता सोळाच काय शाळा, कॉलेजपासून ते नुकतीच कुठेतरी जॉब जॉईन केल्यानंतरही ताणतणावाला सामोरे जावे लागते. त्यात हल्ली टी.व्ही. मोबाईल, कंप्युटरचा सगळीकडे वावर दिसतोय.इंटरनेटमुळे जग जवळ आले. विविध देशातील संस्कृती,लाईफस्टाईल लगेच समजू लागते. मग तरुणाईला त्याचे अनुकरण करावे वाटू लागते. यातूनच मग ग्रुपीझम, वादविवाद, रॅगिंगचे पडसाद उमटू लागते. सगळीकडे माझेच साम्राज्य. कुणाचेही ऐकून न घेण्याची मानसिकता होते. मग खून, मारामाऱ्याचे सत्र सुरु होते. स्पर्धा न पेलवणारी असेल तर मग नैराश्य येते. कधी कधी याला एकतर्फी प्रेमाची किनार लाभते. यामध्ये एकलकोंडेपणा वाढतो. कुणाशीही न बोलण्याची सवयच लागून राहाते.

पण अशा ताणतणावातून जाताना तरुण किंवा तरुणींनी वेळीच आई बाबांशी बोलायला हवे. मनातील सर्व किंतु परंतु बोलून मोकळे व्हायला हवे. काही किरकोळ समस्यांच्या गर्तेत बुडण्यापेक्षा आपले आयुष्य किती महत्त्वाचे आहे, हे आधी समजून घेतले पाहिजे. जगामध्ये प्रत्येक प्रश्नाला उत्तर आहे, त्याचा शोध घ्यायला शिकले पाहिजे. साम्राज्य तुमचेच निर्माण करा. पण त्यासाठी जीवघेणा शॉर्टकटही नको आणि जीव देण्याचा वेडेपणाही नको. कारण अशा नैराश्येतून आत्महत्येची मालिकाच सुरु होते. कोल्हापुरात मागे मित्रह्मैत्रिणी टोमणे मारतात म्हणून एका मुलीने आत्महत्या केली होती. तिला कॉलेजमधील ग्रुपीझमला तोंड देताच येत नसेल तर तिने सरळ कॉलेज बदलणे किंवा ॲंटीरॅगिंगकडे तक्रार करणे. आई वडील, मैत्रिणींशी विश्वासाने बोलणे या गोष्टी करायला हव्या होत्या. पण मृत्यूला कवटाळणे म्हणजे समस्येला सामोरे जाण्याची हिंमत नसणे असाच याचा अर्थ होतो. परंतु यासाठी पालकांनीही आपल्या मुलांकडे वेळीच लक्ष दिले पाहिजे. मुले ताणतणावात असतील तर नोकरी, व्यवसायापेक्षा मुलांच्या भावनांना वेळ देऊन त्यातून बाहेर काढायचा प्रयत्न करायला हवा. तरच ताणतणावातून जाताना आजची तरुणाई धीटाईने आणि सकारात्मकतेने तोंड देईल.

# नियोजन अभ्यासाचे

▶ पहाटे उठून अभ्यास करा.
▶ पहाटे उठल्यानंतर झोप जात नाही. त्यामुळे परीक्षा जवळ आली असेल तर थोडा दहा मिनिटाचा वॉक घ्या.
▶ थंडी किंवा इतरवेळा पहाटे दहा मिनिटे चालल्यामुळे शरीरात उर्जा निर्माण होईल. घरी आल्यावर चहा घेऊन अभ्यासासाठी तुमचे मन तयार होईल.
▶ पाच मिनिटे मेडिटेशन करा. त्यामुळे सकारात्मक भावना वाढीस लागेल. मन एकाग्र होण्यास मदत होईल.
▶ आहारात फळभाज्या, पालेभाज्या, सॅलड, सूपचा वापर करा.
▶ या काळात ताणतणावातून गेल्यामुळे शरीरावरही ताण आलेला असतो. अशक्तपणा येण्याची शक्यता दाट असते. दोन ते चार दिवसातून नारळ पाणी घ्या.
▶ पहाटेपासून साधारण दहापर्यंत अभ्यासाला वेळ द्या. या काळात एकाग्रतेने अभ्यास करा.
▶ या काळात तुम्हाला येणाऱ्या अडचणींवर सोल्यूशनसाठी प्राध्यापक किंवा ट्युशनमधील प्राध्यापकांना भेटा. शंकरांचे निरसन करा. प्रश्न सुटल्यावरच थांबा.
▶ दिवसभरच्या अभ्यासाने थोडा ताण आल्यासारखे वाटले तर संध्याकाळी बागेत फिरा. टेरेसवर फिरा. मित्रांबरोबर गप्पा मारा. टी. व्ही. पहा. यासाठी ठराविक वेळेचे नियोजन करा.
▶ क्रिकेट, फुटबॉल, टेनिसची आवड असल्यास संध्याकाळच्या वेळी तासभर हे खेळ खेळा. अभ्यासाचा कंटाळा निघून जाईल. पुन्हा ताजेतवाने होऊन अभ्यास कराल.



▶ रात्री झोपताना गरम दूध घ्या. रात्री जागरण न करता लवकर झोप घ्या. म्हणजे पहाटे लवकर जाग येईल.
▶ एखादा मित्र/मैत्रिण डिप्रेशनमध्ये असेल तर त्याला बरोबर घेऊन अभ्यास करा. त्याच्यामध्ये/तिच्यामध्ये सकारात्मक विचार रुजवा. डिप्रेशनमधून बाहेर काढा.

# टिकवा नात्यातील ओलावा

**सुखी वौवाहिक आयुष्यासाठी परस्परांमधील प्रेमासोबतच एकमेकांचा आदर करणे आणि विश्वास जपणे या बाबी देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत. आपल्या नात्यामध्ये या गोष्टी जपणे हे तुमच्यावरच अवलंबून आहे. नात्यातील आदर, प्रेम आणि विश्वास कमी होत आहे असे जाणवल्यास वेळीच आत्मपरीक्षण करा. तसेच नातेसंबंधांबाबतचे 'डूज अँड डोण्टस्'ही लक्षात घ्या.**



अधिकार गाजवू नका : कुटुंबामधील ताणतणाव वाढत असताना, नातेसंबंध जपत, एकमेकांचे सूर जूळवून घेणे गरचेजे आहे. बरेचदा पती किंवा पत्नी यापैकी एखादी व्यक्ती वर्चस्व गाजवणारी असते. अशा वेळी नात्यातील प्रेम आणि आदरच नव्हे तर हे नाते दीर्घकाळ टिकून राहण्याची शक्यतादेखील कमी होते. म्हणूनच कधीही जोडीदारावर अधिकार अथवा हुकुमत गाजवण्याचा प्रयत्न करू नका. दोघांच्याही विचारांना सारखेच महत्त्व दिले गेले पाहिजे. सतत एकाने दुसऱ्यावर हुकुमत गाजवत राहिल्यास नात्यातील आदराची भावना पूर्णपणे नाहीशी होऊ शकते.

आदर जपा : आपल्या जोडीदाराकडून आदराची अपेक्षा ठेवत असाल तर तिच्या भावनांचाही आदर राखा. तसेच पत्नीच्या माहेरच्या कुटुंबातील सदस्यांचाही आदर करा. एखाद्या मुद्यावरून आपल्या जोडीदाराला काही सांगायचे असेल तर तक्रारीचा सूर लावू नका. तसेच अपशब्दांचा वापर टाळा. गिव्ह रिसपेक्ट ॲण्ड टेक रिसपेक्ट हा फॉम्यूला नात्यांची वीण घट्ट करण्यास फायदेशीर ठरतो.

त्यांचेही ऐका : ज्या लोकांना सतत फक्त वटवट करण्याची सवय असते त्यांना फारसा आदर मिळत नाही. तसेच त्यांच्या विचारांना कोणी महत्त्वही देत नाही. म्हणून सतत आपलेच गाऱ्हाणे ऐकवण्याऐवजी जोडीदाराचे म्हणणेही ऐका. त्यातून तुमच्याही प्रश्नांची उत्तरे आपसुकच सापडतील. तसेच सुसंवाद निर्माण होऊन सहजीवनाचे नाते दृढ होण्यास सहाय्यभूत ठरेल.

करा काही खास : प्रत्येक जणच हल्ली रुटीन लाईफला कंटाळलेला असतो. अशा वेळी वेगळं काही तरी केल्यास त्याची नक्कीच प्रशंसा केली जाते. वैवाहिक नात्यामध्येही ही बाब लागू पडते. तुमच्या जोडीदारासाठी, त्यांच्या घरच्या व्यक्तींसाठी एखादी खास गोष्ट केल्यास त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. तुम्ही जोडीदारावर किती प्रेम करता याची खात्री पटण्यास अशा गोष्टी मदत करतात. साहजिकच त्यामुळे परस्परांचे प्रेम वाढण्यास मदत होते.

दोष स्वीकारा : जगात कोणतीच व्यक्ती परिपूर्ण असू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही कमतरता असतेच. हे लक्षात न घेता सतत जोडीदाराच्या दोषावरच लक्ष केंद्रित केल्यास त्यातून नातेसंबंधांमध्ये प्रेम कधीच निर्माण होणार नाही. जोडीदाराच्या गुणांसह तिचे दोष देखील स्वीकारा. यामुळे तिच्या मनातील तुमच्या बद्दलचा आदर आपसूकच द्विगुणित होईल.

## दोस्ती इंग्रजीशी

machine : अर्थ : यंत्र, मशीन
There are big machines in a factory.
कारखान्यात मोठमोठी यंत्रे असतात.

back : अर्थ : परत.
Go back to your classroom.
तुमच्या वर्गात परत जा.

factory : अर्थ : कारखाना
My father works in a sugar factory.
माझे बाबा साखर कारखान्यात काम करतात.

rabbit : अर्थ : ससा
A rabbit is soft and white.
ससा पांढरा आणि मऊमऊ असतो.

## हसरा कोपरा



दोन माणसं भांडत होती आणि हातातल्या काठीने एकमेकांची डोकी फोडत होती. इतक्यात एकजण जवळ आला आणि दोघांच्या हातात एक एक कागदाचा तुकडा देवून गेला. दोघांनी तो वाचला. कागदावर लिहिलं होतं, 'मलमपट्टीसाठी माझ्या दवाखान्यात या. हाकेच्या अंतरावर आहे. दोघे आल्यावर स्वस्तात करून देईन.



कपिल देव यांनी मला स्पष्ट सांगितले आहे, की कांबळी जर उपचार करणार असेल तर आम्ही त्याला आर्थिक मदत करण्यास इच्छुक आहोत. त्याने उपचार घेतल्यास आम्ही त्याचे खर्च उचलण्यास तयार आहोत."

— बलविंदर सिंग संधू

जेव्हा मी या भारतीय संघाकडे पहातो तेव्हा मला त्यात अनेक सुपरस्टार खेळाडू दिसून येतात, पण क्रिकेट हा सांघिक खेळ आहे आणि त्यात विजय मिळवण्यासाठी सर्वांकडून योगदान मिळणे महत्वाचे असते.

— नॅथन लायन



## टीम इंडियाचा पहिला डाव १८० धावांवर आटोपला
# पहिला दिवस ऑस्ट्रेलियाच्या नावावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**ॲडिलेड :** ॲडिलेडवरील खेळपट्टी गोलंदाजांना फायदेशी ठरेल असे सांगितले जात होते आणि तसेच झाले. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, पण गुलाबी चेंडूच्या गोलंदाजीवर भारतीय फलंदाजी गंडली. नितीश कुमार रेड्डीने फटेबाजी करून धावा जमा करण्याचा प्रयत्न केला. पण शेवटी मिचेल स्टार्क आजच्या दिवसाचा हिरो ठरला. त्याला भारताचे ६ फलंदाज तंबूत पाठवण्यात यश आले. ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी मात्र घरच्या मैदानावरील अनुभवाचा फायदा उचलत फलंदाजीमध्ये चांगली लय पकडली.

भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल फलंदाजीला येताच तंबूत परतला. मिचेल स्टार्कने त्याला पहिल्याच चेंडूवर पायचीत केले. त्यानंतर शुभमन गिल आणि केएल राहूलच्या जोडीने चांगली लय पकडली होती. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ६८ धावांची भागिदारी केली. पण २ वेळा जीवदान मिळालेला केएल राहुल ३७ धावांवर झेलबाद झाला. गिलने ५१ चेंडूत ३१ धावा केल्या, तर ऋषभ पंतने २१ धावांचे योगदान दिले.

रोहित शर्मा खूप वर्षांनी मधल्या फळीत फलंदाजीला आला पण तो अवघ्या ३ धावा करू शकला. त्यानंतर नितीश कुमार रेड्डी व आर अश्विनने डाव सावरण्याचा प्रयत्न केला.

पण त्यांची भागिदारी फार काळ टिकली नाही. अश्विन २२ धावांवर माघारी परतला. त्यानंतर नितीश कुमारने फटकेबाजी करत भारतचा डाव १८० पर्यंत घेऊन गेला. नितीशने ३ चौकार व ३ षटकारांच्या जोडीने ४२ धावांची खेळी केली.

प्रत्युत्तरात उतरलेले ऑस्ट्रेलियन फलंदाज सावधणे फलंदाजी करताना पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियाने पहिली विकेट २४ धावांवर गमावली, उस्मान ख्वाजा १३ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर नेथन मॅकस्विनी आणि मार्नस लाबुशेनने दिवसाअंतीपर्यंत संथ खेळी करत ७४ धावांची भागीदारी केली. सध्या नेथन मॅकस्विनी ३८ व मार्नस लाबुशेन २० धावांवर नाबाद आहे.

# विराग क्रिकेट संघाचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत ब गटात विराग क्रिकेट अकादमी संघाने तीन विजयासह उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात शावेज पठाण ४६ धावा व ३-१२) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर क्रीक फायटर्स संघाने चोंधे पाटील क्रिकेट अकादमी संघाचा १७४ धावांनी विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात शाश्वत सिंग(४-३३) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर विराग क्रिकेट अकादमी संघाने ऑल स्टार्स संघाचा ५ गडी राखून पराभव केला.

अन्य लढतीत सोहेल शेख(३-०) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर अचिव्हर्स क्रिकेट अकादमी संघाने प्राधिकरण जिमखाना संघाचा १३१ धावांनी पराभव केला.



# आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूल चमकले



**पुणे :** सूस येथील ध्रुव ग्लोबल स्कूलने नुकत्याच संपन्न झालेल्या मुळशी तालुकाच्या जिल्हा परिषद आंतर शालेय विभागीय स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक जिंकले. यामध्ये वेगवेगळ्या शाळांमधील खेळाडूंनी उभ्या केलेल्या तगड्या स्पर्धेच्या दरम्यान ध्रुव ग्लोबल स्कूलने विविध वयोगटांमध्ये पदके मिळवून एक उत्तम खेळाडू म्हणून उदयास आले आहे. अपवादात्मक कौशल्य आणि दृढनिश्चियाचे प्रदर्शन करताना, ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आयोजित बॅडमिंटन स्पर्धेत विजय मिळवला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात देव वीरमणी, शौर्य पाल, मंदार कोल्हटकर, रणवीर माने आणि नैतिक जैन यांनी चतुराई व शक्तीचे मनमोहक प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्याला पराभूत करून सुवर्णपदक मिळवले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात साईश भुरके, ऋषील कौल, आदित्य दहाड, वीरेन घोडके, श्रीकर वेलनाटी यांनी त्यांच्या वरिष्ठांचे कौशल्य आणि स्वभाव या दोन्ही गोष्टींचे अनुकरण करून तृतीय क्रमांक पटकावत कांस्य पदक जिंकले. त्याच प्रमाणे १९ वर्षाखालील मुलींच्या गटात आहाना पवार, कांचन सिंग, अवंती किर्लोस्कर, रिचा कर्नावट या सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या.

# पूना क्लब, २२ यार्डस् ॲकॅडमी संघांची विजयी कामगिरी !



**पुणे :** कनि क्रिडा ॲकॅडमी तर्फे आयोजित 'चॅम्पियन क्रिकेट लीग' १९ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत २२ यार्डस् ॲकॅडमी आणि व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली. हडपसर येथील चॅम्पियन्स् फिल्ड् मैदान आणि सिंहगड रोड येथील व्हीजन क्रिकेट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत हर्षल मिश्रा याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुना क्लबने मोहन जाधव ॲकॅडमीचा ३ गडी राखून पराभव केला. ५५० हून अधिक धावसंख्येच्या झालेल्या या सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना मोहन जाधव ॲकॅडमीने २२७ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये शिवम शिंदे याने ११२ धावांची खेळी केली. या धावसंख्येचा पाठलाग करताना पुना क्लबने ३४ षटकात लक्ष्य पूर्ण केले. हर्षल मिश्रा याने ८७ धावांची स्फोटक खेळी केली.

# पुणे क्रिकेट, एमईएस क्रिकेट, स्केलअप संघ बाद फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** ग्रेसिया क्रिकेट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'ग्रेसिया करंडक' २०२४ खुली आंतर-क्लब टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत पुणे क्रिकेट क्लब, एमईएस क्रिकेट क्लब आणि स्केलअप ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आपापल्या गटातून बाद फेरीत प्रवेश केला.

मुंढवा येथील लिजंड्स स्पोटर्स क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत चंद्रकांत सरोज याने केलेल्या अष्टपैलु कामगिरीच्या जोरावर पुणे क्रिकेट क्लबने श्री गणेश संघाचा ५ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या श्री गणेश क्लबचा डाव १६१ धावांवर रोखण्यात आला. हे लक्ष्य पुणे क्रिकेट क्लबने १८ षटकात पूर्ण केले. मितेश सांगत (६१ धावा) आणि चंद्रकांत सरोज (५४ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला.

सागर होगाडे याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे एमईएस संघाने मॅव्हरीक्स् बॉईजाचा ९ गडी राखून सहज पराभव केला. मॅव्हरीक्स् बॉईज संघाने पहिल्यांदा खेळताना १३६ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये (सुरज शिंदे याने ५१ धावांची खेळी केली. सागर होगाडे याने १० धावांमध्ये ४ गडी टिपले. एमईएस क्रिकेट क्लबने १५ षटकात हे लक्ष्य गाठले. जय पांडे याने नाबाद ६९ धावांची तर, सुजीत उबाळे याने नाबाद ४८ धावांची खेळी केली. अदवय सिधये याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे स्केलअप ॲकॅडमी अ संघाने मॅव्हरीक्स् बॉईजाा १४ धावांनी पराभव केला.

## सहअध्यक्षपदी ज्येष्ठ क्रीडा संघटक रूपचंद नेगी यांची नियुक्ती




**पुणे :** ज्येष्ठ क्रीडा संघटक रूपचंद नेगी यांची आगामी पाचव्या खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा २०२५ च्या तांत्रिक समितीच्या सहअध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय ऑलिम्पिक महासंघाने ही नियुक्ती केली आहे. ही स्पर्धा जानेवारीमध्ये जम्मू काश्मीर मध्ये आयोजित करण्यात येणार आहे येथे होणार आहे.

श्री.नेगी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा यशस्वीरित्या आयोजित केली जाईल असा विश्वास भारतीय ऑलिम्पिक महासंघाच्या अध्यक्षा डॉ. पी.टी. उषा यांनी व्यक्त केला. त्यांच्या या निवडीबद्दल स्की अँड स्नोबोर्ड समितीचे अध्यक्ष शिव केशवन, महाराष्ट्र स्की अँड स्नोबोर्ड संघटनेचे अध्यक्ष अॅड. आनंद लाहोटी, प्रदीप राठोड आणि डॉ. प्रदीप खांडरे यांनी अभिनंदन केले.

# भारताच्या अर्जुन राठी, ऐश्वर्या जाधव यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** १८ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या गटात ऐश्वर्या जाधव हिने तर, मुलांच्या गटात अर्जुन राठी या भारतीय खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

डेक्कन जिमखाना टेनिस कोर्ट,येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉच्या उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात भारताच्या अर्जुन राठी याने सातव्या मानांकित सेहजसिंग पवारचा ६-१, ६-४ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला.

रशियाच्या फेडर अल्तुखोव्हने भारताच्या सहाव्या मानांकित अर्जुन पंडितचा ६-३, ६-४ असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. फ्रांसच्या पाचव्या मानांकित ॲरोन गॅबेट याने दुसऱ्या मानांकित रशियाच्या ॲलन आयउखानोवचा ६-४, ४-६, ६-२ असा संघर्षपूर्ण पराभव करून उपांत्य फेरी गाठली. अमेरिकेच्या विहान रेड्डीने काल अव्वल मानांकित खेळाडूवर सनसनाटी विजय मिळवणाऱ्या भारताच्या समर्थ संहिताचे आव्हान ६-१, ३-६, ६-३ असे संपुष्टात आणले.

मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या अव्वल मानांकित आओई वटनाबीने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत भारताच्या पार्थसारथी मुंढेचा ६-२, ६-२ असा सहज पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारताच्या रिशीता रेड्डी बासिरेड्डीने साई जान्हवीचा ६-०, ५-७, ६-२ असा तीन सेटमध्ये पराभव केला. इराणच्या चौथ्या मानांकित यासमन यझदानीने रशियाच्या नील इवानोव्हाचा ७-५, ६-३ असा कडवा प्रतिकार केला. भारताच्या ऐश्वर्या जाधव हिने नैनिका रेड्डी बेंद्रमवर ७-५, २-० असा विजय मिळवला.

# अभिनवचा एस एस सी विभागाचा वार्षिक क्रीडादिन साजरा



**आंबेगाव :** आंबेगाव येथील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये एस एस सी विभागाचा वार्षिक क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्तरावरील खो खो चॅम्पियन आणि क्रीडा अधिकारी मा. मिलिंद कुरपे उपस्थित होते,यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव जगताप,सेक्रेटरी सुनीता जगताप,सह सेक्रेटरी निर्मोही जगताप, समन्वयक डॉ. सविता शिंदे,प्राचार्या वर्षा शर्मा , प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मनीषा शिंदे , पालक प्रतिनिधी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी .पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रीडा दिनाची सुरवात वेगवेगळ्या क्रीडा प्रकारामध्ये राष्ट्रीय तसेच राज्य स्तरावर विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी क्रीडाज्योतआणून प्रमुख पाहुण्यांना देऊन त्यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून करण्यात आली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ व नेत्रदीपक संचलनातून मान्यवरांना मानवंदना दिली. विनोदकुमार बंगाळे यांनी प्रास्ताविक आणि पाहुण्यांची ओळख करून दिली.यावेळी प्राथमिक,आणि माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांमध्ये विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.प्राथमिक आणि माध्यमिक विभागाने मल्लखांबावरील चित्तथरारक, रोमांचक क्रीडाप्रकाराची प्रात्यक्षिके दाखवली,त्याचबरोबर रिले रेस, मॅरेथॉन, बॉल पासिंग,अडथळा शर्यत, रोप मल्लखांब, इत्यादी क्रीडा प्रकारामधून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. "पुलवामा येथे झालेल्या टेररिस्ट अॅटॅक व सर्जिकल स्ट्राइक" या संकल्पनेवर आधारित अंगावर रोमांच उभा करणाऱ्या उत्कृष्ठ कार्यक्रमाला पालकांनी भरघोस प्रतिसाद दिला.यावेळी क्रीडा प्रकारामध्ये प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला.या वर्षीचा उत्कृष्ट हाऊस म्हणून "यलो हाऊस"ला पाहुण्यांच्या हस्ते करंडक देऊन गौरविण्यात आले. प्राचार्या वर्षा शर्मा यांनी खेळांचे जीवनातील महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरयू जगताप,विराज जाधव याबरोबरच प्रीती लोकरे यांनी केले.आभार हेडबॉय सात्विक सूर्यवंशी याने मानले.क्रीडा विभाग प्रमुख शुभांगी तपासे,यांच्याबरोबरच,वैशाली कांटे,शुभांगी शेलार,प्रशांत शिंदे,राजेंद्र वांजळे,या क्रीडा शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने क्रीडा दिन साजरा करण्यात आला.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

# अर्णव, अर्जुन, ऋषिता, हरिथा यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** डेक्कन जिमखाना यांच्या तर्फे आयोजित व आयटीएफ, महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए)आणि पुणे मेट्रोपोलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए)यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एमएसएलटीए - डेक्कन जिमखाना गद्रे सीफूड्स करंडक आयटीएफ ग्रेड ३ कुमार १८ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मुलांच्या गटात अर्णव पापरकर, अर्जुन राठी यांनी तर, मुलींच्या गटात ऋषिता रेड्डी बासिरेड्डी, हरिथा श्री व्यंकटेश यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

डेक्कन जिमखाना टेनिस कोर्ट,येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या पहिल्या फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित भारताच्या अर्णव पापरकर याने प्रणील शर्माचा ६-२, ४-६, ७-५ असा तीन सेटमध्ये पराभव करून दुसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले.

चुरशीच्या लढतीत भारताच्या अर्जुन राठी याने पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या कझाकस्तानच्या निकेता निकोलेन्कोचा टायब्रेकमध्ये ७-६(४), २-६, ६-३ असा पराभव केला. रशियाच्या फेडर अल्तुखोव याने भारताच्या व्रज गोहिलवर ६-३, ६-३ असा विजय मिळवला. अमेरिकेच्या वेंकट ऋषी बाटलंकीने भारताच्या वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या नील केळकरचा ६-१, ६-१ असा पराभव केला.

फ्रांसच्या पाचव्या मानांकित आरोन गाबेट याने वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या तनुष घिल्डयालचा ५-७, ६-१, ६-२ असा संघर्षपूर्ण पराभव केला. मुलींच्या गटात जपानच्या अव्वल मानांकित आओई वाटनाबी हिने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत भारताच्या श्रीमन्या रेड्डी अनुगोंडाचे आव्हान ६-०, ६-२ असे संपुष्टात आणले. दुसऱ्या मानांकित ऋषिता रेड्डी बासिरेड्डी हिने सोहिनी मोहंतीला ६-३, ६-१ असे नमविले. रशियाच्या नेली इव्हानोव्हाने भारताच्या श्रीनिधी बालाजीवर ६-४, ६-३ असा विजय मिळवला. भारताच्या सातव्या मानांकित हरिथा श्री व्यंकटेशने जपानच्या अझुना इचिओकाचा ६-२, ६-२ असा पराभव करुन दुसरी फेरी गाठली.

# ट्रिनिटी क्रिकेट अकादमी संघाची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** नीलेश भिंताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एन.बी. करंडक २०२४(१७ वर्षाखालील) क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत तन्मय कुलकर्णी (२-३) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर ट्रिनिटी क्रिकेट अकादमी संघाने योगेश इलेव्हन संघाचा ६ गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली..

सनी स्पोर्ट्स, हांडेवाडी व ब्रिलियंट क्रिकेट क्रीडांगणा येवलेवाडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत ट्रिनिटी क्रिकेट अकादमीच्या तन्मय कुलकर्णी(२-३), ओम थोरात(२-१७) यांनी केलेल्या भेदक गोलंदाजी पुढे प्रथम फलंदाजी करताना योगेश इलेव्हन संघाचा डाव २२.३षटकात सर्वबाद ९७धावावर संपुष्टात आला. यात शाश्वत पांड्या २३, अर्णव घाटे २२, सार्थक दमगुडे १७ यांनी थोडासा प्रतिकार केला. हे आव्हान ट्रिनिटी क्रिकेट अकादमी संघाने १०.१ षटकात ४ बाद १०१ धावा करून पूर्ण केले. यात धीर सेठ २७, ध्रुव कामत २१, आर्यन जोशी नाबाद १८ यांनी धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# तिसऱ्या पीसीबीएसएल स्पर्धेत बॉल ब्रेकर्स, जॅग्वार्स, संघवी शुटर्स संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुना क्लब लिमिटेड आयोजित व मनिषा कन्स्ट्रकशन प्रायोजित तिसऱ्या पीसीबीएसएल(पुना क्लब बिलियर्ईस अँड स्नूकर लीग) स्पर्धेत साखळी फेरीत बॉल ब्रेकर्स, जॅग्वार्स, संघवी शुटर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.


पुना क्लब स्नूकर हॉल येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत जॅग्वार्स संघाने मनिषा रॉयल्स संघाचा ४-१ असा सहज पराभव केला. विजयी संघाकडून तुषार आसवानी, राजेश जंदियाल, करनजीत जाधव, राजीव खांडके यांनी अफलातून कामगिरी केली. दुसऱ्या लढतीत संघवी शुटर्स संघाने ओबेरॉय किंग्ज संघाचा ३-२ असा पराभव केला. संघवी शुटर्स संघाकडून अश्रफ परवानी, कपिल पंजाबी, गिरीश दामले यांनी सुरेख खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

अन्य लढतीत आशिष मेहता, विनोद मखिजा, टोनी शेट्टी, अनिकेत संघवी यांनी केलेल्या विजयी कामगिरीच्या जोरावर बॉल ब्रेकर्स संघाने रॉकेट्स संघावर ३-२ असा विजय मिळवत आगेकूच केली.

## राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा - २०२४
# चिन्मय केवलरमानी, प्रणिता महाराष्ट्र संघाचे कर्णधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुरी, ओडिसा येथे ७ ते १० डिसेंबर २०२४ दरम्यान २९वी सिनीअर, ज्युनिअर आणि सब ज्युनीअर राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत सहभागी होणा-या महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी पुरुषांमध्ये पुण्याचा राष्ट्रीय पदक विजेता सायकलपट्टू चिन्मय केवलरमानी आणि महिलांमध्ये अहिल्यानगरची आंतरराष्ट्रीय पदक विजेती सायकलपट्टू प्रणिता सोमन यांची निवड करण्यात आली आहे.



सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे निरीक्षक आणि आंतरराष्ट्रीय पंच सुदाम रोकडे यांच्या अध्यक्षतेखालील सी एफ आय चे उपाध्यक्ष प्रताप जाधव, कॅमचे सचिव प्रा. संजय साठे, धरमेंदर लांबा आणि शिवछत्रपती पारितोषिक सन्मानित मीनाक्षी चौधरी - शिंदे यांच्या समितीने महाराष्ट्राचा २३ पुरुष १९ महिला असा एकूण ४२ सायकलपट्टूंचा संघ निवडला. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीच्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीमती दिपाली पाटील यांनी निमंत्रक म्हणून काम पाहिले.



**महाराष्ट्राचा संघ पुढीलप्रमाणे:**
पुरुष: मेन ईलीट: चिन्मय केवलरमानी (कर्णधार), सूर्या थात्तू सुदर्शन देवर्डेकर, श्रीकांत खडतरे (सर्व पुणे), सिध्देश पाटील (कोल्हापूर), यश थोरात (मुंबई), महिला - वुमेन ईलीट: प्रणिता सोमन (कर्णधार), अपूर्वा गोरे (दोघी अहिल्यानगर), ऋतिका गायकवाड (नासिक),मनाली रत्नोजी (पुणे), योगेश्वरी कदम (सांगली), पुरुष: मेन अंडर २३ - मुस्तफा पत्रावाला, विवान सप्रु (दोघे मुंबई), वीरेंद्रसिंह पाटील (क्रीडा प्रबोधिनी पुणे), अमन तांबोळी (सांगली) ज्युनिअर बॉईजः निहाल नदाफ (सांगली), विपलव मालपुते (पुणे), समर्जित थोरबोले, हरीश डोंबाळे (दोघे क्रीडा प्रबोधिनी पुणे), वुमेन ज्युनिअर: जुई नारकर (मुंबई) ,आकांक्षा म्हेत्रे (जळगाव) स्नेहल माळी (रायगड), सिद्धी शिर्के(पुणे), आसावरी राजमाने (क्रीडा प्रबोधिनी पुणे), बॉईज सब ज्युनिअर: मोक्ष सोनवणे(नासिक), राज कारंडे (अहिल्यानगर), ओंकार गांधले, श्रीनिवास जाधव (दोघे क्रीडा प्रबोधिनी पुणे), गर्ल्स सब ज्युनिअर: श्रावणी परीट (पुणे), निम शुक्ला (मुंबई),आभा सोमन (पुणे), प्राजक्ता सूर्यवंशी (सांगली), युथ बॉईज दानिश जमादार, संस्कार घोरपडे (दोघे सांगली), अर्नव गौंड, अनुज गौंड (दोघे पुणे), युथ गर्ल्स् : गायत्री तांबवेकर (पुणे), राजनंदिनी सोमवंशी (क्रीडा प्रबोधिनी पुणे), अर्णवी सावंत (कोरेगोव-सातारा), प्रचिती खताळ (पुणे)

महिला प्रशिक्षक / व्यवस्थापक: श्रीमती दिपाली शिलदणकर प्रक्षिक: दर्शन बारगुजे व्यवस्थापक / मेकॅनिक :स्वप्निल माने

#रा